सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास ........................८
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ रु६
दुसरे खेपेस .... ........८१

REGISTERED N. No. 4

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ........................... 4 as
Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line....3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 5 AUGUST 1901 NO 30

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ५ माहे आगस्ट सन १९०१ इ० अंक ३०

### MEMORIAL

Will you allow me to offer a few remarks, anent the letter under the initials, 'G. N. S' which has appeared in your last issue? The late Mr. Justice Ranade was a Bombay Presidency man, he lived and worked in that Presidency, all he did was for that Presidency and he died in that Presidency. Poona and Bombay, the chief centres of his labours, owe him a great debt of gratitude and have held their meetings with the object of considering measures to perpetuate his memory. Mr. Ranade moved amongst the people of most of the parts of that Presidency, the young and the old saw his majestic person as he moved, they had opportunities of hearing him in public meetings, admired his high learning and his simple character, and it is but natural and proper that they should wish ever to have before their minds an image of the personage they loved and admired. We in Berar heard of the great man more than we saw. There are not many in Berar who personally saw the imposing personality of the great and silently working patriot of India. I wish I may not be misunderstood. Though a Bombay side man, all India has reason to be proud of Mr. Ranade. But as regards the question of a memorial to his memory, is it necessary for Berar to have her own separate memorial? Let those in Berar who heartily love his memory join the Bombay or Poona Memorialists with their quota, by all means. Let those memorials be as grand as they can be made; and just as we hold the man to be our own, we may equally hold the memorials to be partially our own. I hold the opinion that the most fitting place for the memorial of a great man is the place where he lived and laboured. Rāma has his memorial in Ayodhya, Krishna has his in Dwarka, and Mathura and Shankaracharya has his in Shringeri. The whole India equally admires them and repairs to those abodes to witness, worship and admire those memorials. I entertain the opinion that each place should perpetuate the memory of its own great men, though the out side world may equally admire them.

Why has the 'G. N. S' forgotten to think that a great man in our very midst, who has just thrown off the shackles of Government service, and who is not unjustly considered the Ranade of our own little province, deserves a memorial at our hands. Mr. Mahajani's name has during more than the last twenty—five years, been associated with an educational and social movements in this province and he has been silently doing much for the intellectual, social and moral elevation of the people of Berar. What he has done may be little but does it not deserve to be appreciated? The great Ranade has often referred in his public utterances to our little Ranade as a silent worker of social reform on this side of India, and our experience tells us that he has been working in other spheres also. Let us show our own appreciation of those who are working in our own midst. Let us not act the Benares Brahman who, from apparent disregard, neglects to take his daily bath in the holy Ganges, simply because she happens to lie at his very threshold.

Akola Yours &c.
26/7/01 Voice.

---

### वर्तमानपत्रें आणि व्यक्ति विषयक टीका.

( मागील अंकावरून समाप्त )

कांहीं वर्षे मागें एका प्रांतांत एक अंमलदार असत ते भर कोर्टांत पक्षकाराशीं पैशाची बोलणी करीत. एकानें एक बोट दाखवावें तर दुसऱ्यानें दोन दाखवावीं. मग साहेबांनीं लघवीच्या निमित्तानें बाहेर जाऊन आपला ठराव पक्का करून घ्यावा, आणि पैशाबद्दल कोणी मध्यस्थ जामीन घेऊन पुन्हा कचेरींत येऊन दोन बोटें ज्यानें दाखविलीं त्याचे नांवें ठराव करावा. हें मासल्या करितां एक उदाहरण सांगितलें. असा प्रकार नेहमींच चाललेला असे. पण त्यांच्या बदल परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें वर्तमानपत्रांत एक शब्द येईल तर विष्णवेनमः

दुसरे एक अंमलदार असत ते भर कोर्टांत पक्षकारास सांगत "अरे वकील कशाला करितोस? वकील काय करणार? अखेर ठराव करण्याचें माझ्या हातींच आहे ना? वकिलास पन्नास रुपये देण्यापेक्षां मला पंचवीसच दे." हें यांचें एक मासल्या करितां उदाहरण सांगितलें या वरून त्यांची एकंदरींत काय कृति असेल ती लक्षांत आणावी.

देवीखात्याचे एक अधिकारी असत. त्यांनीं हातांत एक चाबूकच वागविला होता. यांची सरबराई नीट झाली नाहीं, किंवा कोणी पाटील पांड्या देवी काढण्याच्या कामास चांगली मदत देत नाहीं, किंवा कोणी रयत आपलीं मुलें देवी काढण्यास आणीत नाहींत, असें त्यांनीं पाहिलें कीं जो असेल त्यास चाबका खालीं त्यांनीं वाटेल तितकें झोडावें. रयत बिचारी गरीब. ज्यावर बेतेल त्यानें निमुटपणें तो मार सहन करावा, पण या गोष्टी संबंधानें वर्तमानपत्रांत चकार शब्द कधीं आला नाहीं.

दुसरे एक अधिकारी असत, ते मोठे नेकीचे व प्रामाणिक असत, पण एक प्रकारें दंडू असत. त्यांच्या टेबलावर चिंचेचे फोक ठेविलेले असत. कोणी पक्षकार किंवा साक्षीदार खोटें बोलतो आहे असें त्यांस वाटल्याबरोबर मुकदमा एकीकडे ठेवून भर कोर्टांत त्यांनीं आपल्या हातानें त्याला यथेच्छ झोडावें. अशीं एक का दोन उदाहरणें? पण त्याबद्दल वर्तमानपत्रांत कधीं नांव नाहीं.

हीं जीं वर उदाहरणें सांगितलीं हीं नेटिव अधिकाऱ्यांचीं होत. साहेब लोकांविषयीं तर बोलायलाच नको. यांच्या एक एक कृति अशा असतात कीं त्यां पाहून मन थक्क होऊन जातें, आणि त्यावेळीं न्यायप्रिय मनुष्यास असें वाटतें कीं, "अरे ही इंग्रजी आहे कीं मोगलाई?" नेहमीं अशा अनेक गोष्टी धडधडीत चव्हाट्यावर चालत असून आणि सर्व लोक आणि वर्तमानपत्रांचे कर्तेही त्या पाहात असून, त्या वर्तमानपत्रांत येऊं शकत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. इंग्रजी राज्यांत कायदेकानू असे झाले आहेत कीं हजारों लोकांसमक्ष जरी एखादी गोष्ट झाली तरी बिचाऱ्या वर्तमानपत्रकर्त्याला ती अशी अशी झाली असें आपल्या वर्तमानपत्रांत लिहितां येत नाहीं. कारण ज्याच्या संबंधानें ती गोष्ट असेल तो तीबद्दल वर्तमानपत्रकारावर अब्रूच्या नुकसानीबद्दल फिर्याद करणार अशा प्रसंगीं वर्तमानपत्रकर्त्याला पैशाचा मोठा खर्च येऊन शिवाय पुराव्याकरितां साक्षीदार मिळाले तर तो सुटणार, नाहीं तर अडचणच. हल्लींची लोकस्थिति अशी आहे कीं अशा प्रसंगीं जर फिर्यादी मनुष्य मोठा वजनदार असेल किंवा सरकारी अंमलदार असेल तर ज्या हजार मनुष्यांनीं एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहिली असेल त्यां पैकीं कोर्टापुढें खरें सांगण्यास बहुधा एकही धजावणार नाहीं. अशा स्थितींत बिचाऱ्या वर्तमानपत्रकारांनीं देखील काय करावें? याचा परिणाम असा झाला आहे कीं वर्तमानपत्रांत व्यक्तिविषयक टीका येऊन सरकारी अंमलदारांवर जो धाक बसावा आणि रयतेच्या दुःखांचें निवारण होऊन त्यांस जें सुख मिळावें तें मिळत नाहीं. फार परोक्ष रीतीनें सरकारी अंमलदारांस अनुलक्षून लिहिलेले लेख वर्तमानपत्रांकडे पाठविलें असतां संपादक ते छापीत नाहींत. कारण ते बिचारे कायद्यास भितात. त्यांची स्थिति अनुकंपनीय आहे यांत कांहीं संशय नाहीं. तथापि व्यक्तिविषयक लेख न आल्यामुळें सरकारी अंमलदारांपासून लहान मोठीं दुःखें, गैरसोयी किंवा अडचणी रयतेस भोगाव्या लागतात; व त्या इतक्या उघड असतात कीं त्यांविषयीं समाजांत निर्भयपणानें चर्चा चाललेली असते. परंतु त्या चर्चेनें त्यांचें यत्किंचित् परिमार्जन न होतां त्या तशाच चालूं राहातात. अशा वेळीं न्यायप्रिय माणसास असें वाटतें कीं, "देवा हीं वर्तमानपत्रें असून तरी काय उपयोग"?

हजारों लोकांनीं एखादी गोष्ट समक्ष पाहिली असून खरी साक्ष देण्यास त्यां पैकीं एक देखील पुढें येत नाहीं किंवा जबरदस्तीनें आणिला तर खोटें सांगतो असें जें वर विधान केलें आहे त्याचें एक उदाहरण कांहीं वर्षें पूर्वीं घडलें तें येथें सहज सांगतों. एका गांवीं एका स्पेशल माजिस्ट्रेटाच्या भावानें भर रस्त्यांत चव्हाट्यावर शेंकडो प्रेक्षकां समक्ष एका गरीब दुकानदारास मारिलें. तो पैसेवाला असल्या कारणानें त्यानें आगळीक करणाऱ्यावर फिर्याद केली, आणि साक्षीदार ह्मणून कांहीं मंडळींचीं नांवें लिहून दिलीं. यांतले बहुतेक साक्षीदार आह्मांला कांहीं माहीत नाहीं, आह्मी तेथें नव्हतों. असें ह्मणून निघून गेले. एक दोन खंबीर ह्मणून जे होते ते बराच वेळ पर्यंत टिकले; पण आंतून तंबी मिळतांच अखेरीस त्यांनीं ही कान झाडले. हा एका फुसक्या स्पेशल माजिस्ट्रेटाच्या भीतीचा परिणाम होय. मग ज्या ठिकाणीं मोठमोठे अधिकारी असतील त्या ठिकाणीं काय परिणाम होणार? वाहवारे हिंदुस्थानची रयत! बिचारे अंमलदारच थोडे बहूत नीतीनें वागतात, मग ते भिऊन ह्मणा किंवा कसेंहि ह्मणा, ह्मणून कांहीं घडगति आहे. पण जर ते धैर्यवान् असतील आणि हवेतसें मनसोक्त वागतील तर त्यांना काय प्रतिबंध आहे?

कांहीं वर्षां पूर्वीं एक मोठे दंडू अमलदार होते, त्यांनीं एका प्रसंगीं पक्षकारास यथेच्छ शिव्या देऊन त्याच्या वकिलाचीही यथेच्छ पूजा केली. ही गोष्ट भर कोर्टांत झाल्यामुळें तो तमाशा पाहण्यास इतर वकील, वर्तमानपत्रांचे संपादक व अनेक इतर गृहस्थ हजर होते, कोर्ट उठते वेळेस माजिस्ट्रेट साहेबांनीं असें धमकीचें भाषण केलें कीं आज कोर्टांत झालेला प्रकार जर वर्तमानपत्रांत येईल तर अस्मादिकाशीं गांठ आहे हें लक्षांत ठेवावें. इतकी खरमरीत समजूत मिळाल्यावर त्या गोष्टी संबंधानें वर्तमानपत्रांत चकार शब्द तरी कशाला येतो आहे?

सरकारी अंमलदार तर असे असायाचेच नसतील तर आश्चर्य. पण असा अपमान जे स्वतंत्र मनुष्य सहन करितात त्यां विषयीं मात्र आश्चर्य मानायाचें. मोठमोठ्या देशांचे आपण इतिहास वाचलेले आहेत. त्यांत त्या त्या देशाची रयत राज्यकर्त्यांशीं कशी वागली हेंही आपण वाचलें आहे. त्यांच्या कृति तर या देशांतील पारतंत्र्या खालीं चिरडून गेलेल्या आणि गुलामगिरींत हजारों वर्षें राहिलेल्या रयतेस कधींच करितां येणार नाहींत. परंतु एक खरें बोलण्याचें किंवा लिहिण्याचें धैर्य देखील त्यांच्या अंगीं असूं नये यापेक्षां दुसरी दुःखाची गोष्ट ती कोणती! अखेरीस इतकेंच लिहावयाचें कीं राज्यांतील अंमलदारांच्या जुलमाच्या गोष्टी जर व्यक्ति निर्देश करून नरम किंवा गरम रीतीनें वर्तमानपत्रांत आल्या नाहींत—मग त्या न येण्यास कोणत्याही अडचणी असोत—तर वर्तमानपत्रांचें एक मोठें कर्तव्यकर्म बजावण्याचें राहतें.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक श्रावण वद्य ६ शके १८२३

## बायकांच्या अंगावर दागिने घालण्याची चाल.

इंग्रजी राज्य आल्या पासून आमच्या देशांतील पुष्कळ जुन्या चाली वाईट ठरूं लागल्या आहेत. ह्यां पैकींच बायकांच्या अंगांवर दागिने घालण्याची चाल ही एक होय. इंग्रज लोकांनीं आह्मांला जिंकून पादाक्रांत करून टाकलें आहे, ही गोष्ट खरी आहे. त्यांनीं आह्मांला आपल्या शरीरबळानें जिंकलें असो, विद्येनें जिंकलें असो किंवा युक्तिप्रयुक्तीनें जिंकलें असो, आह्मी पराजित आहों ही गोष्ट उघड उघड आहे. इतक्या एका गोष्टीनें आह्मांला असें वाटूं लागलें आहे कीं, आह्मांस जिंकणारे जे इंग्रज त्यांच्या चाली रीति, शिष्टाचार, पोषाख, खाणें पिणें इत्यादि एकूण एक गोष्टी सर्व चांगल्या आहेत, त्यांत नांव ठेवण्यासारखी एकही नाहीं. त्या बरोबरच दुसरें आह्मांस असें वाटूं लागलें आहे कीं, आमच्या चाली, आमचे शिष्टाचार, आमचे पोषाख, आमचा धर्म, आमचें अन्न हीं सर्व वाईट. आह्मी इंग्रजा पुढें शारीर बळाला हरलों होतों. पण मानसिक बळाला तर हरलों नव्हतों? असें हें बहुमोल मानसिक बल आह्मास प्रस्तुत प्रसंगीं अवश्य पाहिजे होते. या बलानें आह्मास पुढील लढाई जिंकावयाची आहे. हल्लींचा अन्योन्य कलहांत आपलेपणा कायम राहण्याला आह्मापाशीं एवढें तरी साधन राहिलें पाहिजे. असें असून जसें कांहीं शरीरबळाबरोबर आमचें मानसिक बळही आह्मांस सोडून जावें या सारखीच स्थिति झाली आहे. खरोखर आह्मी भांबावलों आहों व आह्मांस भुरळ पडली आहे. बरें काय व वाईट काय हेंही आह्मांस कळत नाहींसें झालें आहे. आह्मांस आमच्या सारासार विचारशक्तीनें सोडलें यांत कांहीं संशय नाहीं.

कांहीं वर्षांमागें बी. ए. ची परीक्षा पास झालेले एक विद्वान् गृहस्थ इंग्रजीस इतकें भुलून गेलेले दिसले कीं, एके समयीं भाषण करित असतां पाण्याच्या ऐवजीं कागदानें निर्वाह करण्याची जी इंग्रजांची चाल आहे ती ही आमच्या चाली पेक्षां फारच उत्तम असें ते मंडन करूं लागले, कदाचित् त्या वेळीं ह्यांनीं ती स्वतःच्या अमलांत आणली असल्यास नवल नाहीं. आतां अति थंड देशामध्यें राहणाऱ्या इंग्रजांची ती चाल देशस्थितीच्या कारणानें योग्य आहे, व आमच्या देशस्थितीच्या मानानें आमचीही चाल योग्य आहे. असा वास्तविक रीतीनें विचार करण्याचा असून ते गृहस्थ ह्याच चालीची तारीफ करूं लागले हा चमत्कार नव्हे काय? या गृहस्थाचें डोकें ठिकाणीं होतें असें कोणी ह्मणेल काय? ही गोष्ट वाचल्या बरोबर वाचक त्यास हंसूं लागतील पण हंसण्यापूर्वीं त्यांनीं विचार केला पाहिजे. विचार असा कीं, या देशांत ज्यांची जरूर नाहीं अशा इंग्रजांच्या कांहीं चाली मीं उचलल्या आहेत काय, किंवा पूर्ण विचार केल्यावांचून त्यांचीं कित्येक मतें मीं अंगिकारिलीं आहेत काय? या दोन्ही दोषांपासून जर वाचक मुक्त असेल तरच वरील विद्वान् गृहस्थांस हंसण्याचा त्याला अधिकार येईल.

ज्या आमच्या कित्येक चालीस इंग्रज आरंभापासून हंसताहेत, व त्यांच्या बरोबर आमचेहि लोक हंसूं लागले आहेत त्या चालीं पैकीं स्त्रियांच्या अंगांवर दागिने घालण्याची चाल ही एक होय असें आरंभींच सांगितलें आहे. इंग्रज आह्मांला कां हंसतात याचा विचार केला असतां असें दिसतें कीं, त्यांच्यांत ही चाल नाहीं. ह्मणून ते आह्मांस हंसतात. ही गोष्ट केवळ लांड्या कोल्ह्याच्या गोष्टी सारखी आहे किंवा कसें याचा आह्मीं विचार केला पाहिजे. कोणतीही चाल जेव्हां पडते तेव्हां ती आरंभींच्या योग्य कारणांवरून पडते; व पुढें तीं कारणें बंद झालीं तरी ती चाल कायम राहते. दक्षिण कोंकणांत कुणबी लोकांची लंगोटी नेसण्याची चाल आहे; ह्मणजे आठ वर्षांच्या मुलापासून तों शंभर वर्षांच्या ह्मातान्या पर्यंत सर्व पुरुष लंगोटी नेसतात. ही चाल अर्थात अत्यंत गरिबीच्या कारणानें पडली असली पाहिजे. ह्या कुणब्यांतील कित्येक लोक जरी आतां थोडे श्रीमंत झाले आहेत तरी ते अजून लंगोटीच नेसतात. सरकार दरबारांत जातात तेव्हां मात्र ढुंगणा भोंवतालीं धोतर गुंडाळतात, व आंत लंगोटीच असते. इंग्लंद देश मूळचा अतिशय दारिद्रि. त्यांत खनिज पदार्थांचें उत्पन्न ह्मटलें ह्मणजे लोखंड आणि कथील. पुष्कळ काळ पावेतों त्या देशांतील लोकांस सोनें आणि चांदी ह्मणजे काय हें देखील माहीत नव्हतें. त्या देशाचें दळणवळण यूरोप खंडाशीं झालें तेव्हां त्यास हे मूल्यवान् धातु माहीत झाले. व अमेरिकेचा शोध लागल्यावर इलिजाबेथ राणीच्या कारकिर्दींत जेव्हां इंग्लिश लोक अमेरिकेस जाऊं लागले, तेव्हां आणि त्यानंतर पुढें इंग्लंदांत सोनें येऊं लागलें. या काळपावेतों इंग्लिश लोकांस राष्ट्र संज्ञा आली होती, व ह्यांच्या चालीरीति बऱ्याच पक्या होऊन गेल्या होत्या, या काळापूर्वीं इंग्लंदांत जरी चांदी व सोनें हीं माहीत असलीं तरी त्यांचा पुरवठा बेताचाच होता, व लोकांची श्रीमंतीही बेताबाताचीच होती. अशा काळामध्यें चांदीचे व सोन्याचे अलंकार बायकांस मिळावे कसे? तेव्हां त्यांच्यामध्यें स्त्रियांना वस्त्रांनीं आणि पुष्पांनीं सुशोभित करण्याची चाल पडली. पुढें त्या देशांत उद्योग धंदा वाढून ते लोक जेव्हां परद्वीपांशीं व्यापार करूं लागले, व त्यांची संपत्ति वाढत चालली तेव्हां त्या देशांत चांदी व सोनें यांची वृद्धि होत चालली. परंतु जी एकदां चाल पडली ती पडलीच पडली. ती कांहीं बदलतां येईना. दुसरें असें कीं, देशाच्या थंड हवेमुळें बायकांस सर्व शरीर वस्त्रांनीं झांकून टाकणें अवश्य असल्यामुळें दागिने घालण्यासही फारसा अवकाश राहिला नाहीं. अशा कारणांमुळें त्यांच्यांत दागिने घालण्याची चाल पडली नसावी- आतां आमची स्थिती पाहूं. ज्या काळापासून इतिहास उपलब्ध आहे त्या काळापासून आमचा देश श्रीमान् व संपत्तिमान् आहे. आपच्या देशांत चांदीच्या व सोन्याच्या खाणी आहेत, हिऱ्यांच्या खाणी आहेत, मोत्यें उपलब्ध होण्याचीं ठिकाणें आहेत; व जमिन सर्व जगांत अत्यंत सुपीक अशी असल्यामुळें व गुरेंढोरें पुष्कळ असल्यामुळें आमची खाण्यापिण्याचीहि चंगाळी. दुसऱ्या देशांशीं व्यापार करून किंवा दुसरे देश लुटून आह्मांस आमची संपत्ति वाढवावी लागली नाहीं. आह्मी मूळचेच गर्भश्रीमंत आहों. यामुळें सोनें, चांदी आमच्या घरांत विपूल असल्यामुळें तिचा उपयोग आह्मी स्त्रियांच्या अंगांवर अलंकार घालण्यांत केला. व ही आमची चाल अनादि काला पासून चालत आलेली आहे. दुसरें असें कीं, आमचा देश उष्ण किंवा समशीतोष्ण असल्यामुळें आमच्या स्त्रियांचीं अंगें पूर्णपणें अच्छादित करण्याची आवश्यकता नसल्यामुळें तीं आह्मांला अलंकारांनीं सहजच सशोभित करितां आलीं. अशा भिन्न कारणांमुळें त्यांची चाल तशी पडली, व आमची चाल अशी पडली. असें असून व हीं कारणें इंग्रजांस समजत असून जर ते आपली चाल चांगली व आमची वाईट असें ह्मणत असले तर तें त्याचें ह्मणणें केवळ मत्सरमूलक आहे हें उघड आहे. ते आह्मांला नावें ठेवितात यांत कांहींच नवल नाहीं. नवल इतकेंच कीं, आमचे लोक त्यांचें ह्मणणें खरें मानून आपली चाल वाईट असें समजूं लागले आहेत व ती बंद करावी अशीही इच्छा करूं लागले आहेत. सुदैवाची गोष्ट इतकीच कीं कोणतीही चाल फार दिवसांच्या अस्तित्वामुळें अतिशय बळकट झालेली असते, यामुळें ती एकाएकी मोडत नाहीं. ह्मणून ही चाल अजून बिलकूल मोडली नाहीं व लवकर मोडेल असाही संभव नाहीं. जर मोडण्या सारखी असती तर या पूर्वींच सर्वांनीं आपल्या बायका बुच्या करून टाकिल्या असत्या.

दुसरें, लोकांना असें सांगण्याचें कीं, दागिनें घालण्याची चाल वाईट असें ह्मणून बायकांस बुच्या करण्याची तुह्मांस मुद्दाम इच्छा करायाला नको; तो दिवस अनायासेंच येत आहे. देशांत दारिद्र्य दिवसानुदिवस वाढत आहे हें आपण प्रत्यक्ष पाहात आहों. दिवसानुदिवस पोट भरण्याची लोकांस पंचाईत पडत चालली आहे, मग पैशाचा संग्रह होऊन दागिने होण्याची आशा फारशी करायाला नको. लोकांस अर्थशास्त्राची माहिती झाली आहे, व दागिने हें स्थिर भांडवल असें त्यास वाटूं लागलें आहे. चर भांडवल असलें ह्मणजे तें आपणांस वृद्धिंगत करितें यामुळें दागिन्यांची चाल फार वाईट असें याही दृष्टीनें वाटूं लागलें आहे. पण लोकांनीं खास समजावें कीं दागिने घालण्याची चाल ही अति उत्कृष्ट आहे.

व्यापाऱ्यापाशीं किती जरी चर भांडवल असलें तरी जर तो शहाणा असेल तर तो आपल्या पाशीं कांहीं तरी स्थिर भांडवल ठेवील. लाख रुपयांचें ज्याचें भांडवल असेल त्यानें चवथा हिस्सा किंवा निदान दहावा हिस्सा तरी स्थिर भांडवल ह्मणून घरांत ठेविलें पाहिजे व त्यास अत्यंत संकटाच्या समया शिवाय हात लावायाचा नाहीं अशा निश्चयानें तें ठेविलें पाहिजे. असें जर तो न करील तर एखाद्या प्रसंगीं अब्रूच्या पूर्ण हानीच्या गोंत्यांत येईल. साधारण कुटुंबांत ही कुटुंबाच्या नायकानें असेंच वागण्याचें आहे. किती जरी त्याचे उत्पन्न असलें तरी जिला अत्यंत संकटाच्या समयाशिवाय हात लावायाचा नाहीं अशी त्याजपाशीं कांहीं रक्कम पाहिजे. आपल्या कुटुंबांत बायकांच्या अंगावर जे दागिने असतात, ती अशा प्रकारची रक्कम होय. गरीब आणि मध्यम स्थितींतील लोकांमध्यें स्थिर भांडवला प्रमाणें ज्यांच्या पाशीं कोणत्याही वेळीं पैशाची कांहीं तरी रोकड सांपडेल असे कुटुंबनायक फार विरळा. शेंपन्नास रुपये ज्यांस पगार आहे किंवा कोणत्याही प्रकारचें ज्यांचें इतकें उत्पन्न आहे, अशा लोकांच्या घरीं जाऊन जर त्यांना कोणी हजार पांचशें रुपयांची रोकड दाखविण्यास सांगेल तर ती दाखवूं शकतील असे शंभरांत पंचवीस किंवा निदान दहा तरी इसम सांपडतील कीं नाहींत याची शंकाच आहे. पण इतकें ज्यांचें उत्पन्न आहे त्यांच्या घरांतील बायकांच्या अंगावरचे दागिने पाहिले तर हजारपांचशें रुपयाचे तर काय परंतु याच्या दुप्पट किंवा तिप्पट किंमतीचे निघतील. शहाण्या लोकांनीं घातलेल्या चालीनें रक्षण करून ठेवलेलें हेंच आमचें स्थिर भांडवल होय. अगदीं गरीब जरी कुणबी घेतला तरी त्याच्या घरांत रोख असा एक रुपयाही एखादे वेळीं सांपडणार नाहीं. पण त्याच्या घरांतील बायकांच्या अंगावर पांच पंचवीस तोळे चांदी तरी सांपडेल. व अत्यंत संकटाच्या प्रसंगीं तीच त्याच्या कामास येईल. आपल्या लोकांचा असा निश्चय असतो कीं, वाटेल तसा प्रसंग येवो. कर्ज काढावें लागलें तरी हरकत नाहीं, पण बायकांच्या अंगावरच्या दागिन्यांला हात लावायाचा नाहीं. किंबहुना, कुटुंबनायक जेव्हां पैशाच्या अडचणींत असतो, तेव्हां तो कर्ज काढणें वगैरे बाहेरच्या विचारांत लागतो पण बायकांच्या दागिन्याकडे त्याचें लक्षही जात नाहीं; जसें कांहीं ते नाहींतच. आणि ज्या वेळेस तो सर्व बाजूंनीं अगदीं हतवीर्य होऊन जातो, त्याच वेळेस त्याचें दागिन्यांकडे लक्ष जातें, व ते त्याच्या उपयोगींहि पडतात. तेव्हां दागिने हें आमचें निर्वाणीच्या प्रसंगीं उपयोगीं पडणारें साधन होय. ते स्त्रियांच्या अंगावर घालण्याची चाल फार दूर दृष्टीची व अत्यंत पोक्त विचाराची आहे हें पक्कें समजावें.

कित्येक मनुष्यें शिलकींत कांहीं तरी पैसा ठेवावा अशी इच्छा करितात व निश्चयही करितात. पण ती इच्छा, किंवा तो निश्चय तडीस जात नाहीं. कांहीं कारणें उत्पन्न होऊन ती शिलक नाहींशी होते. सेव्हिंग-ब्यांकेंत ठेविली तरी तेथून ती काढावी लागते, पण जर दागिन्यांत तिचे रूपांतर

करून ती बायकोच्या स्वाधीन केली तर मात्र ती निर्भय राहते. ही गोष्ट साधारण लोकांस लागू आहे. जे निश्चयाचे खंबीर असतील त्यां विषयीं हें बोलणें नाहीं पण असे लोक फार थोडे. जे लोक आपलें स्थिर भांडवल मोडून याला चर करतील ते "तेलही गेलें व तूपही गेलें" अशा संकटांत आपणांस घालून घेतील. या करितां अर्थशास्त्राचे नियम कांहींहि असोत; किंवा इंग्रज लोक आपणांस शहाणे ह्मणोत किंवा मूर्ख ह्मणोत, आपली असलेली चाल सर्वांनीं कायम ठेवावी इतकेंच नाहीं तर तिची सुधारणाही करावी. ज्याचें उत्पन्न मोठें असेल त्यानें कांहीं मर्यादित ईयत्तपर्यंत आपणापाशीं स्थिर भांडवल झाल्यावर बाकीचें उत्पन्न जगाच्या मंडळावर यथेच्छ संचरण्यास सोडून दिलें तरी कांहीं हरकत नाहीं.

## मुलकी अपिलें

मुलकी अपिला संबंधानें नुकतांच कायद्यांत फरक झाला आहे आणि त्या फरकाच्या योगानें दुसऱ्या अपिलांचा हक्क निम्मा काढून घेण्यांत आला आहे. मुलकी प्रकरणांत वरिष्ट कोर्टाकडे अपील दोनदां करितां येतें. कोणत्याहे प्रकरणांत पहिले अपिलांत योग्य दाद न मिळाली तर त्यावर दुसरें अपील करण्याचा हक्क सरसकट ठरलेला होता. तिसरें अपील करण्याचा अधिकार पूर्वीही नव्हता आणि तो अधिकार देण्याची गरज ही दिसत नाहीं. आतां नवीन फेरफार झाला आहे तो असा:- आसिस्टंट कमिशनराच्या ठरावावर अपील डिपुटी कमिशनराकडे चालेल, डिपुटी कमिशनरावरील अपील कमिशनर चालवितील, आणि कमिशनरा वरील अपील अलिशान रेसिडेन्ट पाहतील. हा अनुक्रम पूर्वी प्रमाणेंच आहे. पण आतां असें ठरलें आहे कीं, कनिष्ट कोर्टाचा अभिप्राय आणि पहिल्या अपिलेट कोर्टाचा अभिप्राय एकच पडला व कनिष्ट कोर्टाचा हुकूम कायम राहिला तर त्या ठरावावर दुसरें अपील चालणार नाहीं. दुसऱ्या अपिलाचा हक्क फक्त एकाच प्रसंगीं मिळेल. जेव्हां कनिष्ट कोर्टाचा ठराव पहिलें अपिलेट कोर्ट रद्द करील किंवा त्यांत फेरबदल करील तेव्हां दोन्ही कोर्टामध्यें झालेल्या मतभेदाचा अखेर निर्णय दुसऱ्या अपिलेट कोर्टाच्या हातीं ठेविला आहे याचा अर्थ असा कीं, खालच्या दोन कोर्टाच्या अभिप्रायाची एकवाक्यता होत नसेल तर अखेरच्या श्रेष्ट कोर्टानें पचा प्रमाणें आपला अभिप्राय देऊन काय तो निकाल सांगावा. या नवीन फेरफारानें अलिशान रेसिडेंट साहेबाकडे दाखल होणाऱ्या अपिलांची संख्या पुष्कळ कमी होईल, आणि वऱ्हाडचे डिपुटी कमिशनर व कमिशनर यांचीं मतें जुळलीं तर त्या प्रकरणांत अलिशान रेसिडेंट साहेबांस हात घालण्याचें प्रयोजन नाहीं असाच सारांश निघतो. व असिस्टंट कमिशनर व डिपुटी कमिशनर यांचा अभिप्राय एकच पडला ह्मणजे त्या प्रकरणांत कमिशनर साहेबांस अपिलाच्या रूपानें फेरफार करण्याचा सुयोग कधींही येणार नाहीं. पण ही गोष्ट फार वाईट झाली. मुलकी कोर्टांत जाणाऱ्या लोकांचीं तोंडें बंद करण्याला हा उपाय फार चांगला असेल पण या योगानें लोकांचें मोठें नुकसान होईल.

## वर्षोत्सव व्याख्यानमाला

( आमच्या एका मित्राकडून )

व्याख्यान पहिलें

रा. रा. गणेश श्रीकृष्ण उर्फ दादा साहेब खापर्डे ह्यांचे प्रास्ताविक व्याख्यानाचा सारांश

अध्यक्ष— रा. रा. हरी रामचंद्र उर्फ भाऊसाहेब रोहणखेडकर.

येथील लायब्ररीची व्याख्यानमाला आतां सुरूं होणार तेव्हां माझ्या व्याख्यानाचा विषय मालेला प्रस्तावनारूप असेंण बरें आहे. लायब्ररी सारख्या संस्थांचा हेतु शाळा प्रमाणेंच ज्ञानप्राप्ति करून घेण्याचा आहे. ह्या दोन संस्थांत विशेष इतकाच कीं लायब्ररी सारख्या संस्थेंत प्रौढ व अप्रौढ असे दोन्ही प्रकारचे विद्यार्थी ज्ञान मिळविण्याच्या इच्छेनें येत असतात. सबब त्यांत होणाऱ्या व्याख्यानाचा विषय दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांस उपयोगी असावा. असो. मनुष्यानें आपले नेहमींचे व्यवहार घटकाभर बाजूस ठेवून, अवलोकन केलें असतां, ह्याच्या असें नजरेस येईल कीं ह्या जगांत ज्ञानाचे शास्त्रादि विषय असंख्य आहेत. ह्या योगानें ज्ञानेच्छूंची तारांबळ उडून जाते. कारण इतक्या सर्व शास्त्रांचें परिशीलन करणें अशक्य आहे. तेव्हां अशा वेळीं ज्ञानेच्छूनें आपल्या आवडीचा विषय घेऊन त्या संबंधानें अध्ययन करावें असें सांगून रा. रा. दादा साहेब ह्यांनीं मनुष्याच्या मनांत आवडनिवड कोणत्या कारणांनीं उत्पन्न होते ह्या मानसिक शास्त्राच्या तत्वाची उपपत्ति सांगितली व त्या संबंधानें प्रचलित असलेल्या मतांचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें; व नंतर वासनांची उपपत्ति पाश्चिमात्य तत्ववेत्यांनीं केली नसून, ती आपल्या कडील ग्रंथांतून मात्र उपलब्ध आहे असें व्याख्यात्यांनीं सांगितलें व ह्या प्रश्नाचें यथासांग विवेचन वायव्ये कडील प्रांतांतील मि. भगवानदास ह्यांनीं ह्याच विषयावर केलेल्या नवीन पुस्तकांत केलें असल्याबद्दल सांगितलें. ह्याप्रमाणें मनुष्याच्या आवडी संबंधानें उपपत्ति सांगितल्यावर व्याख्यात्यांनी असें सांगितलें कीं, मनुष्यानें जो विषय घेतला असेल त्या संबंधानें त्यानें चांगलें अध्ययन केलें पाहिजे. तथापि अध्ययन केल्यानें आपण इतर लोकांपेक्षां फार शहाणे झालों अशी घमेंड त्यानें बाळगूं नये. ह्याबद्दल व्याख्यात्यांनीं फार कळकळीचा उपदेश केला. कारण आपलीं ज्ञानाचीं साधनें किती लंगडीं आहेत ह्या गोष्टींचा प्रत्येक मनुष्यानें अनुमान काढते वेळीं विचार केला पाहिजे. चक्षु वगैरे इंद्रियांना फार लांबचें ज्ञान व फार जवळचें ही ज्ञान होत नाहीं, ह्या शिवाय इंद्रियावर देखरेख करणारें मन तें तर इतकें भराऱ्या मारतें कीं त्यांचा नेमच नाहीं. व ह्या शिवाय शास्त्रांचीं मूलतत्वें अशीं आहेत कीं त्याचें मूळ अज्ञेय आहे. तेव्हां इतक्या अडचणी ज्ञान प्राप्तीस असल्यामुळें अशा स्थितींत आपणांस जें ज्ञान प्राप्त झालें असेल, त्यापासून एखादा सिद्धांत काढल्यास तो बरोबर आहे अशी घमेंड करणें धाडसाचें होणार नाहीं काय ? ह्यास्तव मनुष्यानें कोणतेंही नवीन मत प्रतिपादिलें असतां, तें आपल्या विचारास बरोबर वाटलें तरी, तें एकदम ग्राह्य करूं नये व त्याप्रमाणें वर्तन करण्यास आरंभ करूं नये. कारण आजपर्यंतचा अनुभव पाहिला असतां आपणास असें आढळून येतें कीं अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोलशास्त्र वगैरे शास्त्रांत जीं मतें सुमारें ३३ वर्षांमागें ग्राह्य समजलीं जात होतीं तीं आज कुच कामाचीं समजलीं जात आहेत. व पूर्वीं जीं अग्राह्य समजलीं जात असत तीं आज ग्राह्य होतील असें वाटत आहे. तेव्हां नवीन मत ग्राह्य करण्यापूर्वीं, तें आपल्या अनुभवाच्या कसोटीस उतरतें कीं काय व त्याच प्रमाणें आपल्या मनाशीं व रागद्वेषादि भावनांशीं जुळतें कीं काय ह्याचा शांतपणें विचार करावा; केवळ एककल्ली विचारावरच मनुष्यानें भिस्त ठेवूं नये. हीं तत्वें मनांत ठेवून मनुष्यानें आपल्या आवडत्या विषयाचें अध्ययन केलें असतां, त्या अध्ययनाची फलश्रुती वेदांतांत होऊन मनुष्यास मोक्षाची प्राप्ति होईल असें आश्वासन देऊन व्याख्यात्यांनीं आपलें मनोरंजक व्याख्यान आटोपलें. रा. रा. दादासाहेब ह्यांचें भाषण झाल्यानंतर रा. रा. व्यंकटराव देसाई, रामभाऊ महाजनि, मि. महमद यूसफ व अण्णासाहेब महाजनि ह्यांचीं भाषणें झाल्यानंतर पुनः रा. रा. दादासाहेब बोलले; त्यांत त्यांनीं आपल्या भाषणाचा थोडक्यांत सारांश देऊन, इतर मंडळींनीं काढलेल्या शंकांचें निरसन केलें. नंतर अध्यक्षाचें भाषण झाल्यावर रीतीप्रमाणें आभार मानल्यानंतर सभा विसर्जन झाली.

## The Berar Samachar

MONDAY AUGUST 5 1901

The work of the Settlement department is in rapid progress and will be brought to a completion before the close of the current official year. The new assessments of land will give a fair idea of the revenue of the province. The future programme of the new assessment promises to be as bad as a hail—storm. Our experience of the present assessment in certain districts where it is recently introduced, does not auger a hopeful future for the proposed enhancements of the land—tax. We repeat our complaint about the land—assessment. It is heavy, oppressive and sometimes exhorbitant. The new rates press too much against the poor in a number of ways. The pressure of the land—tax has upset the general tone of contentment and has set the people upon an inquiry into the method and procedure of newly assessing the land in the province. The famine has done one great service in this connection. It has proved beyond doubt the extreme rigour and pressure of the land—tax. The basis of the new asseesment is not sound. It violates the principles of true economy when it does not leave a competency of income to those who live upon agriculture. An assessment is most faulty when it is likely to deteriorate the trade of agriculture. The business is demoralized when we find people rush to it in a haphazard manner. Calculation of a total out—turn of crops is none and many people make agriculture a matter of pure speculation. Agriculture suffers a good deal when it fails to invite honest labour for want of a sufficient income. Certainty of a moderate income dignifies labour and makes it steady, permanent and progressive. We were not satisfied with the justness of the old demands of the Government. When all land was brought under cultivation, when the mouths to be fed upon agriculture were multiplied in diverse ways and the dead—lock of new openings of business caused the people to over-crowd the ranks of the agriculturists, the pressure of the old assessments became apparent and began to hinder the progress of agriculture. The new assessment has only intensified the poverty of the people and has further aggravated the difficulty and helplessness of the position of the agriculturists. We need not tell that a public inquiry into these matters is baffled on all sides. The people find it difficult to prove the facts against the statistics of the Government but for all that the fact is there that the people are fast sinking into poverty and will in course of time be nothing better than slaves on land.

The Government keep all matter about the new assessments a sacred secret. No body can peep into their proposals and can get a view of their basis. There is no argument open to the public and the people are told to bow down to the new rates when a big official of the Government declares them with all the weight of his authoritative position. There is the official imprimatur and monopoly of wisdom and prudence is solely with the Government who are to be credited with the benevoleuce for people. This credulity is a creed of our loyalty and our full faith in the righteousness of the Government.

The question of the land—tax gains additional importance when we have to interpret the anxiety and solicitude of the Government in the recent proposals of restricting and prohibiting the alienation of land as a measure against the indebtedness of the people. The Government propose measures to cure the mole in the eyes of the money—lenders but fail to see the great evils of their own creations.

### वऱ्हाड

हवामान—पाऊस चांगला पडत आहे. एकंदर १२ इंचावर पाऊस पडला. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. किरकोळ आजारं वाढले आहेत.

पटवारी लोकांस मोजणीचें काम शिकविण्याचा वर्ग येथील हायस्कूलाला जोडला, त्याची परीक्षा मे. फ्रान्सिस साहेबांनीं घेतली. आणि ७९ पैकीं ६० पटवारी पास झाले.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे आफि० एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे येथें येऊन १ ले तारखेला वाशिमास गेले.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. बळवंत विनायक दिगंबर यांस संग्रहणीच्या आजारानें गेल्या गुरुवारीं देवाज्ञा झाली. मरणा पुढें इलाज नाहीं.

## वर्तमानसार

योगीस्त्री— रजपुतान्यांत जोधपुरास एक बाई आज ५० वर्षे अन्नपाण्या वांचून रहात आहे. मारवाडांत ती मटगी या नांवानें प्रसिद्ध आहे. तिचें खरें नांव रुखाबाई आहे. ती फक्त दिवसांतून तीन वेळां तीर्थ तेवढें घेते. ती आज ८० वर्षांची आहे व जरी आज ५० वर्षे तोळा दोन तोळे पाण्यावर आहे तरी शेजारी असलेल्या अर्धा मैल उंचीच्या टेकडीवर ती जाते. ह्या गोष्टींत प्रेमाबाई सारखी लबाडी नाहीं. खात्री करून घ्या.

चमत्कार— ज्याचा अंत लागत नाहीं. अशा अफाट महासागराच्या तळीं काय आहे याचा नवीन शास्त्रीय शोध फारच आश्चर्य दायक होय. आपल्या ह्या भूतलावर जशीं सुंदर उपवनें, विस्तीर्ण अरण्यें, वालुमय प्रदेश, उंचपर्वत, नद्या, खोऱ्या व असंख्य प्राणी वगैरे ज्या ज्या गोष्टी आहेत तशाच पाण्याच्या खालींही आहेत हें वाचून ईश्वराच्या करणीची धन्यता वाटते.

ढोल वाजवून भिक्षा मागितल्याबद्दल शिक्षा— सुदाजी पांडू व त्याच्या चार सोबत्यांनीं मुंबईस बिनपरवानगीनें सडकेवर ढोल वाजवून भीक मागितली ह्मणून त्याला प्रत्येकाला मॅजिस्ट्रेटनें एक एक रुपया दंड केला.

विचित्र संतान—ता० ४ जुलईचे सुमारास झलीदा येथें एका स्त्रीस एक विचित्र मुलगी झाली. तिला २ डोकीं, ४ हात, ४ पाय, २ छाती आणि दोन पोटें आहेत ही मुलगी दोन तोंडांनीं दूध पिते. ह्या मुलीचे मातापितरास भय वाटून ती मरावी ह्मणून त्यांनीं तिला एक दिवस दूधच पाजलें नाहीं. तथापि आश्चर्य हें कीं ती मुलगी अजून जिवंत आहे.

११ लक्षांचें नुकसानः—गोव्यांस फाजील पाऊस पडल्यामुळें पोर्चुगीज रेल्वेचें एक लक्षाचें व एकंदर लोकांचें दहा लक्ष रुपयांचें नुकसान झालें आहे.

आंकड्यांची मौजः— १४२८५७ ह्यांस २, ३, ४, ५ अथवा ६ यांनीं गुणलें असतां येणाऱ्या गुणाकारांत तेच ते आंकडे वारंवार येतात. ७ नीं गुणलें असतां सारे ९ येतात, आणि ८ नीं गुणलें असतां ११४२८५६ हा गुणाकार येतो त्यांत ७ आंकडे येतात त्यांतल पहिला १ पुसून शेवटच्या ६ त मिळविला असतां पुन्हां १४२८५७ तयार.

ज्ञा०

---

पंजाब नादारी मुकदमा नंबर २

——

१९०१

नादारी नियमा अन्वये नादाराला नादार ठरविणें विषयीं त्याचे सावकारास नोटिशीचा नमुना.

( नी )

विद्यमान रामचंद्र नारायण देशपांडे साहेब नादारी कोर्टाचे जडज्य अकोला. यांचे कोर्टांत

खालीं लिहिलेले सावकार व सर्वत्र लोक यांस. नोटीस देण्यांत येते कीं गोविंदा निंबाजी जात कुणबी कोकाटे रहाणार शेगांव तालुके खामगांव. हा नादार आहे असा आज तारीख १३ जुलई सन १९०१ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख २३ माहे आगष्ट सन १९०१ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारानीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारा वरून तक्रार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीदारांस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या दोन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारनें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडीशिएल ऑफिसर पुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ करावी आणि ती यादी टपाला मार्फत कोर्टास पाठवावी ह्मणजे दावा रजिष्टरांत दाखल होईल.

अर्जदाराचे सावकारांचीं नांवें

| | | |
|---|---|---|
| १ | इण्णाजी वा। दर्याजी सुलतान रहणार डोंगरगांव तालुके बाळापूर | १७६ |
| २ | नारायण वा। कडताजी राहणार शेगांव तालुके खामगांव. | ३५० |
| ३ | तानबा बंडोबा नाईक राहणार उमरावती | १९ |
| ४ | सिवचरण बालाजी मारवाडी राहणार उसलणी | २३॥।-॥। |
| ५ | नथमल खेलराज मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव | ५६ |
| ६ | मेघराज बनसी मारवाडी वस्ती शेगांव तालुके खामगांव. | ५० |
| ७ | श्रीराम शालीग्राम मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव | २५ |
| ८ | उसमान साहु कच्छी राहणार शेगांव तालुके खामगांव. | ९॥-॥ |
| ९ | मामन जिवाला कच्छी राहणार शेगांव तालुके खामगांव. | ७०० |
| १० | गिरधारीलाल चिमनलाल राहणार अकोला तालुके मजकूर | २०० |
| ११ | केशवराव त्रिंबकेश्वर | ३८ |
| १२ | लक्षुबाई मिर्जापूरकरीन | ३८ |
| १३ | गणुसा रामसा रंगारी राहणार खामगांव | ८ |
| १४ | सूर्यभान व० रामजी मिरजापूरे राहणार धुईखेड. | १०२ |
| १५ | तानकु सवलकर वस्ती बाळापूर | ४०० |
| १६ | शालकराम नारायणदास मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव अदमास | २५ |
| १७ | मंगलचंद बिरदीलाल मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव | १८ |
| १८ | तनसु श्रीराम राहणार शेगांव तालुके खामगांव | ५० |
| १९ | तुकाराम रामजी वस्ती शेगांव तालुके खामगांव | २०० |
| २० | निम मारती वस्ती नांदोरा तालुके मलकापूर | ५८ |
| २१ | पुंजाआपा वाणी वस्ती बाळापूर | १६ |
| २२ | हरी कुकाजी राहणार शेगांव तालुके खामगांव | १५४४ |
| २३ | गणेशदास भिवराज मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव | ४०५ |
| २४ | नवलराम भिवसनराम मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव | १९०॥।=॥। |
| २५ | ताराचंद सिवनारायण मारवाडी राहणार शेगांव तालुके खामगांव | ८०३॥ |
| २६ | गणोबा भगवान पाटील राहणार डोंगरगांव | १००० |

R. N. Deshpande

नादारी कोर्ट जज्ज

जिल्हा आकोला

---

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस,

नंबर. ७

इतकें संभाषण चाललें आहे तोंच सिंहगडाहून एक ब्राह्मण आल्याची वर्दी एका जासुदानें दिली. कोणी महादेवजी न्यायशास्त्री आंत येण्या बद्दलच्या परवानगीची वाट पाहत आहे असेंहि त्यानें सांगितलें, परवानगी दिल्या नंतर थोडक्याच वेळांत हा शास्त्री आंत आला, वयानें ४० च्या जवळ जवळ असून जरासा खुजा व काळसर रंगाचा होता. छाती रुंद, डोळे पाणीदार, हात लांब, कपाळावर भव्य टिळा लावलेली अशी ही मूर्ती आंत येऊन बसली. पागोट्याचा घेर एखाद्या छत्री प्रमाणेंच ऊन व पाऊस या पासून बचाव करण्या जोगा होता.

षाहिस्तेखान—सिंहगडची काय खबर आहे ? शास्त्री बोवांनीं एक संस्कृत श्लोक ह्मटला व सुचविलें कीं वनवासांत दंडकारण्य व पंचवटी या ठिकाणीं हिंडत असतांना रामचंद्रास पुष्कळ नद्या लागल्या तथापि अयोध्या नजीक जी शरयू नदी आहे ती त्याचे मनांतून कधीं गेली , नाहीं. तद्वत् शिवाजीच्या ताब्यांत जरी पुष्कळ किल्ले आहेत, तरी पुणें प्रांत तुमच्या ताब्यांत आहे, या गोष्टीचें स्मरण त्याला वरचेवर होतें.

षाहिस्तेखान— " दिल्लीच्या बादशहाची ताबेदारी पत्करण्यास शिवाजीस काय हरकत आहे ?

शास्त्री बोवा— " चातक पक्षी आपली इच्छा चंद्राला कळविण्यास असमर्थ असतो परंतु चंद्राचा स्वभाव जात्याच दयाळू असल्यामुळें तो होऊनच चातकाची इच्छा तृप्त करतो. थोर मनुष्याचें वर्तन नेहमीं याच प्रमाणें असतें. पुणें आणि चाकण हे दोन्ही प्रांत शिवाजी महाराजांच्या ताब्यांतून गेले आहेत आणि ह्मणूनच तहाचें बोलणें लावण्याला त्यांना शरम वाटते. आपण शूर व उदार आहां, जे काय द्याल तेवढ्यावरच संतोषित राहण्यालीं त्यांच्या कडून कसूर होणार नाहीं. "

या उत्तरा बरोबर झालेला आनंद शाहिस्तेखानाला दाबतां येईना तो ह्मणाला— " आपल्या विद्वत्तेनें मी फार खूष झालों !!! संस्कृत भाषा खरोखरच फार चांगली आहे. तह करण्याची शिवाजीची खरोखरच इच्छा आहे काय ?

शास्त्री—संस्कृत श्लोकांतः—

दिल्लीपतीच्या सैन्यापुढें आमचा पाड तो काय? आह्मी अगदीं भिऊन आणि गांगरून गेलों आहोंत; आणि दयानिधे आमचें रक्षण कर. अशी ईश्वरापाशीं सारखी प्रार्थना करीत आहों.

षाहिस्तेखानः— " हां ! हां ! तुह्मी खरोखरच तह करण्याच्या इराद्यानें आला आहांत असें वाटतें. बरें तुह्मी काय काय अटी कबूल करणार आहात ? "

शास्त्री बोवांनीं खिशांतून एक कागदाचें पुडकें बाहेर काढिलें आणि तें खान साहेबापुढें पेश केलें.

खानसाहेब— " ओहो. मी फार खूष झालों "

शास्त्री— " ज्या अर्थी लढाईत आपणाला जय मिळाला आहे त्या अर्थी आपणा बरोबर लढाई करण्याची शिवाजीची इच्छा नाहीं. "

खानसाहेब— " दिल्लीपतीचें वर्चस्व कबूल करून त्यांच्या सांगण्या प्रमाणें वागण्याची कबुलायत करून द्यावी.

शास्त्री— " आपली आज्ञा मी शिवाजी महाराजास कळवीन व नंतर ते आपला विचार आपल्यास कळवतील.

खान— " शिवाय मोंगलांनीं ताब्यांत घेतलेले सर्व किल्ले मोंगलाकडेसच राहून द्यावेत; सिंहगड आणि त्याच्या नजीकचे किल्ले याजवरील ताबा शिवाजीनें सोडावा.

" खरेंच ! आणखी थोडें सांगावयाचें राहिलें; शिवाजीच्या ताब्यांत जो मुलूख आहे त्या मुलखाचा ताबा जाहागीर ह्मणून शिवाजीनें ठेवावा. दिल्लीच्या बादशास प्रतिवर्षीं

( पुरवणी पाहा )

साल अखेर „ ७ „ १ ८८

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ रु६

दुसरे खेपेस .... ....  ....८१

Six monthly......... 3 ............... 8 as

Single copy ............................ 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

REGISTERED N. No. 4 .3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 12 AUGUST 1901 NO 31

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १२ माहे आगस्ट सन १९०१ इ० अंक ३१

### THE RANADE MEMORIAL

—:0:—

I wish to offer a few remarks on the letter published in the last issue of your journal under the signature "Voice" Mr. Justice Ranade was indeed a great man. He did live in Bombay Presidency; he did move in Bombay and Poona and toiled and laboured for the good of the country in Deccan. But it must be noticed that his deeds were not local but national. He did not only love the Brahmins of the Deccan, but he had whole of India's good at his heart. He did not strive only to improve the social, moral and political condition of the Bombay Presidency but he extended his labours beyond it and his sphere of activity covered the whole country. Your correspondant "Voice" will not dispute this; but if he has any doubts on the point, I refer him to the several important speeches delivered in the Town Hall of Bombay and Poona by intellegent and learned gentlemen European and Native, on the occasion of passing resolutions to perpetuate Mr. Justice Ranade's Memory. Especially I refer him to remarks made by Professor Selby in the course of his speech in the Poona Meeting.

Professor Selby said "It seems to me that we get the truest idea of the man, if we think of him as approximately to the platonic ideal of the philosopher namely, not merely a man with great intellectual grasp or deeply versed in matters beyond the comprehension of the vulgar but one who combines in himself the faculties of the sage, the saint and the patriot. Surely too Mr. Ranade was a patriot if ever the e was one. You all know how well he loved his country and his people. He was proud of every thing good they had done in the past. He looked forward with confidence to greater achievements for them in the future."

It is these qualifications of Mr. Ranade that command respect and admiration and demand public tribute to his memory not only in the Presidency where he worked but even in the whole country. Such ideals ought to be before the young generations for their future guidance. A separate memorial in this Province will therefore be most desirable and welcomed by the people. If this is not to be done I agree with "Voice" and suggest that a provincial subscription should be raised and remitted either to Bombay or Poona as our quota.

But I hope I may not be misunderstood. By eulogizing the services and qualifications of Mr. Justice Ranade, I do not mean in the least to disregard those of our little Ranade Mr. V. M. Mahajani. I fully endorse all what was said by your "Voice" in letter in connection with Mr. Mahajani. But, it must be noted that when I wrote the letter his retirement was not publicly anounced. Consequently I could not say any thing on the subject. It is a controversial point to say whether there is any necessity of having memorials during the life time of one whose memory is to be perpetuated. Memorials can be found of those British Officers who have retired and left the country and gone to England but memorials of Indians during their life time are rare. Mr. Mahajani is so well known in Berar and has got such a large circle of friends and students in the Province that he cannot possibly be forgotten especially by his students. If any movement is, therefore, set on foot in connection with perpetuating his name, I will be the first man to contribute my humble quota to the Memorial Fund that will be collected for the purpose.

Ellichpur G. N. S.
7—8—1901.

---

### स्वामी हंसस्वरूपजी महात्मा यांचें व्याख्यान.

[ नागपूर वऱ्हाड टाईम्स २०।७।०१ ]

सनातम धर्माविषयीं, अलीकडे प्रेमाचा अतिरेक झालासा दिसतो. पण अत्यंत खेद वाटतो कीं, कशास कांहीं मेळ नाहीं अशीं त्यांतील रहस्यें बाहेर येऊं लागलीं आहेत. आह्मांस वाटतें कीं, जें कांहीं बिघडलें आहे, तें नीट करण्याची ह्या धर्माभिमान्यांनीं, उठाठेव न करितां तें आहे तसेंच राहूं दिलें, तरी पुष्कळ होईल. कारण कीं तें नीट करण्याचा रस्ता कांहीं यांस सांपडत नाहीं. याकरितां त्याची दुरुस्ती करणारा पुढें कोणी निघाल्यास त्यास मग तितकें कठीण तरी जाणार नाहीं. आतां या सनातन धर्मावर लोकांचा थोडासा विश्वास राहिला आहे तो उडविण्याचा तुमचा हेतु नसल्यास मौन धरिलें तर ठीक होईल. आमचें आग्रहाचें सांगणें आहे कीं, लोक अगोदरच भ्रमाचे समुद्रांत बुडत आहेत आणखी खोल पाण्यांत त्यांस नेऊं नका, पण हें सांगणें कोणी ऐकेल तेव्हां!

दगड, धोंडा, पिंपळ, वड, गाय, यांची पूजा कां करावी हें स्वामींनीं सांगितलें आहे. 'सर्व एतत् ब्रह्म' या महा धर्म तत्वामुळें ही पुजा यथार्थ आहे असें स्वामी सांगतात. अहो! हें आद्यंत रहित विश्व ब्रह्मच आहे हें जर खरें आहे तर त्यांतून दगड, धोंडा, पिंपळ, गाय, हेच पदार्थ निवडून कां काढिले? याचें समाधान होत नाहीं. ब्रह्म सर्व व्यापी आहे, नव्हे, सर्व ब्रह्मच आहे तर पूजा तरी कोणी कोणाची करावी?

'फुलांतील सुगंध, दिव्याचा उजेड पाण्याचा थंडपणा हें ईश्वरी तेज आहे' असें सांगण्यांत येतें. आह्मी ह्मणतों, प्रत्येक पदार्थांतील धर्म ईश्वरी तेज आहे, तर फुलाच्या पाकळ्या फुलाचा पराग, त्याचा आकार त्याचा रंग, त्याचें वजन, सारांश, हें त्याचें जड शरीर ईश्वरी तेजाशिवाय आहे काय? तें निरवलंबी आहे काय? तें स्वतः सिद्ध आहे काय?

'पिंपळाचा वृक्ष हा सर्व वृक्षांचा राजा ह्मणून त्याची पूजा करावी. राजाची ह्मणजे बलिष्ठाची पूजा केली ह्मणजे कनिष्ठाची केल्या प्रमाणें होते ह्मणून त्याची पूजा करावी.' हीं शंकासमाधानें आतां नकों आहेत. या संबंधानें आमची जी पुढें चाल होत आहे तिला धक्का देऊन शतकेंच्या शतकें आह्मांला मागें नेऊन टाकणार काय? ग्राम्य पशूंची व हिंस्त्र वनपशूंची, पाषाणांची, महा नद्यांची, महा वृक्षांची, सरपटणाऱ्या जंतूंची, अंतराळांत उडणाऱ्या पाखरांची, आणि चंद्र, सूर्य, तारे यांची देखील पूजा कां करावी, यांतील गूढ समजण्याची आह्मांला कांहीं इच्छा नाहीं. हे सर्व जड पदार्थ निरवलंबी नाहींत. त्यांचा कर्ता व नियंता निराळाच आहे, त्या एकाची, एकट्याचीच मात्र, पूजा कां करावी, व कशी करावी, हें कोणी सांगेल तर बरें होईल.

वेदें ग्रंथ आह्मांस मान्य नाहींत असें ह्मणतांच यावयाचें नाहीं. पण आमचे आचरण अगदीं वेदबाह्य आहे. मूर्तिपूजेंत आमच्या आत्म्याचें ऐक्य झालें आहे. तरी वेद प्रतिपादित धर्म कोणता, हें सांगत असतां. पंडित दयानंद सरस्वती सारख्या धर्मशास्त्र पारंगतांनीं या गोष्टीचा निषेध केला आहे. तेव्हां खरें कोणतें? तें कीं हें?

हिंदु धर्माचें आयुष्य आज पर्यंत किती झालें हें देखील स्वामींनीं नक्की सांगितलें आहे.—(स्वामींचें ह्मणणें निराधार नसेल, पुराण ग्रंथांत किंवा अन्य ग्रंथांत त्यास आधार असेल,) ख्रिस्ती धर्म, इस्लामी धर्म, बौद्ध धर्म इत्यादि अनेक धर्म या पृथ्वीच्या पाठीवर चालू आहेत, पण हिंदु धर्माचें हें एक गौप्य समजल्यापासून या अन्य धर्मांस धर्मच ह्मणावें कीं काय तें कळत नाहीं!! स्वामी ह्मणतात:— "हिंदुधर्म हा फार प्राचीन असून पक्का आहे. या धर्माला, १९६०,०००,००० इतकीं वर्षें होऊन गेलीं." किती? एक अब्ज शहाण्णव कोटी वर्षें!!! आणखी "त्यावर आजपर्यंत (चालू मिति पर्यंत कीं काय) अनेक संकटें आलीं तरी तो नशाचा तसाच आहे याचें तरी हेंच कारण आहे" अहाहा! केवढा अद्भुत हा लाभ? अशा माहितींनीं भरलेल्या व्याख्यानांचें पाठबळ मिळालें ह्मणजे धर्माचा प्रकाश सूर्य प्रकाशाला लाजवील! कृतायुग, त्रेतायुग, द्वापर आणि काल, मिळून सरासरी साठ सत्तर लक्ष वर्षांची काल गणना करीत असतात. पण या चाऱ्ही युगांच्या एकत्र काळाची शतपट केली व तिची आणखीं दुप्पट केली तर मात्र हिंदुधर्माच्या आयुष्याच्या पासंगाला ती पुरेल. या धर्मावर आलेलीं संकटें व त्यांचें निवारण हेंहि स्वामीस ठाऊक आहे. आतां हीं संकटें साठ लक्ष वर्षां पूर्वींची किंवा नंतरची आहेत हा खुलासा झाला नाहीं तो पुढें केव्हां तरी होईल.

आमच्या देशांत इंग्रज सरकारचें राज्य सुरू झाल्यापासून इतिहास शोधनासही सुरुवात झाली. कारण इंग्रज लोक इतिहास शास्त्राचे मोठे भक्त आहेत. त्यांचे प्रयत्न आणि त्यांच्या मदतीस आमचे प्रयत्न लागले, तेव्हां इ. स. हजार पासून त्रोटक इतिहास ठाऊक झाला. आणि अखंड इतिहास समजण्याचा काळ तर गेल्या दोन तीनशें वर्षांचाच आहे. त्या पूर्वींची माहिती व अशोक, विक्रमादित्य, पृथ्वीराज, यांचे वेळची माहिती, शिलालेख वगैरेंचें सहाय्य घेऊन महत्प्रयासानें कशी तरी मिळवितां आली. सारांश तीनशें वर्षांपूर्वींची खरी माहिती मिळविण्यास आमचेपाशीं साधनें नाहींत, तर कोट्यानुकोटि वर्षांची खबर आह्मीं सांगतों, यावरून काळाच्या विराट व विश्वव्यापी स्वरुपाची कल्पना देखील आह्मांस नाहीं असें ह्मटलें तर काय वाईट? असलीं विधानें आह्मीं खरीं मानावीं, हाच प्रस्तुत काळचा महिमा असेल तर सुधारणेच्या कोणच्या मजले पर्यंत आह्मीं येऊन पोंचलों तें समजण्या सारखें आहे. आह्मी इतर धर्मांस नावें ठेवितों, परधर्मी आमचे धर्मास ठेवितात हें चालूच आहे. त्यात वैषम्य वाटण्यासारखें काहीं नाहीं. पण परधर्मास नावें ठेवण्याकरितां आपल्या धर्माची लांबी किती समजावयाची याचा कांहीं तरी सुमार पाहिजे. अशा साधनांच्या बळावर आह्मी ख्रिस्ती लोकांशीं भांडावयास उठावयाचें ना? सुविचाराचे भक्कम पायावर रचलेलें त्यांचें भाषण, व त्यांचा सयुक्तिक कोटिक्रम मोडून काढण्याचा उपाय हाच कीं काय? त्यांचा युक्तिवाद मोडून काढावा असें क्रोध व मत्सर आह्मास सांगतात पण तो मोडतो कसा? आह्मांस वाटतें क्रोध व मत्सर यांच्याहून आणखीं कांहीं साधनें आमच्याजवळ असतीं तर बरें झालें असतें. "पदार्थ विज्ञान शास्त्र इकडील लोकांस चांगलें माहित होतें. विद्युदाकर्षण जें हल्लीं एकाद्या जाड्या प्रोफेसराला माहित आहे तें आमच्या इकडील लहान लहान मुलींना माहित होतें, व आहे. आकाशांत ढग येऊन विजा चमकूं लागल्या कीं, मुली आंगणात तांब्याचीं किंवा कांशाचीं पात्रें पडलेलीं असलीं तर तीं घरांत नेऊन ठेवितात व घरांत पहार किंवा लोखंडाचा जाडा

तुकडा असेल तो आंगणांत आणून टाकितात. " वगैरे वगैरे.

पुढें चालूं

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक श्रावण वद्य १३ शके १८२३

## स्कूल मास्तरास मारठोक

गेल्या आठवड्यांत अकोल्यांतील म्युनिसिपालटीची शाळा नंबर २ यांतील एका आसिस्टंट मास्तरास एका माण्यानें शाळेंत जाऊन खूप मारिलें. या संबंधाची जी हकीकत आह्मांस कळली आहे ती अशीः—

नंबर दोनच्या शाळेचे दोन वर्ग शाळा गृहांत अडचण असल्यामुळें बहीमनजी धर्मशाळेंत बसत असतात. त्या वर्गांतील एका वर्गाच्या शिक्षकानें मुलांस अशी ताकीद दिली होती कीं, वर्गांत विनाकारण कोणी मुलानें बोलूं नये. जो कोणी बोलेल त्यास वर्गाच्या शेवटीं बसवण्यांत येईल. या हुकुमाविरुद्ध एक मुलगा वागल्यामुळें त्यास मास्तरानें सर्वांच्या शेवटीं जाऊन बसण्यास सांगितलें. त्या प्रमाणें मुलगा शेवटीं जाऊन बसला. पण तो पुटपुटत गेला आणि मास्तरास शिव्या देऊं लागला. ह्मणून मास्तरानें त्यास छडीनें मारिलें, तेव्हां तो अधिकच शिव्या देऊं लागला. तेव्हां मास्तरानें त्यास आणखी चोप दिला. नंतर मुलगा रडत रडत घरीं गेला व थोड्या वेळानें त्याच्या घरचे दोन तीन पुरुष मुलाबरोबर शाळेंत आले, व ज्या मास्तरानें मुलास मारिलें होतें त्याला त्यांनीं यथेच्छ झोडिलें. हा धामधुमीचा प्रकार पाहून वर्गांतील लहान लहान मुलें रडूं लागलीं व एकच गोंधळ झाला. हा प्रकार झाल्यावर त्याच दिवशीं ह्मणा किंवा दुसऱ्या दिवशीं ह्मणा, मारणार भाटे व मार खाणार मास्तर हे उभयतां आपापलीं गाऱ्हाणीं घेऊन म्युनिसिपालिटीच्या व्हाइस चेरमन साहेबांकडे गेले. व्हाइस चेरमन साहेबांनीं एका पक्षास असें सांगितलें कीं, तुह्मी आपल्या हातीं कायदा घेऊन मास्तरास मारिलें, आतां आह्मांला काय करायाला सांगतां? व दुसऱ्या पक्षास सांगितलें कीं तुह्मी अविचारानें मुलाला मारिलें, त्याचें तुह्मांस प्रायश्चित्त मिळालें. यांत आह्मीं काय करावें? असें ह्मणून त्यांनीं दोघांसही कोर्टाचा रस्ता दाखविला. येणेंप्रमाणें हकीकत आह्मांस कळली आहे.

ही हकीकत खरी असेल तर मोठा भयंकर गुन्हा झाला असून त्याबद्दल कांहीं चौकशी न होतां तो गुडूप होण्याच्या मार्गास लागला आहे असें दिसतें. व्हाइस चेअरमन साहेबांनीं या कामांत जर न पडण्याचें मनांत आणिलें असेल, तर म्युनिसिपालिटीच्या इतर मेंबरांनीं तरी स्वस्थ बसणें बरोबर नाहीं. शाळेंतील मास्तरास कोणत्याही ग्रामस्थानें मर शाळेंत जाऊन मारणें या सारखा भयंकर गुन्हा संभवत नाहीं. सर्व लोक आपल्या मुलांस शिस्त लागावी, शिक्षण मिळावें, तीं शहाणीं व्हावीत या हेतूनें शाळेंत पाठवितात. व मुलांस शिस्त लावण्यासाठीं, शिकविण्यासाठीं आणि शहाणीं करण्यासाठीं त्यांजवर मास्तर नेमितात. त्या मास्तराचा जर लोक मान ठेवतील तरच मुलें ठेवतील हें उघड आहे. असें असून जर एखाद्या मुलाचा बाप किंवा पालक मास्तरास ठोकून पिटून सर्व मुलांसमक्ष त्याचा अपमान करील, तर तो पालक किंवा बाप सर्व समाजाच्या हेतूस अडथळा आणितो, व या संबंधानें तो सर्व समाजाचा वैरी समजला पाहिजे. आज जितके ह्मणून वयानें मोठे असे पुरुष आहेत ते सर्व कोणाना कोणा तरी शिक्षकाच्या हाता खालून गेलेले आहेत; व ज्यानें थोडाबहुत चोप खाल्ला नाहीं असा एकही मिळायाचा नाहीं. पण कोणा कोणाच्या बापानें किंवा पालकानें मास्तरास जाऊन ठोकिलें असेल तें कोण जाणे. शंभरांत असें एकही उदाहरण सांपडणार नाहीं. मार—ठोका वांचून आपलीं मुलें शहाणीं व्हावीं असें जे इच्छितात ते सोन्यावर हातोड्याचे ठोके मारल्या वांचून अलंकार करण्यास इच्छिणारे होत. असे जर कोणी असतील तर त्यांनीं आपलीं मुलें सार्वजनिक शाळेंत न पाठवितां घरांत बसवून ठेवावींत. आणि मंत्रानें किंवा जादूनें तीं शहाणी होतील अशी व्यवस्था करावी. जे शेंकडों लोक आपलीं मुलें शाळेंत पाठवितात ते मास्तरच्या छडीनें तीं शहाणीं व्हावीत ह्मणून पाठवितात. जादूनें शहाणा होणारा मुलगा सामान्य लोकांच्या मुलांत बसण्यास योग्य नाहीं.

आतां, यांत दुसऱ्या बाजूचा विचार आहे तोही आह्मांला कबूल आहे. तो हा कीं कित्येक शिक्षक मुलांचें वय आणि शक्ति हीं न पाहतां त्यास फार मारितात. पण मास्तराच्या स्थितींत जो कोणी आपणांस ठेवून पाहील त्यास असें कळेल कीं, केव्हां केव्हां असें होणें संभवनीय आहे. त्रास, व संताप हे मनुष्यास लागलेच आहेत. बरें शिक्षक मुलांना मारितो तो दुसऱ्याच्या मुलांला ह्मणून मारितो, त्याला दया नाहीं, तो मांग आहे असें आपण ह्मणतों. पण मुलांचे प्रत्यक्ष बाप किंवा पालक जे आपण ते कांहीं वेळां निर्दयाहून निर्दय आणि मांगाहून मांग बनत नाहीं काय? किती बाप व किती पालक आपल्या स्वतःच्या मुलांना शुष्क कारणा करितां मरे मरे पर्यंत मारितात आणि आठाठ दिवस आजारी करून टाकितात! आपलें मारणें मात्र दयाळूपणाचें आणि मास्तराचें मात्र निर्दयपणाचें हा कोठला न्याय? तुह्मी मुलांस दिवसांतून घटकाभर देखील शिकवित नाहीं आणि तुह्मांस त्यांचा इतका राग येतो; आणि बिचारा मास्तर सर्व दिवसभर चाळीस चाळीस पन्नास पन्नास मुलांना घेऊन बसून त्यांच्यापुढें आपलें डोकें फोडित बसतो, त्याला राग येऊं नये काय? हल्लीं इंग्रजी आहे त्यामुळें सगळेंच उलट झालें आहे. शिकण्याकरितां मास्तराकडे मुलें तर पाठवायाचीं आणि त्यानें मारिलें तर त्याला कोर्ट दाखवायाचें किंवा आपल्या हातींच पारिपत्य करायाचें. कमाल आहे लोकांच्या शहाणपणाची व समजुतीची!

बरें, हे विचार असोत. वरील मास्तरास दोन चार गृहस्थांनीं जाऊन भर शाळेंत मारिलें या बद्दल म्युनिसिपालिटी आणि लोक काय करणार? व्हाईस चेअरमन साहेबाप्रमाणें जर कांहींच करायाचें नसेल तर सर्व शाळा चालणार कशा? शाळेंत शिस्त राहणार कशी? मुलें शिक्षकाचा मान ठेवणार कसा? मास्तर लोक मुलांस 'रावसाहेब, रावसाहेब ह्मणून, न रागें भरतां व न बोट लावतां, जर शिकवूं लागले, तर मुलांचें शिक्षण होईल काय? व मुलें शहाणीं होतील काय? कोणी ह्मणेल बोट लावूं नका असें कोण ह्मणतो ? बेताबाताची शिक्षा करण्यास आमची हरकत नाहीं. पण शिक्षा बेताबेताची झाली किंवा बेता बाहेर झाली हें ठरवणार कोण ! दोन छड्या मारल्या तरी मुलगा घरीं रडत जाणार; आणि वळ पाहून बापास किंवा पालकास संताप येऊन तो शाळेंत जाऊन रागाच्या आवेशांत मास्तरास ठोकणार; याचा बंदोबस्त कसा करायाचा ! तेव्हां या संबंधानें पूर्ण विचार केला असतां असें दिसतें कीं, मुलाच्या बापानें किंवा पालकानें आपल्या हातीं कायदा घेऊन मास्तरास जाऊन ठोकणें हें सर्वथैव मंजूर करितां येत नाहीं. त्यानें मास्तरांच्या अधिकाऱ्यांकडेच फिर्याद नेऊन त्यांजकडून त्यास शासन करविलें पाहिजे. दुसरा कांहीं उपाय नाहीं. लोकांनीं मास्तरास जाऊन ठोकावें अशी जर लोकांस सवलत द्यायाची असेल तर उद्या पासून शाळा बंद कराव्या हेंच बरें. कारण जो मास्तर मुलांच्या समक्ष लोकांच्या हातचा मार खातो, तो मुलांवर वजन तें काय ठेवणार, त्यांस शिस्त तीं काय लावणार, त्याच्या हाताखालीं मुलें शहाणीं तीं काय होणार ? आणि मुलांस त्याबद्दल पूज्य—बुद्धि ती काय वाटणार ? दुसरें असें होणार कीं किरकोळ शिरकोळ माराकरितां प्रत्येक मुलगा आपल्या बापापाशीं जाऊन रडेल आणि ह्मणेल कीं " तुह्मी मास्तरास जाऊन ठोका. अमक्या अमक्याच्या बापानें मास्तरास ठोकल्यापासून ते आतां त्याच्या वाटेसही जात नाहींत. " अशा सारखीच गंमत होणार ना ?

ज्या गृहस्थानें गेल्या आठवड्यांत येथील एका मास्तरास मारिलें, तो खरोखर पूर्ण अविचारी असला पाहिजे. त्याच्या सारखा अविचार अतःपर होऊं नये, अशी जर ग्रामस्थांची इच्छा असेल, तर त्यांणीं मास्तरास उमेद देऊन व टेका देऊन मारणारावर फिर्याद द्यावयास लाविलें पाहिजे. म्युनिसिपालिटीस जर आपल्या शाळांची लाज राखायाची असेल तर तिनें आपल्या खर्चानें हें काम करून सरकारी शाळेंत जाऊन मास्तराच्या अंगावर हात टाकणाऱ्या इसमास इतर लोकांनीं कित्ता घेण्यासारखें कडक शासन होईल असें केलें पाहिजे. आणि मास्तराच्या गुन्ह्याची चौकशी करून त्यांनीं त्यास स्वतः दंड करावा किंवा बडतर्फ करावें किंवा वाटेल तें करावें. पण जेणेंकरून सर्व मुलें बिघडण्याचा संभव आहे अशी जी चाल पडूं पहात आहे तिचा चांगला बंदोबस्त झाला पाहिजे. 'अः, हा मरो किंवा तो मरो ' असें ह्मणण्या सारखी ही गोष्ट नाहीं. किंबहुना हा अपमान मास्तराचा नव्हे तर म्युनिसिपालिटीचा व सरकारचा आहे. सर्व माजिस्ट्रट, सर्वांच्या दृष्टीनें, न्यायच करितात असें नाहीं. ज्या कुटुंबांतील मनुष्यास दंड किंवा कैद झाली असेल, त्या मनुष्याच्या मित्रांनीं किंवा घरच्या माणसांनीं माजिस्ट्रेटास जाऊन ठोकण्यास काय हरकत आहे ! कारण, त्यांच्या हिशोबानें त्यानें अन्याय केला आहे. परंतु असें कधीं झालें आहे काय ? झालें नसल्यास, शिक्षेची भीति हेंच त्याचें कारण होय. माजिस्ट्रेटानें अन्याय केला असें घरच्या मनुष्यांस वाटल्यास ते अपील करितात मास्तरानें अन्याय केला असें वाटल्यास त्यावर अपील करणें हाच सरळ मार्ग होय. असें असून, मास्तराला लोक जाऊन ठोकतात यांचें कारण काय? त्याला ठोकिलें असतां शिक्षा होईल अशी भीति नाहीं हेंच कारण. ही भीति नसणें हें शाळा खात्याच्या व्यवस्थेस योग्य आहे काय? माजिस्ट्रेट काय, कमिशनर काय, डेपुटी कमिशनर काय, डायरेक्टर काय, इनस्पेक्टर काय आणि लहान मोठा मास्तर काय, राज्य व्यवस्थेच्या तत्वाच्या संबंधानें पाहिलें असतां तत्व येथून तेथपर्यंत एकच आहे. या करितां ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. आह्मी उमेद ठेवितों कीं म्युनिसिपालिटीचे तरुण मेंबर तरी या आपल्या स्वतःच्या अपमानाचा नेटानें विचार करून अपराध्यास खरमरीत शासन होण्याबद्दल हरएक प्रकारची तजवीज करितील.

## गदाप्रहार

—:०:—

पाटील पटवाऱ्यांचा नवा कायदा १९०० सालीं झाला तेव्हांच तो कायदा प्रजेच्या हक्काला मोठा बाधक आहे आणि त्या कायद्यानें पाटील पटवारी लोकांच्या वतनदारीला अडवा तिडवा प्रतिबंध घालण्यांत आला आहे अशा विषयीं सर्व प्रांतभर ओरड झाली. पण अरण्यांत रडणें जसें निरर्थक होतें तद्वत पाटील पटवाऱ्यांची तक्रार सरकारनें कानावर घेतली नाहीं. त्यांचा वतनदारीचा वंशपरंपरेचा हक्कसंबंध सरकारनें एकदम छाटून टाकिला, आणि निराशेनें त्यांना अवशिष्ट अधिकाराच्या भाग्यावरच समजूत करून घ्यावी लागली. गेल्या शनिवारच्या २७ जुलैच्या इंडिया ग्याझिटांत १९०० च्या कायद्यांतील ४ थें, १३ वें, १४ वें, व १७ वें कलम अशा चार कलमांत फरक केला आहे. या फरकाचा सारांश असा निघतो कीं पाटीलपटवाऱ्या वरील डिपुटी कमिशनरचें साम्राज्य फार जोरदार व मजबूत असावें.

नवीन फेरफार कलमावर न देतां त्यांचा बोध जलदी व्हावा ह्मणून त्याचा प्रकार आह्मी स्पष्टतेनें देतों.

( १ ) पाटीलपटवारी लोकांस योग्य कारणा बद्दल काढून टाकण्याला इतके दिवस रेसिडेंट साहेबांची मंजुरात लागत होती. पण या पुढें ती मंजुरात देण्याचें काम

कमिशनर साहेब करितील. पूर्वीचा मार्ग दीर्घसूत्री व लांबच्या पल्ल्याचा होता तो या पुढें साधा व सोपा झाला आहे ही गोष्ट चांगली झाली.

(२) पाटील पटवाऱ्याच्या कायद्या खालीं डिपुटी कमिशनराचे अधिकार जेव्हां असिस्टंट कमिशनर किंवा एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर चालवितात तेव्हां त्यांच्या ठरावावर अपिल डिपुटी कमिशनर साहेबाकडे चालेल. पण या अपिलाला मुदत ३० तीस दिवसांची आहे. डिपुटी कमिशनरचा हुकूम शेवटचा समजण्यांत येईल. त्यांनीं केलेल्या अपिलाच्या ठरावावर दुसरें अपील नाहीं.

( ३ ) डिपुटी कमिशनर जो मूळचा हुकूम देतील त्यावरील अपिल कमिशनर साहेब घेतील. अपिलाला मुदत फक्त ६० दिवसांची आहे.

( ४ ) अलिशान रेसिडेंटकडे दुसरें अपील करण्याचा हक्क यापुढें काढून घेण्यांत आला आहे.

( ५ ) एक रुपयापर्यंतच्या दंडाच्या शिक्षेवर अपिलच नाहीं.

( ६ ) तसेंच ज्या पाटील पटवाऱ्यांचा वार्षिक मुशाहिरा ४२० रुपयाहून अधिक नाहीं अशा पाटीलास किंवा पटवाऱ्यास जर डिपुटी कमिशनर कोणताही दंड करितील किंवा त्याला ते सस्पेंड करितील तर डिपुटी कमिशनरानीं केलेला दंड किंवा फर्मावलेली सस्पिंडी यावर अपील चालणार नाहीं.

ही शेवटची गदा फार भयंकर आहे. ४२० रुपयापर्यंत मुशाहिरा घेणारे पाटील व पटवारी यांच्यावर सर्व सत्ताधीश डेपुटी कमिशनर झाले. आणि त्यांच्या सत्ते अन्वयें दंडाचा किंवा सस्पिंडीचा जो हुकूम सुटेल ती देवाज्ञाच होय. ४२० रुपया पेक्षा अधिक रुसुम घेणारे पाटील पटवारी फारच थोडे निघतील आणि त्यांस मात्र कमिशनर साहेबाकडे दाद मागण्याचा अधिकार आहे.

पाटीलपणाची किंवा पटवारीपणाची वतनदारी वडिलार्जित आहे आणि ती वंशपरंपरेनें चालणारी आहे ह्मणून ही जुनी वतनदार मंडळी पुष्कळ पैसा खर्च करून ती वतनदारी आपल्या घराण्यांत जिवां पलीकडे बाळगीत असतात. नवा कडक कायदा त्यांनीं नीट तपासून पाहावा ह्मणजे त्यांस आढळून येईल कीं त्यांची वतनदारी जाऊन तिला दास्यत्वाचें किंवा गुलामगिरीचें स्वरूप आलें आहे.

या चाकरीला वतनही अगदीं थोडें असतें आणि अधिकाऱ्यांच्या सरबराईचा व दंडेलीचा बडगा मात्र फार जबरदस्त असतो.

## व्हिक्टोरिआ स्कालरशिप

लेडी कर्झन यांनीं एक स्त्रियांचा निराळा फंड उभारला आणि त्या स्मारकाच्या फंडांतून 'व्हिक्टोरिआ' या नामामृतानें सुईणीचा धंदा शिकविण्याची योजना करण्याचा संकल्प केला. या फंडाची उभारणी सर्व देशांतील कुलीन, प्रमुख व वजनदार प्रांतिक स्त्रीवर्गाच्या हातून करविण्यांत आली. या प्रांताचा पुढाकार क्राफर्ड बाईसाहेबांनीं घेतला होता आणि त्यांच्या वजनदारीनें व लोकप्रियतेनें या प्रांताची वर्गणी १५३६३ रुपये जमली. हा वर्गणीचा आंकडा मोठा आहे आणि तो या प्रांताच्या मानानें चांगला शोभणारा आहे असें आनररी सेक्रेटरी लेफटनंट कर्नल केन सी. आय. ई. यांचा अभिप्राय आहे. एकंदर रकमेच्या मानानें वऱ्हाडला दोन स्कालरशिपा मिळतील असा क्राफर्ड बाई साहेबांचा अंदाजा आहे.

जिल्हेवारीनें वर्गणीची जमा अशी आहे:

| | रुपये |
|---|---|
| उमरावती | ४०८९- ८ |
| आकोला | ३८७९ |
| इलिचपूर | ३११७ |
| बुलढाणा | १९६३ |
| वाशिम | १३१७- २ |
| वणी | २६० |
| प्रांतिक शाळा | ७३७- ६ |
| | रुपये. १५३६३ |

झाडेगांव प्रगणे राळेगांव तालुका केळापूर येथें 'पूर्णचंद्रोदय' नांवाची लायब्ररी स्थापन करण्याचा समारंभ गेल्या जुलैच्या २८ वे तारखेस झाला. अध्यक्षस्थानीं रा. रा. गोपाळराव देशमुख जहागिरदार हे होते. गांवांतील प्रमुख गृहस्थांनीं ४९ रुपये वर्गणी दिली आणि १२ गृहस्थांनीं १२ वर्तमानपत्रें आपल्या खर्चानें पुरविण्याचें कबूल केलें. लायब्ररीच्या सुव्यवस्थेसाठीं मंत्रिमंडळ नेमण्यांत येऊन सभा बरखास्त झाली. हा सर्व उत्सव मोठा नामी झाला.

The Berar Samachar

MONDAY AUGUST 12 1901

The Victoria Memorial promises to be a grand success. It is a favourite topic with the people. All people, rich and poor, join together to perpetuate the sacred memory of their late beloved Sovereign. People contribute to the Memorial Fund in a liberal spirit of emulation. There are a thousand and one subscription lists in these days; and the general fate of memorial movements is that they die away in course of time. The palsy hand of time sweeps away every thing from the public mind but it fails to have this usual effect in the matter of the Victoria memorial. This question is as fresh as new today. Large and liberal contributions are flowing in from all directions and it seems now a matter of human certainty that the proposal of Lord Curzon will soon develop in a huge, magnificent and majestic Victoria Memorial Hall at Calcutta. The Hall will be worthy of the past traditions and the highest excellence of the Indian architecture. This monumental memorial will symbolize the imperial greatness of India in a permanent form. Lord Curzon's proposal is called the *all—India* memorial. It is distinguished from all provincial memorials. It does not come in the way of provincial memorials. It has however a claim upon the provincial contributions and this claim each province has willingly allowed in order to make the *all—India* memorial a grand and majestic one.

People do not stop with the memorial of the empire. Each province is going to raise a memorial to the good name 'Victoria.' Victoria is the name of a household deity in India. Her name is enshrined in the heart of each and every Indian. It will be handed down to posterity as a sacred legacy. She is deified as the protecting angel of the British empire. Her name will inspire in the mind of our rulers a kind regard, a noble spirit and a righteous fellow—feeling for her loyal subjects in India. Her august reign is considered as the key—stone of the whole fabric of the future prosperity of the Nation. It is in this light of perpetuating her sweet and sacred memory that each province is doing its level best to raise as great a fund as will enable the Indian people to attain to excellence in material progress and to command respect and admiration at the hands of the ruling people.

Material wealth is the outcome of highly devloped industrial and commercial life. We follow the footsteps of the Western nations and are desirous of having technical institutions in all provinces. This is to be the beginning of the new national life in India. It will build up our future fortunes and if we can forsee and interpret our future possibilities in the light of hopes that have taken a deep root in the reign of Her late Imperial Majesty Victoria the Good.

In Berar, the subscriptions are expected to rise above one lac and a half. Ten thousand Rupees will be allotted to the *all—India* memorial at Calcutta and the rest of the fund will be utilized in establishing a technical institute in Berar. This is a worthy project and it is hoped that the object of the memorial itself will appeal strongly to the liberal hearts of the people. Rao Bahadur R. N. Mudbolkar has proposed a scheme of a technical schooll The initial cost of a building with the necessary apparatus will come to between 50 and 65 thousand rupees. The annual expenditure will not be less than 8000 Rs. To meet this it is necessary to raise the fund to the amount of 2 lacs and a half. But this does not seem to be possible if we take into consideration the extent of the province and the present down—trodden condition of the people. The scheme is only feasible if we succeed with our Government to get an annual contribution of five thousand Rupees from the funds of the Local Boards. We hope that that an appeal made to the Local Government will not fail to enlist their sympathies and liberal support to a technical school which is going to immortalize the name of Victoria the Good. It is high time to move in this direction. By the by while all leading citizens will popularize the memorial fund and will raise a large amount of contributions it is is imperative upon us to place our proposal before the District Boards and to call upon them to promise a modest and decent annual contribution towards the expenditure of the proposed technical school in the province. We hope our Executive Committee of the Memorial Fund every success in their programme and hope to see ere long a Victoria technical school in Berar.

## वऱ्हाड

रा. रा. कृष्णराव गणेश सहस्रबुद्धे यांस शेतकी खात्याचे जिल्हा इनस्पेक्टर नेमण्यांत आलें असून सध्यां त्यांच्या कडे अकोला व बुलडाणा या दोन जिल्ह्यांचें काम दिलें आहे.

मि. शेख इस्मायल एक्स्ट्रा आसिस्टंट कमिशनर, हे मि. सुब्रावलू नायडू यांच्या रजेंत बुलडाण्यास होते. ती रजा संपतांच त्यांची बदली यवतमाळास करण्यांत आली.

आणि मि. किंग एक्स्ट्रा आसिस्टंट कमिशनर हे रजेंत असल्या कारणानें त्यांच्या जागीं मलकापुरास मि. प्राइस यांस यवतमाळाहून बदलण्यांत आलें.

आज पासून सेशन कचेरी येथें अकोल्यास भरणार आहे.

रा. रा. आंबाप्रसाद गिरधारीलाल पांडे हे अकोल्यास १ ले वर्गाचे चीफ कानस्टेबल होते. त्यांनीं चालू माहिन्या पासून पेनशन घेतली आणि आठ दिवसा पूर्वीं उमरावतीस आपल्या घरीं राहण्याला गेले. यांच्या चाकरीला ३३ वर्षें झालीं. यांच्या चाकरींत एकही डाग नाहीं ही मोठीच गोष्ट होय. यांची कारवाई मोठ्या युक्ति प्रयुक्तीची असून यांनीं लोकांकडून चांगुलपणा संपादला हें कळविण्यास आनंद वाटतो. ईश्वर यांस पेनशनीचा उपभोग दीर्घ काल देवो!

सन १८८१ चा आक्ट नंबर ५
कलम ६९ प्रमाणें     क्लास १९
दि० कि० मो० नंबर   २

१९०१

विद्यमान दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा उमरावती यांचे कोर्टांत.

१ रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे राहणार उमरावती.

२ रा. यशवंत गोविंद केसकर राहणार उमरावती.

३ रा. विश्वनाथ काशीनाथ काळे राहणार उमरावती.

ता० उमरावती.

४ रा. सखाराम नारायण जोग } राहाणार
५ रा. विनायक गोविंद जोग } कोल्हापूर

यांस मयत प्रल्हाद नारायण जोग रहाणार उमरावती. यांचे इष्टेटीचे प्रोबेट मिळावे ह्मणून सदर्हू अर्जदार यांनीं अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास या जाहिरातीनें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २६ माहे आगष्ट सन १९०१ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

R. P. Colomb

उमरावती दि. क. आफिस ता० ५ आगष्ट १९०१ } Dy. Commissioner & District Judge Amraoti District.

नोटीस

नोटीसे बेशमी तुळसाबाई मर्द लक्ष्मण कुंभार राहणार अनी मिरजापूर तालुके आकोला पोस्ट बोरगांवमंजू इसः—

खालीं सही कारणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं माझा माऊ नांमे महादू वल्लद लक्ष्मण राहणार अनी यानें आपले अनी--मिरझापूर येथील खडक रस्त्यावर बरील शेत १९ रुपयास ३ वर्षे पर्यंत ह्मणजे १८९८-९९-१९०० अखेर तुह्मास वहीतीस दिले होते माझा माऊ सुमारे आज १ वर्ष झाले मरण पावला. ह्मणून मी तुमची वहितीची मुदत संपली ह्मणन शेत वापस मागू लागलों असतां तुह्मी माझ्या भावापासून खरेदी घेतले ह्मणून ह्मणता हे योग्य नाहीं. मी तुह्मास खरेदीखत दाखवा ह्मणून ह्मटले असतां तेही तुह्मी दाखविले नाहीं. यावरून तुमचे मनांत आमचे गरीबाचे शेत पचविण्याचे आहे तर असे न करिता तुमचे वाहीपेरे वगैरे बद्दल जो खांहीं खर्च लागला असेल तो मजपासून वेऊन माझे शेत मला वापस करावे. असे नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत न केल्यास मी रीतशीर तुमचेवर फिर्याद करून या नोटीशीच्या खर्चासुद्धा व कोर्ट खर्चा मुद्धां रूपये भरून घेईन कळावे ता. ९।८।०१ इ०

सही

बापु वल्लद लक्ष्मण धोतरे राहणार
अनी मिरझापूर हल्ली वस्ती
पळसो तालुके अकोला
निशानी खुद्द हातची

---

नोटीस

रा. रा. शंकर लक्षुमण देशपांडे राहणार आकोठ यांसः—

खालीं सही करणार यांजकडून अशी नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी सन १८९७ पासून सन १९०१ पर्यंत देशपांडेपणाचा आमच्या हिशाचा रुसूम सरकारांतून नेला आहे व आह्मास दिला नाहीं. पैकीं मागील तीन वर्षांचा रुसूम आमच्या हिशाचा तुमच्या पासून मिळविण्या करितां आह्मी दिवाणीत दावा करणार आहो. परंतु चालू सालचा रुसूम ह्मणजे सन १९००।१९०१ सालचा तुह्मांस वर्तमानपत्रांत, नोटीस दिल्या नंतर तुह्मी घेऊन गेले आहात सबब तुह्मास ह्या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत तुह्मी रुसूम आमचे हिशाचा सदरहू सन १९००—१९०१ चा मनीआर्डर करून पाटवून द्यावा. सदरहू रकम तुह्मी आठ दिवसांत न दिली तर तुमचे नांव पेएबेल आर्डर मधून काढण्या विषयीं दिपुटी कमिशनर साहेब याजकडेस पुन्हा अर्ज देण्यांत येईल, कळावे तारीख १० माहे आगष्ट सन १९०१ इसवी.

सही

गोंपाळ खुशालराव वकील
दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

सोलापुरास तमाशा झाला त्यांत बीभत्स गाणीं ह्मणण्यांत आलीं ह्मणून त्यांस शिक्षा झाल्या. बीभत्स गोष्ट कधींच कोणी करूं नये.

### विचित्र गोष्ट

आस्ट्रेलियांत एका जोडप्याचें अती अनिवार प्रेम होतें. पुढें स्त्री मरण पावली. तेव्हां नवऱ्यानें प्रेमातिशयामुळें तिच्या अंगावरील दागिने न काढतां तिला तसेच पुरलें. नंतर एका चांभारानें द्या द्रव्याच्या लोभानें तें प्रेत उकरलें व बोटांतील आंगठी निघेना ह्मणून त्या प्रेताचें बोट कापूं लागला तोंच तें प्रेत ओरडत उठलें व नवऱ्याकडे चालतें झालें! काय चमत्कार हा!

टोळांनीं मूल खाल्लें— हिंदुस्थानांत टोळ धाड आली असतां एका बाईनें आपल्या मुलाला टाकून पळ काढला. व पुढें टोळांनें त्या मुलावर यथेच्छ ताव मारला. विचित्र आहे. प्राणी लहान असला तरी असंख्य एकत्र मिळाले ह्मणजे मनुष्याचा निरुपाय होतो.

औदार्य व दातृत्व— हे गुण उत्तम कोटींतल्या मनुष्या खेरीज कोणाच्याहि अंगीं सांपडावयाचे नाहींत. परदुःखानें मन विव्हळ होऊन त्या बद्दल झिज खाणारे विरळा जनच होत. दानधर्माची बुद्धि पूर्व पुण्याई वांचून आठवत नाहीं. कारण संपत्तीची धुंदी मनुष्यास अंध व बेफाम करीत असते. भोपाळच्या माजी बेगम साहेब दुष्काळांत दररोज ३८ मण तांदूळ वाटल्या खेरीज त्या कधींहि अन्नग्रहण करीत नसत. शाबास त्या माउलीची! इतक्या तातडीनें गरीबाची कींव करणाऱ्याची थोरवी काय सांगावी! हें उदाहरण धनसंपत्तीनें मारून गेलेल्या छत्रपतींनींहि मनांत वागवावें.

ईश्वरी योजना — अपूर्व व अतर्क्य होय. धोलपूरचे महाराज परवा वारले व लागलींच त्यांच्या पत्नीनींहि एक दोन तासांनीं आपला देह ठेविला. असा योगायोग चमत्कारिक आहे.

पाण्याचें दुर्भिक्ष्य— एडन, बाकू, आस्ट्रेलिया व आफ्रिकेतील सोन्याच्या खाणीचे प्रदेश येथील पाण्याचें दुर्भिक्ष्य पाहून फारच आश्चर्य वाटतें. तिकडे तेल तुपा प्रमाणें पाणी विकलें जातें. एका ग्लासभर पाण्यास २ ते ६ रुपये पडतात. पसाभर सोन्याची भुकटी देऊन पोटभर पाणी खाणींतील मजूर लोक विकत घेतात. सोडावाटरची एक बाटली घेतली तर ४ रुपये पडतात.

ह्या देशांतील शिक्षणपद्धती संबंधानें सिमल्यास पुढील महिन्यांत सभा भरून ऊहापोह होणार आहे. व त्या निमित्त दर एक प्रांतांतून एक एक प्रतिनिधी जाणार आहे.

मद्रास सरकार गरीब शेतकरी लोकांच्या कल्याणासाठीं त्यांच्या स्थावर मालाचे तुकडे होऊं नयेत अशी तजवीज करण्याच्या विचारांत आहे.

गया प्रांतांतील दहा लक्ष लोक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जाचामुळें अन्नवस्त्रहीन झाले आहेत त्या गरिबांची कीव अधिकाऱ्यांस येत नाहीं ही खेदाची गोष्ट होय.

क्षयावर उत्तम उपाय— पुष्कळ चांगली मोकळी हवा व सूर्य प्रकाश हा होय. क्षयी मनुष्यानें ह्या दोन गोष्टींत आपला काळ घालवावा. हा सर्व रोगावर रामबाण व सुलभ उपाय होय.

पाण्यां खालून दर तासी तीस मैल जाणारी व एक एक आठवडा बुडून राहणारी अशी आगबोट रशियानें तयार केली आहे ह्मणतात.

राकेल तेल उघडें कधींही ठेवूं नये कारण थोड्याशा अंतरावर जरी दिवा आणिला तरी त्या तेलांतून एक प्रकारची वाफ निघत असते त्यामुळें तें तेव्हांच पेट घेतें. राकेल तेल वापणाऱ्यांनीं लक्षयांत ठेवावें. नाहीं तर भयंकर परिणाम होईल.

उत्तम कायदा— सर्व्हियांत प्रत्येक शेतकऱ्या जवळ ९ एकर जमीन असून त्याब द्दलची सर्व साधनेंही त्याजवळ पाहिजेत. शिवाय प्रत्येक गांवीं एक सार्वजनिक धान्यगृह असून त्यास प्रत्येकानें धान्य दिलें पाहिजे असा कायदा आहे. अशा ठिकाणीं दुष्काळ काय करणार?

लग्नाचा नवीन मासला— हा विधी ७२ च्या ३ ऱ्या आक्टाच्या सूत्रा प्रमाणें जो ज्यू, हिंदू, बुद्ध, सीख, जैन, पारशी, ख्रिस्ती किंवा मुसलमान नाहीं अशा लोकांत होत असतो. यास सारीं ९ मिनिटें व ९ रुपये लागतात. काल व पैसा या दोघांचाही व्यय नाहीं. हें लग्न रजिस्टर करते वेळीं I take you to be my wife असा मंत्र ह्मटला कीं सर्व आनंद सोहळा संपला. या धर्तीवर नागपूरचे एका केळकरांनीं आपलें लग्न नुकतेंच लाविलें. हा यांचा १६ वा विधी होय. ही सुधारणा आहे खरी!

झोंप घेणें फार वाईट— झोंप चांगली लागण्या करितां अनेक नवीन नवीन युक्त्या निघाल्या आहेत. स्वीडन देशांतील लोक एक हात रुमाल पाण्यानें भिजवून तो डोळ्यावर ठेवितात ह्मणजे डोळ्यांना थंडोसा येऊन झोंप तावडतोब येते. पण इतकी झोंप घेऊन आपण काय करणार? खरें पाहतां आपणांस आपल्या आलस्यरूपी नयनामृताचें अंजन घातल्या खेरीज आपण जागे होणार नाहीं. डोळे उघडून आपल्या खऱ्या स्थितीचें व परिस्थितीचें निरीक्षण करून प्राप्तकालास योग्य अशा उद्योगास लागलें पाहिजे. आपणांस झोंप घेतां कामा नये. पण उलटें जागे होण्याचीं रामबाण औषधें शोधून तीं रात्रंदिवस घेतलीं पाहिजेत. पहा विचार करा. उगीच झोंप घेऊं नका.

लार्ड राबर्टस यांस १ लक्ष पौंडाची देणगी देण्याचें ठरलें आहे.

लढाई— बोअर लोकांची सर्वस्वी वाताहात झाली आहे. ज्या प्रमाणें प्राणोत्क्रमणाचे वेळीं आपल्या शरिरास शेवटचे हिसडे देऊन जीव निघून जातो तद्वत बोअर लोक निराशेनें शेवटचे तरवारबंदुकींचे हात करीत आहेत. त्यांचा हिय्या मोठा खरा पण राष्ट्राची जीवनकलाच स्तब्ध झाली ह्या गोष्टीस उपाय नाहीं. बोअर लोकांचीं पाळीं मुळीं खणून काढल्या खेरीज इंग्रज बहादर शस्त्र हातांतून खालीं ठेवूं शकणार नाहींत. बोअर लोक ह्मणजे सिंहाचे बच्चे, पण निर्जीव अशा लोखंडी पिंजऱ्यांत त्यास ठेवल्यावर त्यांनीं कितीहि त्वेशानें दात ओठ खाल्ले तरी काय उपयोग.

प्रेसिडेंट क्रूगर क्रांजी, जोबर्ट, डीवेट वगैरे सारख्या देशासाठीं आकाश पाताळ एक करून सोडणाऱ्या वीरांच्या हातास यश प्राप्त झालें नाहीं ही दुर्दैवाची दुष्ट काहणी होय. क्रूगर साहेब स्वदेशास, व स्वातंत्र्यास तर मुकलेच पण आंना आपल्या प्रिय भार्येच्या मृत्यू बद्दलही दुःख करीत बसण्याची पाळी आली. ईश्वरास हेंच बरें वाटलें मग तेथें कोण काय करणार!

लार्ड किचनेर हे दिसेंबरमध्यें ट्रान्सवालचें समरांगण सोडून स्वदेशीं जातील व लगेच दोन तीन महिन्यांनीं हिंदुस्थानचे कमांडर इन चीफ होऊन येतील. किचनेर साहेब विलायतेस जाई पर्यंत लढाईची इतिश्री होईल असा सुमार दिसत नाहीं. मग कोण रणपंडित ह्या इतके दिवस निर्विघ्नपणें चालेल्या रण यज्ञाचा मुख्य अध्वर्यु होणार आहे कोण जाणे! एखादा कार्यकुशल मंत्री ह्या लढाईची परिसमाप्ति सर्व मान्य रीतिनें करील तर काय उत्तम गोष्ट होईल!

सर्पदंश— सुतना गांवीं एक बाई आपली दोन मुलें व एक मुलगी यासह रात्रीं झोंपली होतीं. झोंपेंत मुलास कांहींसे चावल्या सारखे वाटल्या वरून तो उठला पण आईनें तसेंच त्यास थोपटवून निजविलें. कांहीं वेळानें दुसऱ्यासही कायसें चावलें. तपास करण्या करितां दिवा वगैरे लाविते तों आईसही चावलें. येणेंप्रमाणें तिघेही मरण पावले. एकटी मुलगी फक्त राहिली. दुसरे दिवशीं लोकांनीं घरभर लूणून पाहिलें तों एक भले मोठें विषारी सापाचें जोडपें!

अमीर स्वचरित्रांत ह्मणतातः— "राजे हे परमेश्वराचे प्रतिनिधी होत; आणि परमेश्वराची इच्छा असते कीं, आपल्या प्रतिनिधींनीं सर्व प्राण्यांस जातीचा अथवा धर्माचा भेदाभेद न ठेवितां सारख्या प्रेमानें व सारख्या न्यायानें वागवावें. ही परमेश्वराची इच्छा सदैव लक्ष्यांत ठेवून राजांनीं निःपक्षपातपणानें वागावें व आपल्या प्रजेस जातिधर्माचा भेदाभेद न ठेवितां सारखे हक्क द्यावे. मनुष्याला स्वतःचे गुण आणि दुसऱ्याचे दोष दिसत असतात; व जगांतील प्राचीन व अर्वाचीन इतिहास धुंडाळले तरी एकराष्ट्रीयत्व वर्ण, जात आणि धर्म हा भेदाभेद न ठेवितां राजानें आपल्या प्रजेस सारखे हक्क दिल्य चें आढळून येणार नाहीं; परंतु जे लोक माझ्या राज्यांत नोकरीस आले, त्यांना मी आपल्या जवळच्या नातलगांपेक्षांही जास्त अधिकारावर नेमिले आहे, असें मी मोठ्या गर्वानें ह्मणतो. माझी प्रजा जितकी जास्त सधन होईल, तितकें राज्य जास्त शक्तिमान होईल. देशांत दंगेधोपे किंवा अस्वस्थता असण्याचें कारण पैसा आणि धंदे यांचा अभाव होय"

(पुरवणी पहा.)

विरक्त स्त्रिया— या गांवीं ( कसबा परळी, ता० आंबाजोगाई, जि० बीड ) नेहमी दोन चार स्त्रियां वेड्या सारख्या फिरत असतात. त्या नेहमी मोरींतील पाणी पितात. त्यांच्या आंगावर चिरगुटांवरूण फाटकें असतें. त्या कोणास उपद्रव करीत नाहींत. यांत एक गवळ्याची काशी ह्मणून एक बाई आहे. ही हमेषा तोंडास डांबर फांसून तोंड काळें करिते. खाण्यावर हिचे मुळींच लक्ष्य नाहीं, हिला कधीं भूक लागल्यास वाटेल त्या दुकानांत जाऊन पैसा मागते. तो त्यांणीं दिला ह्मणजे त्याचे कांहीं तरी घेऊन खाते. कोणी हिला पैशापेक्षां जास्त दिल्यास ती ते मुळींच घेत नाहीं. हिचा हात दुकानदाराच्या ज्या कोणत्या मालास लागेल तो माल ४।५ घंट्यांत विकून जाऊन त्या दुकानदाराला बराच फायदा होतो असें ह्मणतात- अशा विरक्त जनांचे जगांत काय कर्तव्य असेल बरें ! ध'.

नशीब उघडलें— ज्या रेलवे संबधानें देशी वर्तमानपत्रांतून तक्रारी प्रसिद्ध होतील त्या रेलवे कंपन्यांच्या व्यवस्थापकांनीं तक्रारीचे उतारे छापून स्थानिक सरकाराकडे व कंपनीच्या एजंटाकडे पाठवावें, असा हुकूम फर्माविण्यांत आला आहे. स.

NOTICE

Notice is hereby given that whoever has any claims for pay due or for materials supplied during the Late Famine to the Late Akola, Basim and Buldana Divisions, should put forward his claims to the undersigned within one month from the date of issue of this notice, after which no claims will be entertained.

27/7/1901 J. M. ROY

Offg. Executive Engineer
West Berar Division.

नोटीस

गंगा भागीरथी सईबाई नवजे मारुती पिंपरीकर राहणार पिंपळगांव. यांस:-

तुह्मास या नोटिसीवरून असे कळविले जात आहे कीं तुमचा अवरस मुलगा नामे शंकर मारुती हा ता. २८।७।०० इ० रोजी मरण पावला असून त्याजला वारस जवळचे मी व तुह्मी आहा, सदर्हू मैताचे नांवे मौजे पिंपळगांव येथील सर्वे नंबर ३३९ व मौजे पिंपरीखोद्री येथील सर्वे नंबर ८८ ह्या दोन सेताचे खाते होतें. सदरील खातेदार हा निवर्तल्या नंतर मयताची चवकशी होऊन तुमचे नांवे दोन्ही गांवचे सेताचा वर्ग ता० १४।४।१९०१ इसवी रोजी झाला आहे सदरहू जिनगी ही वडिलोपार्जीत मिळविलेली आहे. मैताचा मी साक्षांत चुलत चुलता असून सदरहू जिनगी संबंधानें व्यवस्था करण्यास व मैताचे कर्ज वगैरे फेडण्यास व तुह्मास अन्नवस्त्र देण्यास मीच फक्त अधिकारी आहे. आज १४।१५ वर्षां पासून तुह्मी रोगग्रस्त आहा. यामुळें तुमचा वारसा सदरहू जिनगीवर लागू शकत नसून तुह्मास अन्नवस्त्रा शिवाय कांहीं एक सदरहू जिनगी संबंधानीं व्यवस्था करण्यास अगर दुसरे लोकांस गाहाण, खरीदी अथवा बक्षीस देण्याचा अधिकार नाहीं. सदरहू मैताचे मागे मी वारस धर्मशास्त्रा प्रमाणें अधिकारी आहे व सालमजकूरी सदरहू दोन्ही सेतात एक हजार रुपयांचा माल झाला असून तुह्मी माझ्या वडील बंधूचे कुटुंब असून माझे वडिला प्रमाणें आहा व मैताचे कर्ज वगैरे आहे त्याची फेड सालमजकूरचे मालांतून तुह्मी करून तुमचे अन्नवस्त्राची सोय करावी असे मी तुह्मास चार संभावीत मनुष्याचे समक्ष सांगितलें असून तुह्मी कांहीं माझे सांगितल्या प्रमाणें मैताचे कर्ज दिले नाहीं. मालाची काय व्यवस्था केली हेही सांगत नाहीं सबब तुह्मास या नोटिशीनें असे कळवितो कीं ८ दिवसांत तुह्मी सदरहू संबंधानीं वर लिहिलेले रुपयांचा हिशोब दाखवावा व सेती माझे ताब्यांत द्यावी तसे न केले तर तुमचेवर दावा करून वारसा व गरा तुमचा केला जाईल हे पक्के समजावे. तारीख ६।८।१९०१ इसवी.

सही

गोविंद पुरुषोत्तम पिंपरीकर राहणार
जळगांव दस्तुर खुद्द.

जाहिरात.

या लेखानें सर्वत्र लोकांस असें कळवितो कीं मौजे पिंपळगावकाळे तालुके जळगांव जिल्हे अकोले येथील शेत सर्व्हे नंबर ३३९ एकर गुंठे २३८८ आकार रुपये ९६ याचें खातें शंकर मारुती पिंपरीकर याचे नांवें असून तो तारीख २८।७।१९०० रोजी मरण पावला आहे सदर्हू इसमाचे नांवे पिंपरी खोद्री तालुके जळगांव जिल्हे आकोले येथील सेत सर्वे नंबर ८८ एकर गुंठे ९८१० आकार रुपये २१ याचेही खातें त्याचेच नांवे होते. नंतर तारीख १४।४।१९०१ इसवी रोजी ह्या शेताचा मयताची आई सईबाई नवजे मारुती इचे नांवे वर्ग झाला आहे. परंतु तीही रोगग्रस्त असल्यामुळें तिजला अन्नवस्त्रा शिवाय दुसरा कोणतेही प्रकारे सदर्हू वडिलोपार्जित जिनगीवर हक्क लागू सकत नाहीं व विधवेलाही सदरहू इस्टेटी संबंधी गाहान, खरीदी, बक्षीस देण्याचा व्यवहार करितां येत नाहीं सबब असे कळविण्यांत येत आहे कीं वर लिहिलेली स्थावर इस्टेट जर सईबाई नवजे मारुती ईनें दुसरे कोणास गाहान, खरीदी अथवा बक्षीस दिल्यास घेऊ नये जर या इस्टेटी संबंधानीं हल्लीं नवीन कोणी व्यवहार केल्यास त्याजबद्दल, मी मैताचा चुलत चुलता आहे व सदर्हू वारसाचा हक्क मजकडेस हिंदुधर्म शास्त्रा प्रमाणें आला आहे, तर यापूर्वी सईबाईनी केलेला व्यवहार रद्द समजला जाऊन मी जबाबदार राहाणार नाहीं कळावे तारीख ६।८।१९०१ इसवी. सही

गोविंद पुरुषोत्तम पिंपरीकर राहणार
जळगांव दस्तुर खुद्द.

नोटीस

पुंजी मर्द निनु न्हावी हल्लीं कसबे चांदूर ता० मलकापूर इसः— खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तारीख ८।७।१९०१ इ. रोजी वैदर्भ पत्रांतील नोटीस पोचली. सज्ञान झाल्यावर तु माझे घरी पुष्कळ दिवस होती व तुझे माझे चांगले होतें आईबापाचे घरी पुष्कळ वेळ गेली व मीही चांदुरास १॥ वर्ष होतो. तेथून पुन्हा उभयता तेथें आल्यावर आपण उभयता माझ्या आईबापा पासून निराळे राहिलो नंतर तुझा आई येथें येऊन तुला ८ दिवसाचे करारानें घेऊन गेली तेव्हां पासून आजपर्यंत सुमारे १॥ वर्षे झाले तुला तुझे आई बापांनी व कोणी लबाड मनुष्यानें फुसलावण्यानें, आह्मी नेण्यास दोन चार वेळ आलो असत ही पाठविलें नाहीं. मजला कोणत्याहि प्रकारची व्यथा नाहीं हे मी सिद्ध करून देईन व तुझा व तुझे बापाचा हेतु पाठविण्याचा दिसत नाहीं व दिलेली नोटीस केवळ बनावटीची आहे सबब लग्नाचा खर्च रुपये १०० आणि वस्त्र ३० रुपये जवारी १२९, रु. १२५ व डागीने रुपये १२५ एकूण रुपये ५०५ द्यावें तो पर्यंत तुला दुसरीकडे घरठाव करण्याची मजकडून मनाई आहे.

( सही )

निनाजी वा माधोजी न्हावी
राहणार वडनेर बोलजी नि-
शाणी खुद्द हातची असें
दस्तूर बिसम.

नोटीस

बेशमी— नरसाजी वल्लद भोनाजी वाघ रहाणार पनज ता० अकोट, यांसः--

मी खालीं सही करणार; या नोटिशीनें असें कळवितें कीं, मी तुमची लग्नाची बायको आहे. व मला वयांत येऊन सुमोर ७।८ वर्षे झाली. वयांत आल्या नंतर कांहीं दिवस आपणा पाशींच राहिले होत. पण माझ्या सासऱ्याने मला माझ्या बापाच्या घरीं नेऊन घातलें त्यास आज ५।६ वर्षे होत आलीं. ह्या काळांत पुष्कळ वेळां मला घरीं नेण्याविषयीं माझ्या बापानें व आणखी पुष्कळ मंडळींनीं आपणांस विनंती केली पण आपण मला घरीं ठेवून जन रीती प्रमाणें न नांदवितां उलटे अंगावरील सर्व दागिनें काढून घेऊन घालवून दिले. तेव्हां पासून आज ६ वर्षे मी कर्ज काढून निर्वाह करीत आहे. आतां एवढेंच कळवणें आहे कीं माझे ५० रुपये साला प्रमाणें झालेले ३०० रुपये कर्ज देऊन मला घरीं घेऊन जावें. आपण दुसरें लग्न केलें आहे तरी मी आपणापाशी वागण्यास सिद्ध आहे. पण आपले मनांत मला वागविणें नसल्यास फारकती द्यावी व झालेले कर्ज फेडून द्यावें. येणें प्रमाणें ही नोटीस पोंचल्या पासून १५ दिवसांचे आंत माझ्या संबंधीं व्यवस्था न केल्यास मी हीच नोटीस फारकती समजून दुसरा गंधर्व लावीन मग तुमचा मजवर नवरेपणाचा वगैरे कोणताही हक्क चालणार नाहीं व कर्जाच्या पैशाबद्दल कोर्टात फिर्याद करून अखेर निकाला पर्यंतचे सर्व खर्च व या नोटीशीचा खर्च यासह रक्कम भरून घेतली जाईल. कळावें तारीख ६ माहे आगस्ट सन १९०१ इ०

( सही )

गंगी मर्द नरसाजी वाघ
रहाणार आकोट हिचे
हातची बांगडी.

नोटीस

बेशमी— शाम्या वल्लद लंगड्या महार रहाणार भोरगांव ता० बाळापूर (२) परश्या वल्लद शाम्या महार रहाणार अडुस ता० बाळापूर ( ३ ) रामू वल्लद गंभीर पाटील रहाणार हसनापूर ता० बाळापूर या त्रिवर्गांसः—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितो कीं, शाम्या महारानें आह्मां पासून एकदां ८० व ५० रुपये असें दोनदां कर्ज घेतलें होतें. त्याच्या फेडींत त्यानें आह्मांस गाडे एक, बैलाची जोडी, गाय, व त्याची हसनापूरची जागा इतकी उक्तीं खंडून दिलीं होती. व ही जागा आज आमचे ताब्यांत बरींच वर्षे आहे. असें असून परशा महारानें ती जागा रामू वल्लद गंभीर यांस परभारें विकून टाकली आहे असें एकतों. तर असें कळवितों कीं ही जागा आमची आहे व ती विकण्यास किंवा विकत घेण्यास कोणासच अधिकार नाहीं. असें असतां जर कोणी विकत दिली किंवा घेतली असेल तर ह्याबद्दलची जबाबदारी आमचेवर नाहीं. तो सर्व व्यवहार पोकळ व बातल असा समजावा. कळावें तारीख ७ आगस्ट सन १९०१ इ०

सहीची निशाणी

पूर्णाजी वल्लद माधोजी पाटील
रहाणार हसनापूर ता० बाळापूर
याचे हातची खुद्द.

नोटीस

गुजी मर्द सोनाजी लबडे रहाणार नेर प्रगणें व तालुके अकोट ईस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी गंधर्वाची बायको असून तूं सुमारे ४ महिने झाले तुझा भाऊ मारुती सावरकार रहाणार नेर याचे घरीं माझे पश्चात निघून गेली व जातांना सोन्याचांदीचे दागिने नेले ते खालीं लिहिले प्रमाणें.

१ बाळ्या सोन्याच्या चार तोळा १ किंमत रुपये २४
२ तांदळी पोत ऊर्फ गरसळी तोळा १ किंमत रुपये २४
३ नथ १ तोळ्याची किंमत रुपये २४
४ पायातील कडीं रुप्याचीं तोळे ४०
५ कोपरबाळ्या रुप्याच्या तोळे २१
६ हातांतले पोलट रुप्याचे तोळे ८
७ मनेरी गाठी तोळे १०
८ कंठी सात ७ तोळयाची

या शिवाय ३२ रुपये नगदी. अशा जिनसा व रुपये घेऊन भावाचे येथें पळून गेलीस. तर सदर्हू प्रमाणें वर लिहिलेले दागिने व रुपये घेऊन ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आमचे घरीं यावें. या प्रमाणें तुझ्या कडून न झाल्यास

रीती प्रमाणें कोर्टात दावा करून तुला दागिन्यासह घेऊन जाईन. खावटी वगैरे बद्दल पैसे मागितल्यास दिले जाणार नाहींत. कळावें तारीख ८ माहे आगष्ट १९०१ इ०

सही

सोनाजी वल्लद लक्ष्मण लबडे

रहाणार अकोट दस्तुर खुद्द.

---

नोटीस

बेशमी सदाराम खेमराज मारवाडी साहू दुकान कसबे आकोट आणि

| | |
|---|---|
| २ गुलाम हैदर वल्लद नूर महमद<br>३ अबदुल रहिमान वल्लद शेखअहमद<br>४ अबदूल वाहेद वल्लद शेखमहबूब<br>५ इनत बी मर्द महमद अनवर | इनामदार रहाणार आकोट |

या सर्वास:—

आह्मी खालीं सह्या करणार या लेखानें असें कळवितो कीं केमलापूर तालुके अकोट येथील शेत सर्व्हे नंबर २ ही इनामी जमीन आहे.

ही सदाराम खेमराज मारवाडी साहू यास.
गुलाम हैदर वल्लद नूर महमद.
अब्दूल रहिमान वल्लद शेख अहमद.
अब्दूल वाहेद वल्लद शेख महबूब,
इनत बी मर्द महमद अनवर.

यांनीं फारकतीसाठीं १२ वर्षांच्या करारानें दिलेली होती. असा करार त्यांनीं करून दिला खरा पण ह्या गोष्टीस आमची समती नव्हती व असा करार करून देण्याचा कोणास अधिकार नाहीं. वरील इनामदारांनीं शेती दिली व सदाराम यांनीं घेतली ही गैर कायदा गोष्ट केली. असो झाली तें झालें पण ही जमीन यापुढें सदाराम खेमराज मारवाडी याच्या कारखान्यासाठीं देण्याची आमची इच्छा नाहीं. सबब ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदाराम यांनीं आपला कारखाना दुसरीकडे न्यावा व आमची जमीन खाली करून द्यावी. येणें प्रमाणें मुदतींत न केल्यास आह्मी कोर्टांत दावा करून अखेर निकाल होई पर्यंतच्या सर्व खर्चासह जमीन ताब्यांत घेऊ. तोंपर्यंत सालीना ४०० रुपये सदाराम मारवाडी याच्या कडून घेतले जातील. शिवाय शेतांतील दर्ग्याच्या संबंधानें जी खैरात मिळते तिची व्यवस्था करण्याचें आह्मां इनामदारांचें काम होय. तर त्या खैरातीचा इतक्या वर्षांचा हिशोब देऊन राहिलेले पैसा आह्मास द्यावा. कळावे तारीख ७ आगस्ट १९०१ इसवी.

सहीची निशाणी खुद्द.

इनामदार रहाणार आकोट

( १ ) महमद हातम वल्लद शेख महबूब.
( २ ) अमीर उद्दीन "
( ३ ) शेख महमुद "
( ४ ) महमद हयात "
( ५ ) अबदूल खलील "
( ६ ) गुलाम हुसेन वल्लद शेख अहमद
( ७ ) गुलाम रसूल वल्लद शेख बिसमिल्ला

---

नोटीस.

बेशमी गुमान मर्द विठोबा जात रजपूत राहणार निमकहल ता. मलकापूर पोस्ट पिंपळगांवराजा. यांस:-

मी खालीं सही करणार असें कळवितो कीं माझा भाऊ ह्मणजे तुमचा नवरा मेल्यास आज बहुत वर्षें लोटलीं. इतकें दिवस आपण आपल्या आई बापांचे घरींच होता. येथें निमकहळ्यास येऊन सोरें वर्ष दीड वर्ष झालें. तुह्मांस मी अन्नवस्त्र भरपूर देत असतो. तुमची कांहीं एक इस्टेट नाहीं. असें असून तुह्मी कांहीं लबाड लोकांच्या नादास लागून आमच्याच इस्टेटीची विल्हेवाट लावण्याचा तुमचा रोख दिसतो. ह्मणजे आमची शेती घर वगैरे दुसऱ्या कोणास खरेदी, गहाण किंवा बक्षीस देण्या संबंधानें कांहीं लुच्चे लोक तुह्मांस सांगतात, व त्याचे ऐकून त्याप्रमाणें तुह्मी कदाचित् वागाल, ह्मणून कळवितो कीं, आमच्या इस्टेटी संबंधानें कोणचाहि व्यवहार करण्यास तुह्मांस अधिकार नाहीं. या उपर जर तुह्मी असला कांहीं व्यवहार कराल तर तो सर्व पोकळ व व्यर्थ होईल. कळावें तारीख ७ आगष्ट सन १९०१ इसवी.

सही

रामचंद्र माधव रजपूत पाटील तर्फे

माणिकराव रामचंद्र रजपूत पाटील

रहाणार निमकहळ तालुके

मलकापूर दस्तुर खुद्द.

---

जाहिरात.

या लेखानें सर्व लोकांस असें जाहीर केलें जातें कीं, गुमान मर्द विठोबा रजपूत राहणार निमकहळ ही माझी भावजय आहे. हिची कांहीं एक इस्टेट नाहीं. हिला आह्मी भरपूर अन्न वस्त्र देत असतो. पण आमचीच इस्टेट दुसऱ्याच्या नादानें ही कोणास बक्षीस, खरेदी, किंवा गहाण देईल तर कोणी घेऊं नये. असा व्यवहार कोणी तिजशीं केल्यास तो आह्मास बांधू शकणार नाहीं. कळावें तारीख ७ आगष्ट १९०१ इसवी.

सही.

रामचंद्र माधव रजपूत पाटील तर्फे माणिकराव रामचंद्र रजपूत पाटील. रहाणार निमकहळ ता. मलकापूर. द० खुद्द.

---

## नाग, नरसे, पिठोरी व जिवत्या.

आह्मी येथें विक्री करितां नाग, नरसे जिवत्या व पिठोरी किंवा पाठोडा व त्यांत बुध व बृहस्पती हीं चित्रें ठेवलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या पेक्षां त्यांत फरक करून उत्तम प्रकारचीं छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्त्यावर मनिआरडर पाठविली असतां सदहू चित्राचे कागद पाठवून देऊं. चित्रांचा दर शेंकडा १ रुपया प्रमाणें पडेल, व टपाल खर्च निराळा पडेल.

बाळकृष्ण अनोबा दलाल
कंपाझिटर.
वऱ्हाडसमाचार आफिस आकोला (वऱ्हाड)

---

गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय कृत.



## अचुक गुणकारी औषधें.

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधाच्या योग्यतेबद्दल व गुणांबद्दल सार्टिफिकेट ( दाखला ) मिळालें आहे. ज्वरांकुश—( तापावर रामबाण ) तीन दिवसांत हटकून हिंवताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. किं. रु. ट. व बंगी खर्च १८१

पूपरम्यावर वस्ताद—तीन दिवसांत हटकून गुण किं. रु. १ ट. व बं. खर्च ॥–

जुलाब, पोटदुखी व कॉलरा ( पटकी ) बंद करण्याचें वस्ताद औषध. प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें किंमत ०१२ ट. व बंगी खर्च ।=

शक्तीवरील गोळ्या— नंबर १ बलवर्धक शक्तिवर्धक पौष्टिक इ. विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३ ट. बं. खर्च ।–

सारसोंडाइन—देशी सारसापरेला, उपदंश, गर्मीचे चट्टे इ. उत्तम किं. रु. १ ट. व बंगी खर्च ६ आणे.

शक्तीवर गोळ्या—नंबर २ धातुपातावर सुस्तीवर, पानथरीवर, मुलाचे डब्यावर, अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १ ट. व बंगी तीन बाटल्यापर्यंत खर्च ।–

केस काळेभोर करण्याचा कल्प किं. रु. १। ट. व. बं. खच ॥–

रक्तपितीवर रामबाण—किं. रु. ६ ट. व बंगी खर्च १८–

खोकल्यावर गोळ्या—१०० गोळ्यास किं. ०१२ ट. व बं. दोन बाटल्यापर्यंत खर्च ।–

गजकर्ण अथवा खरजेवर मलम—किं. प्रत्येक डबीस ०६ ट. व बं. खर्च तीन डब्यापर्यंत ।–

नेत्र संजीवनी थेंब—किं० रु. १ ट. व बं. खर्च ।=

मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम— किं रु. २ ट. व बं. खर्च ।–

वायुनाशक तेल— किं. ८४ ट. व बं. खर्च ।=

खोकल्यावर व दम्यावर सरबत—फारच गुणकारी किं. रु. १ ट. व बं. खर्च ।=

बालसंजिवन— किं. रु. १ ट, व बंगी खर्च ८१२. ३ बा. ट. व बंगी खर्च ॥।–

कर्णरोगावर थेंब— किं ८१२ ट. व बंगी खर्च ।=

दांतांचें मंजन— किं. ०४ ट. व बं. खर्च तीन डब्यापर्यंत ।–

केशवर्धक तेल—किं. रु. १ ट. व बंगी खर्च ॥–

जुलाबाच्या गोळ्या—किं. ०६ ट. व बं. खर्च तीन बाटल्यापर्यंत ।–

अन्नपाचक गोळ्या —१०० गो. किं. रु. १। ट. बं. खर्च ।–

मुलांचे ताप्यावर—( आंकडीवर ) रामबाण किं. रु. ३ व रु. ट. व बं. खर्च ।=

मुद्दाम उन्हाळ्याकरितां थंडगार, हुषारी आणणारी, ऊत येणारी सरबताची भुकणी किं. रु. १ ट. व बंगी ॥।–

केस जाण्याचें औषध— किं. रु. १ ट. व बंगी खर्च ।– हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास केस तत्काळ निघून जातात.

## पंढरीनाथ गोपिनाथकृत स्वदेशीय सार्सापरिला मिश्रित रक्तशुद्ध करणाऱ्या व वाढविणाऱ्या गोळ्या.

ट. व बं. ख. ।– **गोळ्या.** किं. १ रु.

घाऊक औषधें घेणारास कमिशन देण्यांत येईल. रेल्वेजवळ राहणारांनीं औषधें रेल्वेनें मागवावीं. कारण रेल्वे हांशील स्वस्त पडतें. विस्तृत सचित्र जाहिराती व क्याटलाग मागवा. ह्याशिवाय पाहिजे त्या रोगावर वयाचें व प्रकृतीचें मान सविस्तर कळविल्यास औषधें पाठविण्यांत येतील.

## वैद्य--गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय.

## एजंट पाहिजेत.

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत. मुंबई.

---

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तें दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।॥। ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०१२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणाराची ट. ह. सह ०१४ ची मनिआडर पोंचतांच त्याचे नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेविलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता:— एम. जी. तुपे. पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No.

साल अखेर „ „ १ ८

किरकोळ अंकास ........................ ८

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस............ ०१ ०६

दुसरे खेपेस .......... ....०१

Single copy ............................ 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line....3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV | AKOLA MONDAY 19 AUGUST 1901 | NO 32

वर्ष ३५ | आकोला सोमवार तारीख १९ माहे आगस्ट सन १९०१ इ० | अंक ३२

## स्वामी हंसस्वरूपजी महात्मा

( मागील अंकावरून पुढें )

ही माहिती ऐकली ह्मणजे आह्मी कृतकृत्य झालों काय? इतक्याच गोष्टीनें फुलून जाऊन, विद्युत्शास्त्रज्ञांस, आणि विद्युल्लतेचे जे चमत्कार आज जगांत घडवून आणले आहेत, व पुढें अतोनात घडवून आणण्याचे यत्न जारीनें चालू आहेत आणि ते यशस्वी होतील अशी आशा वाटत आहे. त्या सर्व गोष्टींस तुच्छ मानावें ना? तांब्याचीं व काशाचीं पात्रें घरांत नेऊन ठेविलीं व लोखंडाचे तुकडे बाहेर आणून टाकिले, हें तत्व हजारों वर्षे ठाऊक होतें असें ह्मटलें तरी त्याच्यापासून विद्युत्संदेश पाठवितां आला काय? त्याच्या पासून दीपप्रकाश घेतां आला काय! व दुसरे अनेक उपयोग करून घेतां आले काय? खऱ्या चांगल्या वस्तूचा मुद्दाम उपहास कसा करावा ह्याचा हा उत्कृष्ट धडा आहे.

वास्तविक आमचें जसें असेल व जेवढें असेल तसें व तेवढें आमचें आहे असें निर्भयपणें ह्मणावें. पण मिथ्या वादाचे भरीस पडूं नये.

ऐहिक सुखाची वृद्धि करण्याचा संकल्प करून व तेंच एक व्रत स्वीकारून पश्चिमेकडील लोक निसर्गाची स्पर्धा करीत आहेत. अंतराळांतील गोलांचे वेध घेऊन व भूपृष्ठ आणि भूगर्भ धुंडाळून निसर्गाचे गुप्त व्यापार सुखवृद्धीस कारण कसे होतील या विचारांत व प्रयत्नांत ते गढून गेले आहेत. या कामांत, अर्थात, त्यांस अधिक यश मिळणार. पूर्वेकडील आह्मी लोकांनीं दुसरी दिशा धरिली. परमार्थ शोधनसंबंधीं आमचे विचार परमावधीस पोंचले आहेत. या मार्गानें आतां कोणी कसेहि यत्न केले व सिद्धांत ठरविले तरी ते बहुधा आमच्या विचारांच्या वर्तुळांतच येतील. असो.

हिंदु धर्माची ग्लानि झाली आहे ही गोष्ट खरी. प्रस्तुत आह्मी ज्यास धर्म ह्मणतों त्यानें लोकांचा बचाव होणें कठीण. या करितां कांहीं तरणोपाय शोधिला पाहिजे. खिस्ती वगैरे धर्म पतकरणें योग्य वाटत नसेल, तर राष्ट्रीय धर्म ह्मणून काढण्याचा हाच समय आहे. हें काम फारच कठीण आहे. ह्मणून राष्ट्रांतील अनेक चतुर व योजक मनुष्यांनीं आपल्या बुद्धिवैभवाचें एकीकरण केल्यावांचून तें साध्य होणारें नव्हे. कोणीही एक धर्मसंस्थापक निपजण्यापेक्षां, बुद्धीचें हें एकीकरण अधिक लाभदायक होईल.

सत्यशोधनापेक्षां, भ्रमोत्पादक गोष्टीच चित्त देऊन ऐकाव्या असें आह्मांस वाटतें मात्र त्यांत कांहीं तरी अद्भुत, अतर्क्य, व कल्पनेच्या विस्तारांतही न मावण्याजोगें प्रमेय मिश्र केलेलें असावें ह्मणजे आमचें काम झालें. ही जी मनाची ओढ तींत ईश कृपेनें पालट पडो.

७-८-१९०१ वि०

---

## वर्तमानपत्रें चांगलीं चालणें

( लिहून आलेला मजकूर )

एखादें वर्तमानपत्र चांगलें चालतें या वाक्याचा अर्थ असा कीं, त्यांतील लेख बोधपर, मनोरंजक आणि मनोहर असे असल्यामुळें तें वाचण्या करितां लोक मोठे उत्सुक असतात, व तें केव्हां हातीं पडेल असें त्यांस होतें. दुसरा या वाक्याचा अर्थ असा कीं, या पत्राचे वर्गणीदार पुष्कळ असून त्यापासून मालकास चांगलें उत्पन्न होतें. सर्व वर्तमानपत्रें अशीं असावीं हें इष्ट आहे पण फार थोडीं तशीं असतात हेंही स्पष्ट आहे. कोणतेंही वर्तमानपत्र चांगलें कां निघत नाहीं याज विषयीं जो खोल विचार करील त्यास असें दिसून येईल कीं, वर्तमानपत्रांत जे लेख येतात ते विचित्र असले पाहिजेत; ह्मणजे ते अनेक लेखकांच्या हातचे पाहिजेत. कोणीही संपादक केवढाही विद्वान् असला तरी त्याची अभिरुचि मर्यादितच असली पाहिजे. एक दोन किंवा तीन इतकेच विषय त्याच्या अभिरुचीचे असतील, ह्मणजे ते असे कीं, त्यांत त्यानें पूर्ण विचार केला असेल व त्यांवर त्यास निष्णातपणानें लिहितां येईल. दुसरें, किती जरी तो निष्णात असला तरी भाषा लिहिण्याची त्याची पद्धति एकाच प्रकारची असली पाहिजे. तो फारच कुशल असेल तर भाषे संबंधानें थोडेंसें वैचित्र्य त्यास दाखवितां येईल. परंतु दहा भिन्न भिन्न लेखकांच्या भाषा पद्धतींत जें दहा प्रकारचें वैचित्र्य असेल तें कांहीं त्याला एकट्याला साधेल असा संभव नाहीं. या करितां वर्तमानपत्रांतील लेख जितके अधिक लेखकांच्या हातचे असतील, तितके त्यांत अधिक वैचित्र्य आलेंच पाहिजे.

वर्तमानपत्रें हीं सार्वजनिक शिक्षणाचें एक मोठें साधन होत, ही गोष्ट सर्व मान्य आहे. लहान मुलांच्या शिक्षणासाठीं जशा पाठशाळा असतात त्या प्रमाणें अबालवृद्धांच्या शिक्षणा साठीं हीं वर्तमानपत्रें होत. पाठशाळांना जसा लोकाश्रय पाहिजे असतो तसा या वर्तमानपत्रांनाही लोकाश्रय पाहिजे. ज्या प्रमाणें पाठशाळा चांगली चालण्यास सर्व लोकांनीं आपापलीं मुलें शाळेंत पाठविणें आवश्यक आहे, त्या प्रमाणें सर्व लोकांनीं वर्तमानपत्राची एकेक प्रत घेणें आवश्यक आहे. शाळेंत जर मुलेंच नसतील तर शाळा चालावी कशी? त्या प्रमाणें ज्या घरांत वाचणारीं माणसें आहेत अशा प्रत्येक घरानें वर्तमानपत्राची एकेक प्रत न घेतली तर वर्तमानपत्र कसें चालावें? ही गोष्ट स्थानिक वर्तमानपत्रास लागूं आहे. इतर प्रांतांतील वर्तमानपत्रें घेणें तीं कांहीं समुदाय मिळून एकेक वर्तमानपत्र घेतलें तरी चालेल. ह्मणजे लायब्ररी किंवा रिडिंग क्लब या ज्या संस्था आहेत त्या परदेशीय वर्तमानपत्रांस विशेषतः लागूं आहेत. जे लोक सधन आणि संपन्न असतील त्यांनीं परदेशीय वर्तमानपत्रांतही आश्रय देण्यास हरकत नाहीं पण स्थानिक पत्रास तर सर्व स्थानिक लोकांनीं आश्रय देणें फार जरूर आहे.

कोणतेंही स्थानिक वर्तमानपत्र त्या त्या ठिकाणच्या लोकांनीं आपलें असें मानून ह्मणजे त्याविषयीं थोडी अहंकारबुद्धि ठेवून तें उत्तम रीतीनें चालावें असा अभिमान बाळगिला पाहिजे, आणि त्यांतील लेख विचित्र असल्यामुळें बाहेरच्या लोकांसही तें वाचनीय वाटेल अशाबद्दल झटलें पाहिजे. वर्तमानपत्राच्या ठिकाणीं लोकांनीं आत्मीय बुद्धि ठेविली ह्मणजे तें तसें चालण्यास हरकत नाहीं. आपल्या वर्तमानपत्राच्या ठिकाणीं स्थानिक लोकांची उदारबुद्धि असली पाहिजे; तसेंच आपल्या गांवच्या वर्तमानपत्राची बाहेर तारीफ झाली असतां ती गोष्ट आपणांस भूषणास्पद आहे असें समजलें पाहिजे. जसें अलीकडे ठिकठिकाणीं व्याख्यानमाला चालतात त्यांत प्रत्येक विद्वान् मनुष्य आपापल्या आवडीप्रमाणें विषय पसंत करून व्याख्यान देतो किंवा निबंध वाचतो, व तेणें करून सर्वांचेंच हित होतें. तसेंच वर्तमानपत्रांच्या संबंधानें झालें पाहिजे. वर्तमानपत्राचा संपादक वर्तमानपत्र चांगलें चालविण्याबद्दल जबाबदार असतो व आश्रयदात्यांपासून त्यास पैसा मिळतो तेव्हां आपण त्यास कां मदत करावी असा सहाजिक प्रश्न कोणी विचारील तर त्यास उत्तर असें कीं आपल्या देशाच्या हल्लींच्या स्थितींत वर्तमानपत्रकारास मिळावा तसा लोकाश्रय मिळत नसल्यामुळें नुसत्या वर्तमानपत्रापासून त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला त्यास मिळत नाहीं व तेणें करून दुसरे अनेक उद्योग त्यास करावे लागतात.

नुसत्या वर्तमान पत्राचें उत्पन्न जर आपण हिशेबांत घेतलें तर वर्तमानपत्र छापण्याच्या खर्चास तें जेमतेमच पुरत असेल. यामुळें नोटिसा जाहिराती वगैरे अनेक गोष्टी छापखान्यांत करून त्यास दुसरेही उद्योग करावे लागतात. अशा रीतीनें वर्तमानपत्र चाललें तर तें कांहीं लोकाश्रयानें चाललें असें ह्मणायाचें नाहीं. दुसरें असें कीं नोटिसा वगैरे लेख वर्तमानपत्रांत फार येऊं लागले ह्मणजे त्यांत लोक शिक्षणात्मक मजकूर जो फार यावयाचा तो अर्थात् कमी होतो व तेणें करून वाचकांस मिळावा तसा लाभ मिळत नाहीं. या करितां वर्तमानपत्रास होईल तितका आश्रय विशेषतः स्थानिक लोकांनीं दिला पाहिजे. यावर वाचक अशी शंका घेतील कीं वर्तमानपत्रांत बोधपर व मनोहर असे लेख आल्या वांचून त्यास आश्रय द्यावा असें आह्मांस कसें वाटेल? तसेंच दुसऱ्यापक्षीं लोकांनीं चांगला आश्रय दिल्यावांचून तसे लेख तरी वर्तमानपत्रांत यावेत कसे? तेव्हां या वादाचा इत्यर्थ असा निघतो कीं या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आहेत.

इंग्लंद, अमेरिका या देशांत वर्तमानपत्रें अतिशयच माजलीं आहेत. या प्रत्येक देशांत त्यांची संख्या किती असेल हें ठाऊक नाहीं, परंतु ती फार मोठी असली पाहिजे असें दिसतें. तसेंच ज्या अर्थीं तीं उत्तम चालतात त्या अर्थीं स्थानिक लोकांपासून त्यांस उत्तम आश्रय असला पाहिजे असें दिसतें. तिकडचे लोक सुधारलेले आहेत, त्यांस वाचण्याची अभिरुचि आहे, ह्मणून ते वर्तमानपत्रांस आश्रय देऊं शकतात असें कोणी ह्मणेल, परंतु तसेंच केवळ दिसत नाहीं. कारण या देशांतही लिहिण्या वाचण्या पुरता मध्यम स्थितींतील लोकांचा वर्ग बराच सुधारलेला आहे, तरी या लोकांपासून वर्तमानपत्रांस मिळावा तसा आश्रय मिळत नाहीं. याचें कारण पाहूं जातां इंग्लंड व अमेरिका येथील लोक पैशा संबंधानें आमच्या पेक्षां फार चांगले आहेत हेंच एक कारण दिसतें. या दोन्ही देशांत वर्तमानपत्रें तर काय पण शेंकडों नवीं नवीं पुस्तकेंही निघत आहेत व त्यांचा उत्तम प्रकारें खपही होत आहे यावरून तेथील लोकांची सांपत्तिक स्थिति उत्तम आहे ह्मणूनच वर्तमानपत्रांस व पुस्तकांस उत्तम आश्रय मिळतो, या वांचून दुसरें कारण संभवत नाहीं. हें जरी खरें आहे तरी या देशांत स्थानिक पत्रांस आश्रय न देण्या इतकी मध्यम वर्गांतील कुटुंबांची स्थिति आहे असें कांहीं ह्मणतां येत नाहीं. वर्तमानपत्रें बहुधा मोठमोठ्या शहरांत निघतात. अशा शहरांतील लोकवस्ती पंधरा किंवा वीस हजारांहूनही जास्त असते. अशा प्रत्येक शहरांत तेथील स्थानिक वर्तमानपत्राच्या हजार प्रती तरी खपल्या पाहिजेत, हें ह्मणणें फार होईल काय? यावर पूर्वीं सांगितलेलेंच उत्तर मिळेल. तें हें कीं, वर्तमानपत्र इतकें मनोहर निघालें पाहिजे कीं, तें निघण्याच्या दिवसाची वाचकांनीं मोठ्या उत्कंठेनें वाट पाहात बसलें पाहिजे. तसें वर्तमानपत्र निघण्यास उपाय काय या संबंधानें विचार करण्याचा या लेखाचा मुख्य हेतु आहे.

वर सांगितल्या प्रमाणें जर स्थानिक लोक वर्तमानपत्राच्या ठिकाणीं आत्मीय बुद्धि ठेवतील व त्याचा अभिमान बाळगतील तर वर्तमानपत्र मनोहर निघण्यास कांहीं हरकत

नाहीं. व स्थानिक वर्तुळ पांच पंचवीस कोसा पर्यंत जर वाढविलें आणि त्यांत इतर मोठमोठ्या गांवांचा समावेश केला तर इष्ट हेतु साध्य होण्यास अधिकच सुलभ पडेल. ही जी वर्तमानपत्राची हद्द मुकरर केली या हद्दींत वर्तमानपत्रांत लिहिण्यास लायक असे बरेच विद्वान् आपण्याचा संभव आहे. जर असें विद्वान् वर्षांतून दोन किंवा तीन लेख लिहून आपल्या स्थानिक वर्तमानपत्रास पाठवितील तर वर्तमानपत्र आपणास पाहिजे तसें मनोरम होणार नाहीं काय? प्रत्येक विद्वानाची अभिरुचि वेगळी, वाचन वेगळें, कल्पकता वेगळी, अनुभव वेगळा व याच प्रमाणें माहिती, लिहिण्याची शैली याही गोष्टी वेगळ्या. वर्षांतून दोन किंवा तीन लेख लिहिण्यास कालक्षेपही फार होणार नाहीं. लिहिण्याची संवय कायम राहील व आपल्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा फायदा आपण देशबांधवांस दिल्या सारखा होईल. वर्षांतून दोन किंवा तीन लेख लिहिण्याचे असल्यामुळें लहर लागेल तेव्हां ते थोडथोडे लिहितां येतील. व असा एकही विद्वान नाहीं कीं त्यास केव्हां तरी उत्तम विचार सुचून ते लिहून लोकांपुढें मांडवत अशी लहर येत नसेल. ती लहर तशीच फुकट जाऊं देण्या पेक्षां तिची अंमल बजावणी झाली तर त्याला स्वतःलाही केवढा आनंद होईल? तसेंच ते लेख वर्तमानपत्रांत आलेले पाहून व आपल्या हातून थोडी तरी लोकसेवा झाली असें मनांत आणून विशेष आनंद होणार नाहीं काय? ज्यांचा काळ एक सारखा उद्योगांत जात असेल व ज्यांना काडी इतकी फुरसत सांपडत नसेल असे उद्योगबद्ध विद्वान् फार थोडे असतील. पुष्कळांचा वेळ गप्पांतही जात असला पाहिजे व वर्तमानपत्रांत लिहिण्या सारख्या अनेक गोष्टी लोकांशीं व्यवहार करीत असतांना त्यांच्या लक्षांत येत असल्या पाहिजेत. अशा प्रमाणें सर्व विद्वान् मनावर घेतील तर संपादकापाशीं लेखांची इतकी गर्दी उडेल कीं, त्यांची निवडानिवड करून प्रत्येक अंक त्यास फार मनोरम असा काढतां येईल. विद्वानांनीं इतकीच उदारबुद्धि केली पाहिजे कीं, हें वर्तमानपत्र माझें आहे, व हें चांगलें निघण्यास मला हातभार लावला पाहिजे. संपादक पैसे मिळवितो, मी कां ह्मणून त्यास मदत द्यावी, या सारखे कोते विचार त्यांनें मनांत कधींहि आणूं नयेत.

इंग्लंद व अमेरिका किंवा हिंदुस्थान घ्या. येथील इंग्रजी वर्तमानपत्रें जीं उत्तम निघतात तीं याच कारणानें निघतात. त्यांतील लेख अनेक विद्वानांच्या हातचे असतात. कांहीं लेखक उदार बुद्धीनें मोबदल्यावांचून लिहित असतील व कांहीं लेखकांस त्यांच्या श्रमाबद्दल द्रव्यद्वारा मोबदलाही मिळत असेल, ही गोष्ट वेगळी. त्या वर्तमानपत्राचे आश्रयदाते अनेक असल्यामुळें व तीं वर्तमानपत्रें श्रीमंत असल्यामुळें लेखकांस मोबदला देण्यास तीं समर्थ असतील. आपल्या वर्तमानपत्रांची हल्लीं तशी स्थिति नाहीं हें आपण जाणतों आहों. याकरितां आपआपल्या वर्तमानपत्रास श्रीमंतीचा काळ येई पर्यंत सर्व विद्वानांनीं मदत देण्याचा बोजा उचलला पाहिजे. हा बोजा सर्वांनीं मनापासून उचलला ह्मणजे वर्तमानपत्र दिवसेंदिवस मनोरम आणि वैचित्र्य भरित निघत जाईल, त्याच्या आश्रयदात्यांची संख्या वाढेल, लोकांस शिक्षण उत्तम प्रकारचें मिळेल, त्यांचीं कर्तव्यें त्यांस कळूं लागतील, व हळू हळू अनेक दिशांनीं देशाची उन्नति होईल.

( संपूर्ण. )

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ६ शके १८२३

## स्कूल मास्तरला मारठोक.

थोड्या दिवसांपूर्वीं आकोल्यांतील एका मास्तरला भर शाळेंत जाऊन एका मुलाच्या बापनें किंवा पालकानें ठोकलें त्याबद्दलची हकीकत गेल्या अंकांत आलीच आहे. गुदस्त सालीं खामगांव येथें असाच एक प्रकार झाला होता. तेथील मराठी शाळेंतील रा० गणूलाल रामलाल या नावाचे मास्तरास एका मुलाच्या बापानें भर शाळेंत जाऊन मारिलें होतें. तेथील म्युनिसिपालिटीनें मास्तराकडून मारणारावर फिर्याद करविली. त्या मुकदम्यात डेपुटी इन्स्पेक्टर साहेब मि० पैठणकर यांचीही साक्ष झाली होती. कारण ते तेथें परीक्षेस गेले असतां त्यांनीं चौकशी केल्यावरून त्यांना त्या गुन्ह्या संबंधानें हकीकत माहीत होती. मुकद्दमा मेहेरबान करी साहेब असिस्टंट कमिशनर यांजपुढें चालला होता. मारणारावर आरोप शाबीत होऊन त्यास शंभर रुपये दंड झाला होता असें आह्मी ऐकितों.

अशाच प्रकारचा दुसरा गुन्हा कांहीं वर्षां मागें बुलडाण्यास झाला होता. त्यावेळीं आकोल्या जिल्ह्याचे आपले हल्लींचे फार हुषार व मेहनती सब डेप्युटी इन्स्पेक्टर साहेब, जे कांहीं महिन्यापासून इन्स्पेक्टरचे काम पहात आहेत, ते बुलढाणें येथें मराठी शाळेवर हेड मास्तर होते. त्यावेळेस मारठोकी पर्यंत मजल गेलेली नव्हती. कोणा मुलाचा बाप किंवा पालक कांहीं अद्वातद्वा भाषण करून हेड मास्तराचें अंगावर गेला होता. हेड मास्तरांच्या अंगीं स्वाभिमानबुद्धि तीव्र असल्यामुळें त्यांना ती गोष्ट चाल ढकलीखालीं न्यावी असें वाटलें नाहीं. त्यांनीं ती गोष्ट वरिष्ठांच्या कानीं घालून, त्यांची परवानगी घेऊन, आगळीक करणारावर फिर्याद केली. ती फिर्याद कर्नल टाम्सन जे त्या वेळीं असि० कमिशनर होते, त्यां पुढें चालून साहेब बहादुरांनीं आरोपीस पंचवीस रुपये दंड केला होता. तेव्हां पासून बुलढाण्यास आजपर्यंत तसा प्रकार कधीं घडला नाहीं.

खामगांवांतील आगळीक करणारास शिक्षा होऊन एकच वर्ष झालें आहे. तेव्हां गुदस्ता झालेल्या शिक्षेचा प्रतिबंधक परिणाम कसा काय होतो हें अद्यापि पाहाणें आहे. खामगांवांत आडदांड लोक बरेच असल्यामुळें, व झालेल्या गुन्ह्या सारखे एक दोन अप्रसिद्ध गुन्हे शिक्षा न होतां पूर्वीं घडून गेलेले असल्यामुळें, गुदस्तांचा मुकदमा चालला असतांना लोक उत्कंठेनें परिणामाची वाट पाहात होते; व आरोपीस शिक्षा झाली तेव्हां सर्वांस संतोष झाला, व करी साहेबांचे लोक फार आभार मानूं लागले, या गोष्टी संबंधानें न्यायी करी साहेबांचें नांव खामगांवांस फार दिवस लोकांच्या स्मरणांत राहील.

आकोल्यांत घडलेल्या परवांच्या गुन्ह्या संबंधानें म्युनिसिपालिटी व इतर लोक काय उपाय करितात हें पाहणें आहे. गुन्हेगारावर फौजदारींत फिर्याद व्हावी असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. परंतु कांहींकांच्या मतें हें घाणेरडें प्रकरण कोर्टापर्यंत जाऊन तें जगजाहीर व्हावें असें दिसत नाहीं. तसेंच कित्येकांस ही गोष्ट फार महत्वाची वाटत नाहीं. कारण मार खालेला मास्तर केवळ आठ रुपये पगाराचा नोकर आहे. या दोन्ही मतांच्या लोकांबद्दल फार आश्चर्य वाटतें. घाणेरडें प्रकरण आहे ह्मणून तें उजेडांत येऊं नये असें ज्यांचें मत आहे त्यांस आह्मी विचारितों कीं, प्रकरण कोर्टापुढें गेलें ह्मणजेच कां उजेडांत येणार? तें अगोदरच जगजाहीर झालें नाहीं काय? शिवाय घाण दाबून ठेवणें बरें, कीं बाहेर उजेडांत येऊन ती काढून टाकणें बरें? समजा, फिर्याद होऊन गुन्हेगारास शिक्षा झाली. तर मास्तर आणि इतर लोक या दोघांनाही अशा कृत्याचे परिणाम काय होतात हें कळून त्याचें हित होणार नाहीं काय? सर्व मास्तरांस असें कळेल कीं, मुलांस अविचारानें मारिलें असतां कोर्टाची पायरी चढण्याचा प्रसंग येतो. व लोकांस कळेल कीं मास्तरांच्या अंगावर जाऊन हात टाकिला असतां आपण गुन्हेगार होऊन दंडाच्या किंवा कैदेच्या शिक्षेस पात्र होतों. ज्यांचें मत असें आहे कीं, मास्तर आठ रुपयांचा नोकर असल्यामुळें ही बाब मोठी महत्वाची नाहीं, त्यांचा विचार खास चुकतो आहे. अशा गोष्टींत तत्वाकडे पाहिलें पाहिजे. व्यक्तीकडे पाहणें बरोबर नाहीं. म्युनिसिपालिटीनें व सरकारनें असा विचार केला पाहिजे कीं, आपल्या नोकरास लोकांना परस्पर शिक्षा करण्याचा अधिकार नाहीं. व तो अधिकार जर लोक बळकावूं लागले तर त्यांच्या हातून तो हिसकावून घेतला पाहिजे. सरकारी नोकरीस जी प्रतिष्टा आहे ती याच गोष्टी मुळें आहे. सरकारच्या नोकरांनीं गुन्हा केला असतां त्याची चौकशी करून गुन्हेगारास पारिपत्य करणें हें सरकारनें आपल्याच हातीं ठेविलें पाहिजे. नाहीं तर सरकारचें नांव तें काय राहिलें? हे सामान्य विचार, रात्रंदिवस कायदे कानूंत खेळणाऱ्या कित्येक लोकांस, कळूं नयेत ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. या गुन्ह्या संबंधानें शहरांत बरीच चळवळ आहे असें दिसतें. आकोल्या सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणीं अशी गोष्ट होऊन तिजकडे लक्ष न पुरविलें जातां जर ती तशीच मागें पडली, तर अशा गोष्टी खेड्यापाड्यांत जर घडल्या आणि त्यांजकडे कोणी लक्ष दिलें नाहीं तर काय नवल? फिर्याद होण्या विरुद्ध ज्यांचीं मतें असतील त्यांनीं थोडी फुरसत करून पोक्त विचार करावा ह्मणजे फिर्याद होणें अत्यंत आवश्यक आहे अशी त्यांच्या मनाची खातरी झाल्या वांचून राहणार नाहीं. दुसरें असें कीं, या फिर्यादीचा खर्च म्युनिसिपालिटीनेंच काय पण शाळाखात्यानेंही मंजूर केला पाहिजे. कारण म्युनिसिपालिटी व शाळाखातें हीं आपल्या हक्काच्या रक्षणा करितां व आपल्या अब्रूकरितां फिर्याद करणार; मास्तर हा निमित्तमात्र आहे. आरोपीवर गुन्ह्याची शाबिती होण्यासंबंधानें शंका नको. कारण बाहेरचा मनुष्य शाळेंत चालून आला आणि त्यानें मास्तरला मारहाण केली, ही गोष्ट उघड उघड आहेच. व साक्षीदार अज्ञान लहान लहान मुलें असल्यामुळें व तीं चार दोन नव्हत, तर पांच पंचवीसांहून ज्यास्त असल्यामुळें सत्य बाहेर पडण्याला कांहींच अडचण पडणार नाहीं. सर्व पंचाईत हीच आहे कीं, म्युनिसिपालिटीच्या मेंबरांना व शाळाखात्याच्या डायरेक्टर साहेबांना ही आपल्या अपमानाची बाब आहे व ही गोष्ट बंदोबस्त करण्या सारखी आहे असें वाटतें कीं नाहीं. तेवढें त्यांना एकदां वाटलें ह्मणजे ते सर्व गोष्टी करण्यास खंबीर आहेत.

## दुष्काळाचा प्रतिबंध

गेल्या दुष्काळामुळें सरकार मोठें चौकस झालें आहे. दुष्काळाची आपदा केव्हां व कशी येईल याचा नेम नसतो आणि या आपदेवर माणसाची सत्ताही फारशी चालत नाहीं. तथापि दुष्काळाची विपत्ति कमी करण्याची गोष्ट मनुष्याच्या हातची आहे. दुष्काळा विषयीं जे कांहीं प्रतिबंधक उपाय उपलब्ध आहेत त्या उपाया विषयीं सरकारची चौकशी सध्या चालू आहे. पर्जन्यकालाची उणीव कृत्रिम गोष्टींनीं दूर करावी हाच पहिला प्रतिबंधक उपाय होय. धान्याचा संचय करणें हा दुसरा उपाय आहे. इतर उपायांचा समावेश वरील दोन्ही गोष्टींत होतो. सरकारी चौकशी प्रांतवारीनें चालू आहे. प्रांताप्रांताच्या रचनेवर आणि नद्या, कालवे, तळाव वगैरेंच्या समृद्धीवर हे उपाय फारसे अवलंबून असतात. वऱ्हाड प्रांतांत मोठ्या नद्या, कालवे किंवा तळाव ह्मणण्या सारखे नाहींत आणि त्यामुळें पाटस्थळाच्या योजना पुष्कळ ठिकाणीं होण्या सारख्या नाहींत. ही मोठीच उणीव आहे आणि ती अपरिहार्य आहे.

आकोला जिल्ह्याच्या कशा काय सोयी आहेत यांचा निश्चय करण्यासाठीं गेल्या गुरुवारीं कुमार श्री हरभामजी यांनीं एक सभा भरविली होती. या सभेला प्रत्येक तालुक्याचे दहा वीस गृहस्थ मुद्दाम बोलावले होते. तालुक्या तालुक्याचे प्रतिष्ठित देशमुख देशपांडे, पाटील पटवारी, व इतर सुखवस्तु पुढारी गृहस्थ असे साठ पाऊणशें लोक जमले होते. सरकारी हेतु मे. डिपुटी कमि-

शनर साहेबांनीं कळविला आणि सर्व लोकांचे अभिप्राय गोळा करण्याचा मोठा स्तुत्य प्रयत्न केला. साहेब बहादूर राजकुळीन असल्यामुळें ते लोकांचा मानमरातब मोठा ठेवितात. आपल्या कार्याला फार दक्ष असून मोठ्या गोडीगुलाबीनें ते लोकांपासून काम करून घेतात. या सभेमुळें लोकांची दृष्टी या विषयाकडे वळली ही उत्तम गोष्ट होय. गांवोगांवच्या सोयी पाहून व खर्चाच्या बाबी लक्षांत घेऊन पूर्ण विचारानें सर्व सूचना वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविण्यांत येतील अशी आह्मांस बळकट आशा आहे. पाटस्थळाच्या व विहिरीच्या सोयी पुष्कळ केल्या पाहिजेत असा साधारण मुख्य विचार निश्चित दिसला. या संबंधानें लोकांस ज्या सूचना करावयाच्या असतील त्या त्यांनीं अवश्य कराव्या आणि त्या आह्मी यथास्थळ मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करूं.

## गोधन

आमच्या प्रांताची ख्याती गोधना विषयीं फार जुनी आहे. गोधना मध्यें आह्मी गाई, ह्मशी, बैल इत्यादि तद्वर्गीय पशूंचा समावेश करितो. गेल्या दुष्काळांत आमच्या जनावरांचा मोठाच संहार उडाला. एक वर्षाचा काळ लोटला तरी आह्मांस पूर्वींच्या निम्या हिश्यानें देखील जनावरें दिसत नाहींत. कांहीं अवशिष्ट जनावरें आहेत, पण त्यांच्या पेक्षां बाह्य प्रांतांतून आलेल्या जनावरांचा भरणा मोठा दिसतो. गोधनाची ही हानी पाहून फार दुःख वाटतें. गुराढोरांची समृद्धि पूर्ववत् करण्याकडे सरकारानें व लोकांनीं विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. चांगल्या जनावरांची निपज कायम ठेवण्याचें काम सोपें नाहीं. त्यासाठीं मुद्दाम प्रयत्न केला पाहिजे. जनावर सुरेख व सदृढ राखण्या साठीं त्याची जतन मोठ्या काळजीची असावी लागते. नवी अवलाद चांगली पैदा करण्या साठीं नवीन योजना करण्यांत आल्या पाहिजेत. कांहीं शेती निराळी घेऊन तेथें चांगली चांगलीं जनावरें मुद्दाम पाळलीं पाहिजेत आणि त्या योगानें कांहीं वर्षांत चांगल्या जनावरांची निपज पुष्कळ वाढेल. प्रत्येक जिल्ह्याला अशी एक गोशाळा पाहिजे. असा कारखाना निघण्याला सरकारी मदत अवश्य लागते. अशा गोष्टी सरकाराच्याच हातून चांगल्या वठून येण्यासारख्या असतात. राजबळ असल्या नंतर लोकांच्या हातून सर्व कार्यें चटकन उभारलीं जातात. या शिवाय जनावरांचीं प्रदर्शनें भरविलीं पाहिजेत आणि चांगल्या जनावरांच्या मालकांस बक्षिसें दिलीं पाहिजेत. असे उपाय योजण्यांत येतील तरच वऱ्हाडचें गोधन आपला लौकिक कायम राखील.

---

देशी दारूची भट्टी या जिल्ह्यांत सरकारी आहे. ही भट्टी एका भव्य इमारतींत आहे आणि मोहाच्या फुलापासून दारू तयार करण्याची क्रियाही यांत्रिक रितीनें चालते. पूर्वींची जुनी साधी भट्टी जाऊन तेथें सरकारी भट्टीची स्थापना करण्यांत आली. पूर्वीं जितके मक्तेदार होते तितक्यांच्या निरनिराळ्या भट्ट्या होत्या, आतां एक दोन जिल्ह्यासाठीं ही एक भट्टी चालते. असा फेरफार होण्याला तीन वर्षें झालीं पण या वर्षाच्या अनुभवावरून नवीन एकाच जंगी भट्टीची योजना सरकारास द्रव्यदृष्टीनें फायदायक नाहीं आणि लोकांसही त्या पेय द्रव्यामध्यें कांहीं उत्कृष्ट गुणाची आढळ होत नाहीं. दारू साधारणपणें सारखीच असते. पूर्वींचे भट्टांचे धंदे पुष्कळ बसले आणि सरकारची एकच भट्टी चालू झाली. मुंबई इलाख्याची व मद्रास इलाख्याची अशा दोन्हीं पद्धती चालूं करण्यांत आल्या. परंतु त्या पासून सरकारास फारसा फायदा दिसत नाहीं. दारूची बाब मोठ्या नफ्याची असून अबकारीच्या उत्पन्ना पैकीं मुख्य आहे. मे० इलिएट आफिशिएटींग कमिशनर यांचा अभिप्राय असा आहे कीं, पूर्वींप्रमाणें मक्तेदाराची पृथक् पृथक् भट्टी चालूं करावी आणि सर्व प्रांतभर एकच पद्धत सारखी कांहीं वर्षें पर्यंत चालू ठेवण्यांत यावी. ही सूचना आमच्या मते चांगली असून जुन्या अनुभवी अंमलदाराच्या लेखणींतून आलेली आहे तेव्हां तिचा योग्य विचार जलदी करण्यांत यावा. अबकारी खात्याची रीत अशी पाहिजे कीं, लोकांचें मादक पेय स्वस्त पडून त्यांच्या गरिबींत अबकारीच्या करांनीं निराळी भर पडूं नये.

## वर्षोत्सव व्याख्यानमाला

ही व्याख्यानमाला यंदा उशिरानें सुरू झाली पण आनंदाची गोष्ट कीं, या मालेंतलीं पुष्पें फार सुगंधी, मनोहर व शोभायमान आहेत. पहिल्या व्याख्यानाचा सारांश आह्मी दिलाच आहे. दुसरें व्याख्यान रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे यांचें झालें. या पुष्पांचा सुवास आह्मी आपल्या वाचकांस समग्र देण्याच्या विचारांत आहों. तिसरें व्याख्यान श्रीमत् शंकराचार्यांच्या चरित्रा संबंधानें झालें. त्या महा सत्पुरुषाची आठवण देण्यांत आली हाच या भाषणाचा मोठा उपयोग होय. काल रोजीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांचें सुरम्य संभाषण झालें. व्याख्यानाचा विषय कैलासवासी महादेव गोविंद रानडे यांच्या चरित्रा संबंधाचा होता. या चरित्रांपासून बोध काय व कसा घ्यावा हें व्याख्यानकारांनीं गत गोष्टींच्या दाखल्यांनीं उत्तम व्यक्त केलें. रानडे--स्मारकाच्या विषयाला हा चांगला प्रारंभच होय.

# The Berar Samachar

MONDAY AUGUST 19 1901

The speech on the 'Industrial development of India' delivered by Mr. Havell, the other day, at Calcutta is the most remarkable one. It comes from the eloquent lips of one who creditably occupies the chair of the principalship of the Government school of art and who is a great authority on such difficult and momentuous problems of the day. He has put forth in emphatic expressions the most important and practical aspects of the wide and deep question of the revival of the dead industries and the degenerated Art of India. He sounds the alarm of let—things—alone policy which engenders in us a destructive spirit of inaction and idleness and throws us head long hopeless and helpless. We must be wide awake to our responsibility of self—action in this direction. Mr. Havell particularly notes that India is most fortunate in having almost all the resources at her disposal that are necessary for the industrial development of a country. She exceptionally enjoys the physical and natural advantages and the British suzereinty has given her the full advantages of internal peace and safety of purse and person. All these advantages mean nothing for the industrial development of India if we are lacking in the spirit of private enterprise, and run to overcrowd the field of agriculture as the sole spring of maintenance. There is already an enormous drain of wealth incidental to the foreign rule and people have not yet learnt to raise capital for re-generating the dead industries of India. Mr. Havell illustrates this by referring to the textile industries of India. He maintains and emphatically reiterates that it is not the steam—power which has up set the hand—loom industry of the golden days of India. It is the neglect of our own people to interprit rightly our own wants and it is our total disregard to adjust our hand—looms to the refined requirements of the later days. He instances in the fly—shuttle and hopes to introduce it to make the hand—looms as easily workable as to give out a sufficient out—turn of cloth. All India must be thankful to Mr. Havell for advocating the hand—loom industry of India. He hopes that a sufficient development of the hand—loom will supply the demand of Indian markets He admits that the steam—power is properly occupying a prominent position in the industrial act vity of India, but here he raises his danger—signal that we are not, however, on any account, to throw off our hand—looms It is the hand—loom which brought India a world—wide fame for her excellence in textile industries. We might humbly endorse what Mr. Havell has said and would like to explain our experiences of the last famine, when the Government support of a few thousand rupees was powerful enough to maintain the weavers of this province at a low rate of wages and to turn out a cheap, durable and nice cloth. We are sure that if we revive the old hand—loom with small improvements in minor details, we can compete with the English cloth and secure a good position in our own markets. Mr Havell refers in the course of his valuable lecture to the brass industry that needs our first attention with a view to attract a large capital and expand its usefulness in diverse ways. He further regrets at the depreciation of the Indian architecture and he is very much against the prevailing introduction of the Western style which only mars the excellence of the purity and chastity of the Indian architecture. We hope that the Victoria Memorial Hall, which Lord Curzon aspires to build out of the munificent gifts and contributions of the Indian princes and people, should be a marvellous building truly and purely *Indian* in beauty, style and architecture. Let no one have a misgiving as to the perfect success and handsome completion of the Memorial Hall. It should rival with the Taj Mahal and other magnificient buildings of India and should immortalize the name of Victoria the Good in the new era of progress which the proposed building should proclaim to the world. We have often been writing about the industries of India and found it necessary to make a beginning in some direction or other. It is really a matter of great pleasure when we find men like Mr. Havell to give us concrete lessons in the task of reviving our dying industries. There is a very great moral of these concrete lessons. Mr. Havell is not merely a guide—post to show us the right way but is further an active commander in our industrial warfares with the other nations of the world.

## वऱ्हाड

हवामान— या सप्तकांत उघाडी चांगली होती. काल पासून पुन्हां पावसाचीं लक्षणें एकवटत आहेत. रोगराई विशेष नाहीं तथापि वर्षाऋतूची दुखणीं जास्त झालीं आहेत. पिकें चांगल्या स्थितींत आहेत.

मि० शेख इस्मायल ए० असि० कमिशनर यांनीं बुलढाणा कोर्टाचा चार्ज मि० सुब्रायलू नायडू यांस तारीख १० रोजीं दिला आणि ते आज येथून यवतमाळाकडे रवाना होणार आहेत.

गेल्या सोमवार पासून तीन दिवस पर्यंत येथें सेशन कचेरी भरली होती. या सेशनाला दोनच खटले होते. पहिल्या खटल्यांत आरोपी चंदू ह्मणून औरंगाबादेकडील होता. त्याच्यावर सरकारी शिक्क्याचीं खोटीं नाणीं तयार करण्याचा आरोप शाबीत होऊन त्याला चार वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा देण्यांत आली.

दुसरा खटला खुनाचा होता. रिसोड येथें उमराखा नांवाच्या रोहिल्याचा खून २२ मे रोजीं झाला. तो त्याच्या जवळील १००।१२६ रुपया साठीं झाला; आणि त्यांत फत्तेमहमद, यासीनखा, वगैरे पांच इसम आरोपी होते. सहावा आरोपी बोदल्या यास माफी देऊन साक्षीदार केलें होतें. कोर्टांत बोदल्यानें कानावर हात ठेविले. मूळ खुनाच्या गोष्टीला दुसरा पुरावा नव्हता. तेव्हां प्रत्यंतराचा अवान्तर पुरावा निरुपयोगी झाला. सर्व आरोपी निर्दोषी ठरले. उमराखा जिवंत आहे कीं मेला हीही गोष्ट अनिश्चित झाली.

## जाहिरात

सर्व लोकांस या लेखानें असें जाहीर केले जातें कीं, माझा मुलगा गोविंदा हा सज्ञान आहे पण तो वाईट लोकांच्या फंदानें बिघडलेला आहे, तर हा जर कोणास माझी शेती, घर किंवा कोणचाही स्थावर जंगम माल खोदी, गहाण, किंवा बक्षीस वगैरे देईल तर कोणी घेऊं नये. शिवाय त्यास कर्ज वगैरे कोणी देऊं नये. असा व्यवहार त्याच्याशीं कोणी केला तर त्याब द्दल मी किंवा माझी इस्टेट कोणचेही प्रकारें जबाबदार नाहीं. सर्व इस्टेट माझ्या स्वतांच्या कमाईची आहे. मुलाजवळ कांहीं एक जिंदगी नाहीं. कळावें. तारीख १८ माहे आगस्ट सन १९०१ इ०

सही

चिंतामणजी वल्लद सखारामजी

पाटील रहाणार चांदूर ता०

अकोला निशाणी खुद्द.

### नोटीस.

बक्षमी चुन्नीलाल नथमल मारवाडी दुकान नांदुरा. यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितो कीं, आह्मी तुह्मास २०० शें रुपयांचा गहाण पुरजा करून दिला होता व याचे हिशेबाप्रमाणें पैसे अंदाज २६६ रुपये होतात. पैकीं ८० रुपये सल्लाउद्दीन व मुकदेव पाटील या दोन गृहस्थांच्या देखत दिले होते ते तुह्मास कबूल आहेतच. शिवाय २९० रुपये तारीख ४-४-०१ रोजीं रजिस्टर कचेरींत दिले एकूण तुह्मांस ३७० रुपये मिळाले. कचेरींत पैसे देतांना पुरजा परत मागितला तेव्हां उद्यां देऊं असें ह्मणाला. पण तो तुमच्या मनांत देण्याचा नसून कांहीं लबाडी करण्याचा तुमचा विचार दिसतो. असो. ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत आमचा पुरजा आह्मांस परत द्यावा व आमचे ४ रुपये तुमच्याकडेस ज्यास्त गेले आहेत तेहि द्यावेत. असें मुदतींत न केल्यास कोर्टांत दावा करून अखेर निकाला पर्यंतच्या खर्चासह व नोटीशीच्या पैशासह पैसे भरून घेऊं. तुमच्याजवळ असलेला दस्तैवज रद्द आहे. त्या बाबतींत आमचेकडेस तुमचे कांहीं एक फिरत नाहीं. कळावे तारीख १६।८।१९०१ इसवी.

सही
विष्णु जानकीराम सोनार
नांदुरा दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

गणपत वल्द बाळाजी लोहार राहाणार कारंजा तालुके मूर्तिजापूर यांस नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून तीन वर्षापासून तूं मला टाकून दिलें आहे. तेव्हां पासून मी आपले बापाचे घरी राहून लोकांचें कर्ज काढून पोट भरतें. आतां कोणी मला कर्ज देत नाहीं. तुमचे कडेस चार पांच वेळा मनुष्य मला घेऊन जाण्या करितां पाठविले असतां तुह्मी येऊन मला घेऊन गेले नाहीं. करितां नोटीशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत लोकांचे कर्जाऊ पैसे देऊन टाकावें व मला घरीं घेऊन जावें. असें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग माझेवर तमचा कोणतेही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळावें. तारीख १९ माहे आगस्ट सन १९०१ इ०

( सही )
चंपी मर्द गणपत लोहार इचे हातची निशाणी वांगडी खुद्द असे.

---

कि. दिवाणी दावा नंबर ३ क्लास १९
१९०१

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यानला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटीफिकिट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादूर सिव्हील जड्ज आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार—मैनाई मर्द रावोजी माळी वस्ती साहीत तालुके आकोले.

सर्वांस या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार यानें मयत राघोजी वल्द वकाजी याचे कर्ज रुपये १८० सखारामजी वल्द सटवाजी यांजकडे येणें आहे ते याचे कर्ज वसूल करण्या करितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख ९ माहे आगष्ट सन १९०१ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व या अर्जाचे चौकशीची तारीख ३१ माहे आगष्ट सन १९०१ इसवी रोजीं मुकर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार यानला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख १० माहे ८ सन १९०१ इ०

V. N. Dandekar
सिव्हिल जड्ज.
अकोला.

---

## वर्तमानसार

### लढाईची खबर

एक बोअर सरदार इंग्रजांस शरण जाण्याच्या विचारांत आहे ही गोष्ट जनरल डीवेट यांस कळतांच बैरस्त्रीच्या वेषांत त्यानें त्यास देहांत शिक्षा देण्याविषयीं फर्मावलें होतें. शत्रूस शरण जाणें ह्मणजे किती दुःसह अपमान त्यांस वाटतो हें यावरून स्पष्ट दिसतें. असे मानी सरदार अहल्याशिवाय स्वदेशास स्वातंत्र्य कोठून लाभणार ! अशाच वीरांच्या अंगीं देशाभिमान जाज्वल्य राहतो व हेच पुरुष स्वातंत्र्याच्या पायीं आपल्या सर्वांचें रक्त मातींत ओतण्यास मागें पुढें पहात नाहींत. अशा लोकांच्या रक्तानें पुष्ट झालेली जमीन वीर पुरुषांसच प्रसवेल यांत नवल तें काय ?

बोअर सेनापती क्रिट्झिंजर यानें इंग्रज सरदार फ्रेंच यांस कळविलें आहे कीं, आह्मी इंग्रज पक्षाच्या कोणत्याहि लोकांस दयामाया कांहीं दाखवणार नाहीं.

नवीन युक्ति—तीन हजार मैलांवर बोललेला शब्द टेलिफोननें ऐकूं जाण्याची युक्ति निघाली आहे. व यामुळें आतां अमेरिकेंतील न्यूयार्कमध्यें बोललें कीं लागलीच लंडनास ऐकूं जाईल. युक्ति मोठी छान आहे,

स्त्रियांची पिच्छेहाट— इंग्रजी अमदानींत स्त्रियांस फारच मान आहे व त्यांच्या उन्नती साठीं हरप्रयत्न चालू आहेत असें असतां एडिंबरो हायकोर्टानें स्त्रियांस सालिसिटरीचा धंदा करितां येत नाहीं असें ठरविलें आहे. अशी स्त्रीशिक्षणाची पिच्छेहाट कां ! आपल्या अंगांत हिंमत असेल तर वाटेल त्यानें वाटेल तो धंदा कां करूं नये !

सोडतीची नाचणूक— आस्ट्रेलियांतील लोकांनीं अर्ज केले आहेत कीं, कोणीही कधीहि सोडत काढूं नये असा कायदा करण्यांत यावा. सोडतीचा इतका अनिवार तिटकारा कां उत्पन्न झाला बरें ?

झाताच्या नाण्यास समाधी— १८३९ सालचे रुपये झिजल्यामुळें चलनी नाण्यातून त्यास काढिलें. तद्वतच १८४० सालचे रुपयांच्या हातून काम होत नाहीं ह्मणून त्यांस पेनशन देण्याचा ठराव झाला आहे. ह्या सालचे रुपये खजिन्यांत घेऊन त्या बद्दल दुसरे ताजे तवाने देण्यांत येतील.

नवीन माहिती— चीन देशांतील पुस्तकावरून असें दिसतें कीं, कोलंबसा पूर्वीच चीन देशाला अमेरिकेची माहिती होती. या वरून पूर्वेकडील देशांतील सुधारणा बरीच चांगली असावीसें दिसतें.

मंजूर— सैन्य व आरमार यांच्या सुधारणे साठीं १२० लाख पौंडाची मंजुरात मिळाली. सैन्यदलावरच राष्ट्राची सर्व मजबूती असते ह्मणून हा खर्च योग्यच होय.

नवा मुद्दा— ज्यांत सरकारचें हिताहित आहे असे सर्व खटले आनररी माजिस्ट्रेटा पुढें चालूं नयेत असा एक नवा मुद्दा बाहेर आला आहे. खरें पहातां आनररी माजिस्ट्रेट यांचा दर्जा व मान पगारी अधिकाऱ्या पेक्षां ज्यास्त आहे. व मानपानांनीं मनुष्यास विभूषित करणें ह्मणजे त्याचे ठायीं विशेष पूज्यभाव व दृढविश्वास व्यक्त करणें होय.

उद्धट व उद्दाम—अशा तऱ्हेचें वर्तन गोरे लोकांचे हातून काळे लोकांबरोबर विशेष होतें. असलें तुसडें, शिरजोरपणाचें व माणूसघाण वृत्तीचें वर्तन सरकारास व लोकांस कोणासच आवडत नाहीं. पण सरकारच्या आवडी नावडीची पर्वा हे उन्मत्त लोक करीत नाहींत हें असह्य होय, परवा नुकतेच भागलपूरचे स्टेशनवर एक नामांकित गृहस्थ आपल्या स्त्रीस गाडींत बसवीत होते तें ह्या डब्यांत बसलेल्या एका गोऱ्या बाईस न आवडल्यामुळें तिच्या नवऱ्यानें त्या गृहस्थास मारिलें. खटला चालू आहे.

हसूं येण्याजोगा चमत्कार-- दिनापूरच्या एका गोऱ्या साहेबास सुरापानाची हुक्की आली पण त्यांस गुत्याचें ठिकाण माहीत नव्हते. ही नड भागविण्यासाठीं रस्त्यांतून जाणाऱ्या दोन मुलांस सवाल करून त्यानें माहिती मिळविली. पण चमत्कार हाच कीं दारू पिण्यास मदत केली या आरोपावरून ह्या गरीब मुलांस उगीच्या उगीच शिक्षा दिली. ईशकृपेनें अपिलांत ते सुटले खरे, पण सरळ मार्गानें वागण्याची सुद्धां पंचाईत पडूं लागली हें नशीबच !

संतोषमुखी स्तुतीचे उद्गार- वायव्य प्रांताचे ले. गव्हरनर सर अंटनी माकडोनल्ड हे कायमचे विलायतेस जाणार. आहेत. ह्यांचा स्वभाव फार दयाळू, वर्तन चोख, न्यायाचें व निःपक्षपाताचें असे होतें. ह्यांची कारकीर्द सर्वांस फार आवडली. दुसऱ्या अधिकाऱ्यांनीं ह्यांचें उदाहरण घ्यावें.

पाऊस पाणी—सर्वत्र पाऊसपाणी बेताचें झालें आहे. पिकें चांगलीं आहेत. धान्याचे भाव उतरत आहेत. देवदयेनें सोन्याचा घास निर्विघ्नपणें लोकांच्या तोंडांत पडेल तेव्हां खरें.

दूर दृष्टी—ना. दादाभाई यांनीं इंडियन फॅमिन युनियन' नांवाच्या संस्थेतून आपलें अंग काढून घेतलें आहे, तरी त्यांचें मन ह्या संस्थेच्या उत्कर्षासाठीं वाहिलेलेंच राहील, इतर सभासदांशीं आपला जो मतभेद आहे त्यामुळें कदाचित् ह्या संस्थेस विघ्न येतील तर तीं येऊं नयेत ह्मणून दूरदृष्टीनें यांनीं ह्या संस्थेशीं असलेला आपला संबंध तोडला आहे. विचारवंत व अनुभवी लोकांचें धोरण निराळेंच तें भलत्यास साधत नाहीं.

मुक्ताफळें—बिशप वेल्डन साहेबांचीं हिंदुस्थानांतील लोकांच्या राजनिष्टेबद्दलचीं बाहेर पडलेलीं मुक्ताफळें व तीं वेचून माळ करून गळ्यांत वागविणारे त्यांचे स्तुतिपाठक यांची हट्टीपणाची बद्धवृत्ती सर्वांस कळून चुकलीच आहे. राजनिष्ठा ही धर्मावर अवलंबून नसून राजकर्त्यांच्या दयार्द्र न्यायीपणावर आहे. स्वधर्माचा अभिमान ज्याचा त्यास उपजत असतोच. धर्मांतरानें मूळचा वर्ण, स्वभाव, किंवा राष्ट्रीयत्व बदलत नसतें. ख्रिस्ती धर्माचे दीक्षेनें राजनिष्ठमय प्राणी होतो हें तत्व फारच गूढ होय. उलट ख्रिश्चन लोकाप्रमाणें राजद्रोही लोक दुसऱ्या कोणच्याच धर्मांत नाहींत अशीं अनेक उदाहरणें दाखवतां येतील. असो. धर्मासारख्या नाजूक गोष्टींत कोणीच हात घालूं नये. पण विषप साहेबासारखे विद्वान् ह्मणविणारे लोक आमच्या लोकांसंबंधीं विनाकारण खनशी बुद्धीनें सरकारचे कानांत विष ओतून त्यांचीं मनें कलुषित करितात याबद्दल त्यास चांगली शिक्षा लाविली पाहिजे.

उत्तम कल्पना व स्तुत्यउद्योग— पुण्याजवळील लोनावळ स्टेशनापासून तीन चार मैलावर सकरपाठारच्या डोंगरांत पंच नद्या एकत्र मिळून धबधबा झालेला आहे. त्या पाण्याची २९ हजार घोड्यांच्या इतकी शक्ती उत्पन्न होऊन त्यामुळें मुंबईंतील व जवळ पासचे सर्व कारखानें थोडक्यांत चांगले चालतील. वरील धबधब्या पासून वीज उत्पन्न करून तिचा उपयोग कारखाने ट्रामवे व रोषनाई साठीं केला जाईल. ह्याचे पुरस्कर्ते श्रीमान लोक आहेत व त्यास सरकारची परवानगीही मिळाली आहे. अशीच उद्योगवृद्धी केली पाहिजे.

बरें झालें— कलकत्याकडील युरोपियन हाटेल व गुत्ते यामधून स्त्रिया नोकर असतात पण यामुळें अनीति व भ्रष्टाचार फार होतो सबब त्यांना नोकर ठेवूं नये असें ठरलें आहे.

दोन तोंडाचें मूल— इस्ट हॅम शहरीं एका बाईस दोन तोंडाचें मूल झालें. ह्या मुलाला ४ हात व ४ पाय होते. मूल १९ मिनिटें जिवंत राहून मरण पावलें. ह्या मृत मुलाची काया औषधी करितां राखून ठेवण्या बद्दल डाक्टरांकडून सूचना करण्यांत आली आहे.

चमत्कार— संस्थान किल्लेचार प्रांत माळवा येथें एक चमत्कारिक जनावर आलें आहे. तें दररोज माणसें खात असतें. मागील भाग कमरेपर्यंत पाय वगैरे माणसा प्रमाणें आहेत व वरचा भाग वाघा प्रमाणें हात व तोंड आहे. हें जनावर माणसाचें डोकें खातें व तरवारीचा वार लागत नाहीं. त्यास पकडण्यास एक हत्यारी पोलीस पार्टी नेमिली आहे.

स्त्रियांचें कालेज- हिंदु स्त्रियांकरितां दरभंगचे महाराज स्वतंत्र कालेज काढून

( पुरवणी पहा )

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस......... ८१ ०६
दुसरे खेपेस .... ........८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ....................... 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line...3 as

REGISTERED N. No. 4

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 26 AUGUST 1901 NO 33

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २६ माहे आगस्ट सन १९०१ इ० अंक ३३

## मोरोपंत

निवडक वेंचे

( विराट पर्व )

हें उत्तम पर्वांपैकींच एक होय. यांतील पद्यें प्रसन्न व प्रसादसंपन्न आहेत. प्रसाद हा काव्याचा आत्माच ह्मटला आहे. या मुख्य गुणाची या काव्यांत केवढी व्याप्ति आहे याविषयीं सर्वमान्य पंडितांचे अभिप्राय या खालीं दिले आहेत यावरून स्पष्ट होईल. या अभिप्रायांचें योग्य स्थान हेंच असल्यामुळें ते बहुधा साग्र दिले आहेत. हे अभिप्राय कवीच्या भव्य कीर्तीस शोभण्यासारखे असून ते एकत्र दिल्यानें याच्या काव्यांतील गोडी किंवा खुमास घेण्यास वाचक वर्गास अधिक सामर्थ्य येईल, पंतांच्या योग्यतेची माहितगारी यापुढें लोकांस अधिक होईल अशी अधुनिक विद्वानांची समजूत आहे, आणखी यांचें ह्मणणें असें आहे कीं, कित्येक कवींच्या एकवटलेल्या बुद्धिमत्तेपासून जितका लाभ व्हावयाचा त्याहून अधिक, याच्या एकट्याच्या बुद्धिमत्तेपासून होण्यासारखा आहे.

या वेच्यांस प्रथमारंभीं जोडलेल्या निबंधांत या कवीवर कोणी विद्वानांनीं आक्षेप घेतले होते असें ह्मटलें आहे. त्या आक्षेपांचें या योगें सहज निरसन होईल. वास्तविक ह्मटलें तर आतां अशा निरसनाचें प्रयोजन कमीच आहे, कां कीं, गुणदोषांची खरी पारख करणाऱ्या फार मोठ्या जनसमूहाचें लक्ष याच्या काव्याकडे वेधण्याचें सांप्रत दिसून येतें. ज्या काळीं हे आक्षेप घेतले गेले तो काळच तसा होता. ह्मणून त्यांचा मोठासा प्रमाद मानता येत नाहीं. प्रमादच ह्मटला तर, पुरता शोध न करतां या शंका घेण्यांत यांनीं दाखविलेला उतावीळपणा, एवढाच होय. असो.

हा पाहिलाच अभिप्राय पहा.

"जो पाक कालिदासांत आहे तो भारवींत नाहीं. जो पाक भारवींत आहे तो कालिदासांत नाहीं. पण पंतांच्या काव्यांचा हे दोन्ही पाक खमंगपणा वाढवीत आहेत. मोरोपंती महाभारतातील कांहीं आख्यानें नीट समजलीं ह्मणजे सगळा कालिदास व सगळा भारवी वाचण्याचें श्रेय मिळून आणखीहो अधिक लाभ होतो. × × × × कोठें मोरोपंती भक्तिमहासागराचा अळोट पूर, व कोठें भारवीची भक्तिरसानें मंद मंद वाहत जाणारी छोटी सरस्वती !!! पदलालित्य दंडीचें लोकोत्तर समजलें जातें व उपमा अलंकार कालिदासाचे सुरेख समजतात. पंतांच्या काव्यांतील पदलालित्य दंडी सारखेंच लोकोत्तर असून, पंतांनीं स्थळोस्थळीं बांधलेले उपमा अलंकार अति सुरेख आहेत. सारांश, कालिदास, भारवी व दंडी मिळून त्रिवेणि एकट्या मोरोपंतामध्यें एकत्र संगम झालेली उघड आढळते.

| | |
|---|---|
| इंदुप्रकाश<br>रा. रा. भागवत<br>१९.९-१८९२ } | का. सं. अंक ४४<br>पद्यांचा अर्थ<br>२४।२९ |

"पतांनीं एक संस्कृत मंत्ररामायण केलें आहे, व एक मराठी केलें आहे. मराठींत १८८० गीति व संस्कृतांत ३९१२ पद्यें आहेत. दोन्हीही काव्यांत राममंत्राची योजना केली असून, तीं कोठेंहि क्लिष्ट झालीं नाहींत इतकेंच नव्हे, तर पंताच्या इतर काव्या प्रमाणें हीं रसाळ, सरळ आणि प्रसादसंपन्न अशीं आहेत.

का. सं. नामरसायन
अंक ४३ पृ. ३४४

"मूळ अध्याय ६९ श्लोक १२-१३ हे पंतांच्या ११६-११८ या गीतींशीं ताडून पाहिले तर पंतांची वाणी अर्थ भारवती व रसाळ आहे असेंच टरेल. यांतील गुणांचा मूळ **व्यास** वाणींत गंध सुद्धां नाहीं असें ह्मटलें तरी चालेल."

का. सं. वि. प. अ. ६
अंक ४९ पृष्ट १४१

"गीति १२४-१२६ यांतील दमयंतीचा विलाप वाचतांनां कोणाच्या हृदयास पाझर फुटणार नाहीं ? यांत प्रसादगुण तर सर्वत्र झळकत आहे. पंतांची प्रतिभा अशाच हृदयंगम आणि सुरस पद्यांत प्रसवते."

का. सं. पद्यांचा अर्थ.
अंक ४९ पृ. २९

"हें अर्ध पंतांच्या प्रतिभास्फूर्तीचें, आणि सर्वतमर्पक योजनाचातुर्याचें ज्ञापक होय. यास मुळांत आधार नाहीं. येथेंहि पंतांनीं मुळावर कडी केली आहे यांत संदेह नाहीं."

का. सं. वि. प. अ ४
अंक ४० पृ. ८२

"या उत्तरार्धास मुळांत आधार नाहीं. येथें पंतांनीं आपलें कल्पनाबल खर्चून मुळावरही कडी केली आहे असें कोण ह्मणणार नाहीं ?

का. सं. वि. प. अ. ६
अंक ४४ पृ. १३९

"कृष्णेचें हें अल्प पण आवेषयुक्त भाषण वाचून या व्यसनाच्या घोरतेचें विशदतर वर्णन करणें अशक्य असें वाटतें. या लहानशा वाक्यांत जो अर्थसंग्रह व्यक्त केला आहे, तो दोन चार पानें लिहिली तरी, त्यांत व्यक्त करितां येणार नाहीं, यावरून पंतांची वर्णनशैली किती मार्मिक आहे हें स्पष्ट होतें."

का. सं. वि. प. अ. ६
अंक ४४ पृ. १३४

"गीति ६८।६२ यांतील वर्णन पंतांच्या पदरचें आहे. यास मुळांत आधार नाहीं. पंतांच्या वर्णनांतील खुबी मुळांत कोठेंहि दृग्गोचर होत नाहीं. प्रस्तुत वर्णन आणि यांतील अलंकार हें किती अनुगुण आहेत, हें प्रसंगाकडे लक्ष दिलें असतां कळणार आहे."

का. सं. वि. प. अ. २
अंक ३८ पृ. ५४

( पुढें चालू )

## वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १२ शके १८२३

### वर्तमानपत्रें वाचणें

अवलोकनपटु मनुष्याच्या लक्षांत आलें असेल कीं, वर्तमानपत्रांत जे लेख येतात ते जितक्या काळजीनें वाचावे तितक्या काळजीनें साधारणतः लोक वाचीत नाहींत. साधारणतः लोकांची अशी चाल आहे कीं, कोणतेही वर्तमानपत्र हातांत घेतलें ह्मणजे त्यांत जे अनेक निबंध असतात, त्यांचे माथळे ते पाहात जातात. पाहतां पाहतां, "अं: यांत काय आहे ?" "अं: यांत कांहीं तरी चावटपणा असेल?" "अं: यांत तर काय नीतीबद्दल कांहीं तरी पांडित्य असेल;" "यांत तर कांहीं जीवच नाहीं. हा निबंध तर वर्तमानपत्र भरून काढण्या करितां कांहीं तरी भारूड लिहिलें आहे," असे अनेक शेरे मारीत वर्तमानपत्र उलटून, शेवटीं "स्थानिक" या सदरा खालीं कांहीं विशेष असें दृष्टीस पडलें तर तें पाहून वर्तमानपत्र भिरदिशीं भिरकावून देतात. पण त्यांत जर कांहीं व्यक्तिविषयक टीकाबिका ज्यांत आहे असा एखादा निबंध असेल तर तो मात्र फुरसत करून अव्वल अखेर वाचतात. किंवा ज्यांत दोन वर्तमानपत्रकारांचा कलह असेल असा एखादा लेख असल्यास किंवा ज्यांत एखाद्या व्यक्तीवर अन्योक्तीनें कांहीं तडाकेबिडाके असतील असा एखादा लेख असला तर तो मात्र भक्तिपुरःसर वाचतात. किंवा सरकारच्या कांहीं कृत्यांवर खरमरीत टीका असली तर तो लेखही भक्तीनें वाचतात. अशी एकंदर वाचकांची अभिरुचि दिसते. पण जे लेख वाचक पुचाट किंवा शुष्क ह्मणून सोडून देतात, ते लेखही पुष्कळ वेळा बोधपर अशा माहितीनें भरलेले असतात. नीतिविषयक माथळा ज्या लेखास दिलेला असतो तो लेख जरी रोजच्या माहितींतला असाच वाटला, व खरोखर त्यांतील विचार जरी ओळखीचे असले, तरी त्यात देखील विचार करण्यासारख्या पुष्कळ गोष्टी असतात. परंतु चळवळ उत्पन्न करणारे लेख ज्यांत असतात अशीं वर्तमानपत्रें साधारण लोकांस अलीकडे फार प्रिय झालीं असल्यामुळें बिन चळवळीचे लेख वाचनीय नाहींत असें झालें आहे. ही जी लोकांच्या मनाची प्रवृत्ति झाली आहे, ती ज्ञानवृद्धीस फार विघातक आहे. तसेंच चळवळीचे लेख लिहिणाऱ्या वर्तमानपत्रकारांच्या योगानें सामान्य लोकांची आवड एकंदरीनें भ्रष्ट होऊन गेली आहे. जेवणांत ज्या प्रमाणें शरिरास पुष्टि देणारे आणि बलवर्धन करणारे 'भक्ष्य' पदार्थ असतात त्या प्रमाणें नीतीविषयक, वाङ्मय विषयक, राजनीति विषयक इत्यादि लेख वर्तमानपत्रांत समजण्याचे. आणि भोजनांत जसे तिखट, मर्मी असे 'दाह्य' पदार्थ असतात ते क्षणमात्र झणझणीतपणा उत्पन्न करितात, पण पुष्टीच्या कामास फारसे उपयोगी नसतात, तसेंच हे वर्तमानपत्रांतील चळवळीचे लेख समजायाचे. घी शक्कर खाणारे मारवाडी, किंवा डाळरोटी खाणारे हिंदुस्थानी लोक पुष्टि देणाऱ्या पदार्थांशीं विशेष गांठ ठेवून एक मिरची आठ दिवस पुरवितात. पण ते शरिरानें पुष्ट, सुदृढ आणि बळकट असतात. अन्यपक्षी, तिखट ज्यांस फार प्रिय, व ज्यांत तिखट नाहीं अशा जेवणास जे कुचकामाचें समजतात, असे जे तामस आहार करणारे लोक असतात, ते शरिरानें पाप्याचीं पितरें असतात, किंवा केवळ तसे नसले तरी शरिरानें पुष्ट आणि ताकदवार असें कधींही असत नाहींत. त्याप्रमाणेंच चळवळीचें लेख ज्यांस प्रिय असे वाचक ज्ञानसामुग्री ज्यांच्या पाशीं बरीच आहे, असे असण्याचा फारसा संभव नाहीं. सात्विक आहार आणि तामस आहार यांत जो भेद आहे तोच सात्विक आणि तामस वाचन यांत भेद आहे. जे वाचक मोठे विद्वान् असतील व ज्यांस मोठमोठे ग्रंथ वाचण्याचा व्यासंग आहे, ते जर या लेखाच्या आरंभीं सांगितल्या प्रमाणें माथळे पाहून वाच्यावाच्याचा निर्णय करतील तर तें त्यांस मात्र शोभेल. परंतु जे तरुण आहेत, ज्याचें वाचन अद्यापि फारसें झालें नाहीं, व ज्यांचें ज्ञानभांडार अद्यापि वाढायाचें आहे, व ज्यांस उद्योग ह्मटला ह्मणजे गप्पा मारण्याच किंवा आळशी बसण्याचा आहे, त्यांनीं मोठ्या विद्वाना प्रमाणें अशी ऐट घालणें बरोबर नाहीं.

वर्तमानपत्रकार किंवा त्यांत लेख लिहिणारे दुसरे लेखक जे लेख लिहितात ते केवळ कांहीं तरी लिहितात असें समजूं नये. प्रत्येक लेखांत कांहीं तरी विचारणीय असे मुद्दे असतात, व जरी तो विषय सामान्य आहे असें माथळा पाहतांच वाचकांस वाटलें, तरी ती विचारसरणी त्यांत असते ती कांहीं वेगळ्याच तऱ्हेची असल्यामुळें तो विषय पुन्हां पहाण्या सारखा असतो. या जगांत आपण नवीन असें काय पाहतों? आपल्या रोजच्या जेवणांत आपण नवीन नवीन असे कोणते पदार्थ खातों? तथापि वेगवेगळ्या स्वयंपाक्यांच्या हातचें जर आपणांस जेवायास सांपडेल, तर वैचित्र्य ह्मणून त्यांत कांहीं तरी आपल्या अनुभवास येईल. त्या प्रमाणें वर्तमानपत्रांचें आहे. त्यांतील लेख बहुधा अनेक लेखकांच्या हातचे असल्यामुळें प्रत्येक लेखांत कांहीं तरी विशेष असण्याचा संभव आहे. या करितां माथळा पाहून तो लेख वाचण्यांत कांहीं विशेष फायदा नाहीं, हा समज बरोबर नाहीं. आपण कोठें जेवायाला गेलों असतां एखादी भाजी, चटणी किंवा इतर एखादा पदार्थ पाहिल्या बरोबर मनोवेधक असा वाटत नाहीं, ह्मणून निमें जेवण होई पर्यंत कधीं कधीं आपण त्याला हात लावीत नाहीं, मग साहजिक तिकडे हात जाऊन आपण तो जिभेला लावतो. लावतांच तो पदार्थ बरा सारखा वाटतो. मग आपण खऊं लागतो तेव्हां मनांत असें येतें कीं, पाहिल्या पासून याला मी उगींच हात लाविला नाहीं; तसें पुष्कळ वेळां वर्तमानपत्राचें होतें. या करितां कोणताही लेख त्याज्य असें ठरविण्या पूर्वी तो अर्धामुर्धा तरी वाचून पाहिला पाहिजे. निदान आपल्या मागें जर महत्वाचीं कामें नसतील तर शुष्क गप्पा मारीत बसण्या पेक्षां वर्तमानपत्रांतील लेख समग्र वाचणें अधिक फायदेशीर आहे. माथळ्या वरून जो लेख आपणास ग्राज्य वाटतो त्या संबंधानें आपणच आपणांस असा प्रश्न करावा कीं मी जर या संबंधानें लिहियाला बसलों तर वर्तमानपत्राचे दोन तीन रकाने भरतील इतकें प्रतिपादन आपल्याच्यानें करवेल काय? तसेंच एखादा साधारण माथळ्याचा लेख वाचून झाल्यावर कधीं तरी असें जर आपणास वाटलें असेल कीं, माथळ्यावर कांहीं नियम नाहीं, आंत प्रतिपादन चांगलें असतें, तर निदान प्रत्येक लेख वाचणें आवश्यक आहे. ज्या लेखाच्या माथळ्यावरून आपणांस वाटेल कीं या लेखांतील माहितीची मला जरूर नाहीं, उदाहरणार्थ लढाई संबंधाची बातमी, किंवा कांहीं राजकीय विषय कीं ते वाचले असतां त्यांच्या गूढपणामुळें ते आपणांस समजणार नाहींत किंवा ज्यांत एखाद्या स्थानासंबंधानें हकीकत असेल व तें आपल्या ओळखीचेंही नाहीं, किंवा ओळखीचें असल्यास ती हकीकत त्या स्थानच्या लोकांसच विशेष अगत्याची आहे तर अशा प्रकारचे लेख टाकण्यास हरकत नाहीं. परंतु नैतिक, सामाजिक, आणि वाङ्मय विषयक असे लेख दृष्टीस पडतांच ते आपणांस दुर्दैव वाचनीय आहेत, निदान ग्राज्य नाहींत, असें स्वतःची ज्ञानवृद्धि इच्छिणाऱ्या प्रत्येक वाचकानें आपल्या ठिकाणीं ठरवून ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं.

## दिवाणी काम

सन १९०० सालच्या दिवाणी कामाचा वार्षिक रिपोर्ट नुकतांच प्रसिद्ध झाला आहे. हा रिपोर्ट फार लहान आहे. वार्षिक रिपोर्टांचा आकार कमी करण्याविषयीं इंडिया सरकारचा हुकूम झाला आहे आणि त्या अन्वयें मे. इलियट साहेब बहादूर यांनीं हा रिपोर्ट फार संक्षेपानें केला आहे. सहा पृष्ठांच्या पेक्षां मोठा वार्षिक रिपोर्ट असूं नये असा सरकारचा विचार आहे. आणि या लहान रिपोर्टांचींही नऊ पृष्ठें भरलीं आहेत ह्मणून अलिशान रेसिडेंट साहेबांनीं हा दोष पुढें न ठेवण्याविषयीं सूचना केली आहे. वार्षिक रिपोर्टाचा आकार कमी केल्यापासून लोकांचें मोठें अहित आहे. वार्षिक रिपोर्ट ह्मणजे सरकारी कामाचें सिंहावलोकन असून पुढील धोरणही त्यांत नमूद केलेलें असतें. या दोन्हीही गोष्टी विस्तारानें लोकांस कळावयाला पाहिजे असतात. परंतु यापुढें त्या गोष्टी अगदीं सार दृष्टीनें कळविण्यांत येतील हें कांहीं ठीक नाहीं. १९०० सालीं ४० अधिकारी दिवाणी न्यायाधीशांचें काम करीत होते. एकंदर १९७१४ नवे दावे दाखल झाले. ही संख्या आदल्या वर्षा पेक्षां ४०१४ दाव्यांनीं कमी आहे. दुष्काळामुळें दिवाणी कामाला जी ओहटी लागली ती १८९९ व १९०० या दोन्ही सालीं सारखी चालूंच होती. यंदाच्या सालीं ही ओहटी बंद होऊन भरतीला प्रारंभ होईल असा अंदाज आहे. दाखल झालेल्या दाव्यांची संख्या उतरली पण दाव्याच्या किंमतीच्या दृष्टीनें दाव्यांची एकंदर किंमत वाढली आहे. ३७,९३,८४१ रुपयांची किंमत १८९९ त दाखल झालेल्या १९७२८ दाव्यांची होती. पण १९०० त १९७१४ दाव्यांचीच किंमत पुष्कळ अधीक ह्मणजे ४१,९१,६२४ रु० होती. या सालच्या दाव्यांमध्यें हा मोठा चमत्कारिक प्रकार आहे. मे. इलियट साहेब ह्मणतात कीं एक हजार रुपयावरील दावे पुष्कळ वाढले आहेत आणि अर्थात त्या मुळें एकंदर दाव्यांची किंमत मोठी दिसते. मोठ्या किंमतीचे दावे सुस्थितींतल्या लोकांमध्यें चालतात आणि त्या मुळें दुष्काळाचा परिणाम या मोठ्या मोठ्या किंमतीच्या दाव्यावर विशेषसा घडत नाहीं. हा अभिप्राय आमच्या दृष्टीनें वस्तुस्थितीला सोडून आहे. पुष्कळशा मोठ्या किंमतीच्या दाव्यांत गरीब व निकृष्टतेला पोचलेले प्रतिपक्षी दृष्टीस पडतील. जमिनी संबंधाचा नवा कायदा पंजाबांत झाला आणि मुंबई इलाख्यांत होऊं पहात आहे. या दोन्ही गोष्टी लोक ऐकतात तेव्हां आपल्या जुन्या कर्जाचा निकाल करून द्यावा असें त्यांस विशेष वाटतें. त्या शिवाय व्याजाच्या दृष्टीनें सावकारांनीं गरीब कुळांकडे आपले पैसे कर्जाऊ वर्षानुवर्ष राहूं दिले होते, पण दुष्काळाचे उग्रतर परिणाम दृष्टीस पडूं लागले तसतशी सावकारांस आपलें कर्ज वसूल करण्याचीच मोठी जलदी वाटूं लागली ऋणको दुष्काळांत अगदीं थकले व त्यांच्या जवळ कांहीं त्राण राहिलें नाहीं. या मुळें मोठमोठ्या किंमतीचे दावे पुष्कळ वाढले. दगडा खालील हात कसातरी काढून घेतला पाहिजे असा सर्वत्र सावकारांचा एकदम ग्रह झाला आणि हा अजूनही कायम आहे, सुखवस्तु लोकांमध्येंच मोठ्या किंमतीचे दावे अधीक असतात असें आह्मांस वाटत नाहीं. उलटा अनुभव असा आहे कीं दिवाणी कोर्टाच्या द्वारानें गरीब लोकांच्या जमिनी त्यांच्या स्वामित्वांतून निघून जाऊन सावकारांच्या व श्रीमान लोकांच्या घरीं आपोआप जात चालल्या आहेत. ही गोष्ट अखेरीला मोठी बातूक होईल असा आमचा पक्का ग्रह आहे. दिवाणी कामाची स्थिती ही लोक-स्थितीचा एक आरसा आहे आणि त्या आरशांत पडलेल्या प्रतिबिंबावरून एक चांगली खूण पडताळ्याला दिसून येईल. उत्तरोत्तर वाढत चाललेल्या दरिद्रावस्थेची ही स्पष्ट खूण आहे. लोकांची जिंदगी त्यांच्या हातून जात चाललेली आहे आणि प्रस्तुतच्या क्रमानें आपल्या लोकांची अखेरी मोठी भयप्रद वाटते. लक्ष्मी चंचल खरी व ती चालती राहील हेंही कबूल आहे परंतु ज्या लोकसमुदायाकडे ती पाठमोरी झाली आहे त्यांच्याकडे ती सन्मुखतेनें केव्हां तरी पाहील असा कांहीं रंग सध्यां दिसत नाहीं.

दिवाणी काम जलदी होण्याकडे मे. जुडिशिअल कमिशनर साहेबांची विशेष दक्षता आहे. काम सुंवत चालले ह्मणजे त्यांस आवडत नाहीं. आमच्या मतें हल्लींच्या न्यायाधिशांस कर्में बहुविध व पुष्कळ असतात. सर्व काल सरकारी चाकरींत घालवूनही कामें आटोक्यांत नीटशीं येत नाहींत. दिवाणीच्या कामा निमित्त जो पैसा कोर्ट फीच्या रूपानें गोळा होतो तो सर्वच लोकांच्या उपयोगाकडे जितका लागावा तितका लागत नाहीं पंचवीस वर्षा पूर्वी नेमत केलेल्या न्याय खात्याच्या हातून हल्लींचें वाढलेलें काम झेंपत नाहीं. जो पहावा तो आपल्या कामा खालींच चूर असतो, आमच्या मतें अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यांत यावी. न्यायाधिशावर कामाचा बोजा फार पडतो हें निर्विवाद आहे; तर ही उणीव सरकारांनीं लवकर दूर करावी. गेल्या सालीं ज्या अधिकाऱ्यांचें दिवाणी काम पसंत ठरलें त्यांची यादी रिपोर्टांत दिली आहे. या अधिकाऱ्यांचा नामनिर्देश खालीं करून आह्मी त्यांचें अभिनंदन मनोभावानें करितों:—

रा० रा० बंधूजी जनार्दन, बी. ए. सुळे, विश्वनाथ नारायण दांडेकर, देवराव जयकृष्ण, रा. ना. देशपांडे, जी. एस. नायडू, एस. एच. किंग, नारायणसिंग बभूतसिंग त्रि. ग. परांजपे, गो. वा. बापट, आणि एम. आर. दस्तुर.

## तलवारीचा महिमा

( लिहून आलेला मजकूर )

आमच्या मित्रमंडळींनीं एक मोठा आनंदोत्सव केला. त्या प्रसंगाला उचित अशी कडेकोट तयारी चालू होती. एक रम्य व सुंदर स्थळ शोभायमान होत होतें. तेथें एक वाडवडिलांची जुनी तरवार म्यानांत घातलेली दृष्टीस पडली. ती पाहून एका विद्वानानें हातीं घेतली. म्यानाबाहेर काढतांच तिला जंग चढलेला दिसला. तरी तिचें चकचकित सुरम्य पातें पाहतांच त्या गृहस्थाचे हात लटपटले. त्या वस्तूला त्या आनंदराशींत बाजूला कोपऱ्यांत ठेवावयाची होती. ती तरवार इतकी परकीशी वाटली व ती इतकी टाकाऊ ठरली यांत नवल नाहीं पण ती मोठी भितीप्रद व जिवाला धोक्याची वस्तु वाटली. तिची दहशत आमच्या विद्वानावर इतकी बसली कीं, त्यानें ती चटकन लांबवर नेऊन ठेविली. जी तरवार शूराच्या कंबरेला शोभा देते ती हाताला लागेल व कांहीं अनर्थ घडेल ह्मणून हातांत घेण्याच्या सन्मानाला देखील ती अपात्र ठरून व बागुलबोवा होऊन बसली आहे. आश्चर्य इतकेंच कीं, आमच्यांतील चांगले चांगले सुज्ञ लोक देखील तरवारीला इतके भितात. तरवार ही वस्तु लष्करी बाण्याची द्योतक आहे. आमच्या विद्वानांची ती त्रेधा पाहून आह्माला आमच्या भाग्याची लाज वाटते. असे विद्वान तरवारीला असे भितात तर ते आमच्या तरुण मंडळीला तरवारीचा बोध चित्रानेंच करून देणार हें उघड आहे.

शारीरशक्ती ही पुरुषत्वाची द्योतक आहे. प्रस्तुतच्या भाऊबाई समाजाच्या अग्रणींस लष्करी शिक्षण देण्याची सोय सरकारानें लवकर केली नाहीं तर इंडियन लोक शिळपट होतील आणि राज्यकर्त्यांस ते जड मृत्तिके प्रमाणें निरुपयोगी व भारवत होतील. शिपाईगिरीच्या साध्या शिक्षणानें शरीरसंपत्ती चांगली राहील आणि माणसांत माणसकीहि कायम राहील. वर्तमानकाळीं तरवारीचा महिमा बागुलबोवा प्रमाणें असा विचित्र झाल्यामुळें आमचे लोक जीवनमृत झाले आहेत.

---

रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी हे अमरावतीहून परवां सायंकाळीं आकोल्यास आले व काल सायंकाळीं 'समाजाग्रणी' या विषयावर त्यांचें व्याख्यान झालें. वर्षोत्सव व्याख्यानमालेंतलें हें ९ वें पुष्प होय. संभाषण फार चांगलें झालें. मुद्दाम या कार्या करितां ते आले याबद्दल येथील मंडळी त्यांची फार फार ऋणी आहे.

अध्यक्षस्थानीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी विराजमान होते. समाजाचे पुढारी चांगले निवण्याला त्या पुढाऱ्यांमध्यें व लोकांमध्यें आपापल्या विचारा विषयीं खरें मानसिक धैर्य पाहिजे ह्मणजे पुढाऱ्यांस स्तुत्य गोष्टी बद्दल प्रोत्साहन मिळेल व इतर गोष्टी बद्दल त्यांची अप्रतिष्ठा होईल. योग्यायोग्य गोष्टींचें विवेचन करून पुढाऱ्यांनीं लोकमताला न सोडतां पण त्यासच न चिकटतां आपला प्रगतीचा धरला मार्ग पाहिजे. योग्यायोग्यते विषयीं विचार करण्याची चुकी केली तर पुढारी समाजा बरोबर निभत नाहीं.

पुढाऱ्यांच्या अडणी दाखवून नंतर लोकांनीं प्रस्तुतचे नाईक, जमादार व सुभेदार यांच्या हातून अशी परिस्थिती तयार करावी कीं, कालगतीनें उत्कृष्ठ सरनोवत मिळून आपला समाज चांगल्या उन्नतीला पोचेल. पण समाजाचा भरंवसा उडेल व समाज आपल्याला दूर करील अशा मजलेपर्यंत अग्रणीनें जाऊं नये. लोकांस कधींही न खपणारी गोष्ट प्रसिद्ध-पणें प्रतिपादन केल्यानें अग्रणी समाजाला निरुपयोगी होतो हें विसरतां कामा नये. असा राजश्री जोशी यांच्या भाषणाचा आशय होता. अध्यक्षांनीं सदहू भाषणाचा मथितार्थ सांगून नंतर थोर विभूती निर्माण होण्याचा काल येईपर्यंत समाजाच्या विद्यमान अग्रणींनीं आपलें दुटप्पी वर्तन टाकून अंतर्बाह्य एकच सरळ वर्तन ठेवण्याची कृपा करावी असें सांगितलें.

## The Berar Samachar

MONDAY AUGUST 26 1901

It is superfluous to speak of the greatness of the late Mr. M. G. Ranade. He was undoubtedly the greatest man of the nation. He was the leading light of the Maharashtra. Great men never die as they ever live in the spirit of progress they leave behind amongst their own people. All people admire him for his excellent career. But it is another thing to read in his life where his greatness lies and to know this is the sure source of inspiration. On the 18th instant, Mr. Vishnu Moreshwar Mahajani delivered an excellent lecture on the life of this political saint of Maharashtra. The speech was chaste in diction, pure in style and ennobling in thought. Mr. Mahajani had little to speak of the events of Ranade's life. They are so well known and need no repetition. Mr. Mahajani reviewed his life from a higher stand—point. He chalked out the land—marks of his greatness. His map represents at one glance the philosophy of Ranade's life. An ideal life was presented before the audience with the interesting and inspiring incidents of that life. Mr. Mahajani explained in his eloquent manner the art of understanding great lives. He illustrated in Ranade's life how to read a-right the events of the day. Here is a noble and central ideal of life. Man is born with some divine mission to discharge and he has to play his part well in the light of that mission. To the eternal history of time each man has to contribute his own lines, and the way in which he dashes them will measure the success of his sacred trust. A man has his appointed place in society, and he has his limited number of opportunities. Every man is to do his level best of these surroundings. These determine his course of life. he has however a very limited control over them. But this little control is the real moral interest in man's history. This force represents the sum—total of a man's real worth. Mr. Mahajani proved that this moral force in his hero was of a most predominent nature. The past has made us what we are. But here was the great architect to build upon this ir-removeable key-stone of the past. A rare fabric of an excellent life is before the public. And in him was realised the motto of plain living and high thinking. A few old books were his library. But his note—books showed how successfully he made friends with great authors. All knowledge was well stored in his masterly mind. He had the rare gifts of a supreme intellect and a strong memory which are denied to many. But no man has a valid excuse as to why he should not be orthodox in morality. One can afford to be heterodox in politics & to be at war with religion but he must always be at peace with morality. Madharao Ranade had a great capacity for business. He aspired after knowledge with great diligence and found rest in making it his own. His was the intense love for learning for its own sake & his was the pen mightier than the sword. He was the uncrowned leader and brought to the front the rising men of his time. He possessed an art of selecting right men for the right places and the present institutions of the Maharashtra owe him the selection of able and statesman—like men for them. He infact moulded the destinies of the people. He cared not for promotions in service if they would threaten to interfere in his work of yielding his masterly pen. He chose to spare his breath rather than his pen. He was too good natured and was always in a jolly mood. He knew not what anger was and never found fault with others for their failings and short—comings. He was all love for man and God. His characteristic hopefulness of heart never failed him even in the fearful presence of a deadliest defeat. His vision went over the distant mile—stones of a long future and he saw signs of hope and victory in every right movement he started. Who will not draw inspiration from such an ennobling and sublime life ?

We cannot complete this reference to a high life before we learn the high political ideal which Mr. Mahajani finds in Ranade's life. He had a firm conviction that India was the meeting place of all religions and of all Governments and here would be decided which is the best religion and which is the best Government. India is the holy land and we are the chosen people of God. Differences will continue to exist till a right interpretation of them will produce that cohesion which will bind together the rulers and the ruled. This will present to the world a marvel of the Indian nation.

## वऱ्हाड

हवामान— पाऊस फार चांगला झाला. आतां आठ दहा दिवस तरी चांगली उघाडी पाहिजे. रोगराईला यंदा फारसा कोठेंच आश्रय नाहीं ही ईश्वराची कृपा होय.

राजा इंद्रकरण बहादूर असफ-जहाई, आनररि अव्वाची, आकोला हे वऱ्हाडांत काम शिकण्यासाठीं आले होते. या प्रांतांत राहण्याची त्यांची मुदत संपत आल्यामुळें अलिशान रेसिडेंट साहेबांच्या मार्फतीनें निजाम सरकारांनीं त्यांस परत बोलाविलें आहे. राजे साहेब लवकरच हैदराबादेस परत जातील.

क्या० माडवी डेपुटी कमिशनर, यवतमाळ यांस दीड वर्षाची फर्लो रजा देण्यांत आली. आणि त्यांच्या जागीं लेफटेनंट मारिस साहेब हे डेपुटी कमिशनर झाले.

मे० इलियट साहेब आफिशिएटींग कमिशनर यांची स्वारी येथील आफिसांच्या वार्षिक तपासणी निमित्त येथें आली आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असि. कमिशनर यांस ५०० रुपया पर्यंत स्माल काज कोर्टाचे अधिकार देण्यांत आले.

येत्या १९ सप्टेंबर रोजीं लोअर हायर परीक्षा उमरावतीस सुरूं होतील.

### वेदशाळा.

रा० रा० बळवंत गणेश सोमण यांनीं एक उत्तम अध्यापक आणिले आहेत आणि ब्रह्मकर्म शिकविण्याचा एक पहिला वर्ग काढला आहे. फी वगैरे कांहीं नाहीं. धर्मोन्नतीचा हा प्रयत्न स्तुत्य होय.

औरंगाबाद डेक्कन,

ता० २३।८।१९०१

ह्या औरंगाबाद जिल्ह्यांत १७-१८ हजार भिल्ल लोकांची वस्ती आहे. हे भिल्ल लोक रानटी, क्रूर, व डाकू आहेत. पण मोठ्या आनंदाची गोष्ट हीच कीं, मे० ह्यानकिन साहेब, स्टिव्हिन्स साहेब, व अली खान साहेब ह्या त्रिवर्ग पोलिस अधिकाऱ्यांच्या चातुर्यानें व मेहनतीनें कान्या, आप्पा सारखे डाकेखोर भिल्ल व आणखी दुसरे पुढारी गिरफ्त होऊन शरण येत आहेत. ह्यांनीं मोठी पुंडाई माजवून व लोकांचीं नाकें कापून त्यांस फार त्रस्त केलें होतें.

### नोटीस

बेशमी शिदू वल्लद तुकाराम कुणबी रहाणार पाटखेडे तालुके अकोला पोस्ट-बारशी टाकळी यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, मी तुह्मांस आमच्या दुकानाचे कुलमुखत्यार नेमिले होते त्यास आज ४-५ वर्षे झालीं. इतके दिवस तुह्मी कामाचा जमाखर्च व हिशोब वगैरे बरोबर ठेविला नाहीं. ह्मणून तुमचें काम आह्मांस नापसंत आहे. सबब आह्मी आज तारखेपासून तुमचें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. यापुढें आमचे संबंधानें कोणचीहि देवघेव वगैरे करूं नये. केल्यास त्याबद्दलची जबाबदारी तुमच्या शिरावर राहील. ही नोटीस पोचल्यापासून १५ दिवसांचे आंत सर्व कामाचा योग्य व रीतशीर हिशोब आह्मांस द्यावा. येणें प्रमाणें मुदतींत न झाल्यास कोर्टांत दावा करून तुमच्या कारकिर्दींत झालेलें आमचें सर्व नफानुकसान अखेर निकालापर्यंतच्या खर्चासह भरून घेऊ. कळावें तारीख २५ माहे आगस्ट सन १९०१ इसवी.

सही

रामराव आणि आनंदराव वल्लद विठोबा उभयता अज्ञान पालन करणार मातोश्री राधाबाई मर्द विठोबा, भते रहाणार पाटखेडें निशाणी बांगडी

### जाहिरात.

या जाहिरातीनें सर्व लोकांस असें जाहीर केलें जाते कीं, शिदू वल्लद तुकाराम कुणबी रहाणार पाटखेड ह्यास आह्मी आमच्या दुकानचे कुलमुखत्यार नेमलें होते. पण आज तारेख पासून त्याचें मुखत्यारपत्र रद्द केलें असून त्यास कामावरून दूर केलें आहे तर या पुढें आमच्या संबंधानें त्याच्याशीं देणघेण्याचा वगैरे कोणताहि व्यवहार कोणी करूं नये. केल्यास तो आह्मास मान्य नाहीं व त्याची जबाबदारी ज्याची त्याच्यावर राहील. कळावें तारीख २५ माहे आगष्ट सन १९०१ इ०

सही

रामराव आणि आनंदराव वल्लद विठोबा उभयता अज्ञान पालन करणार मातोश्री राधाबाई मर्द विठोबा मते रहाणार पाटखेडे निशाणी बांगडी.

### नोटीस

बेशमी— मयत गोपाळराव बाळाजी देशमुख राहणार शिराळे ता० उमरावती यांचे वारसास.

या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मां जवळ मयत गणपत वल्लद विठोबा मराठी यानें मौजे यवदे येथील सर्व्हे नंबर ३२६ चें शेत गहाण ठेविले आहे. मी हें शेत विकत घेतलें आहे, तुह्मी गहाणाचा हिशोब चुकता कळवावा ह्मणजे सर्व रक्कम देऊन टाकतो ही गोष्ट नोटीस पोचल्यापासून आठ दिवसांत करावी. ह्या तारखे पुढें तुमचें व्याज बंद केलें जाईल आणि लहान गहाणाची शर्तही तुह्मी अंमलांत आणूं शकणार नाहीं. कळावें. तारीख २४ आगष्ट सन १९०१ इ०

सही

श्रीरंगसा वल्लद भगुसा कलाल रहाणार यवद ता० दर्यापुर दस्तुर खुद्द.

### जाहिरात.

तमाम लोकांस कळविण्यांत येतें कीं पिकासी, फावडी, मोठमोठाल्या सब्बली, घमेलीं, पोहरे, वेताच्या टोपल्या, डामरानें भिजविलेलीं गोणपाटे, पाण्याची लांकडी व लोखंडी पिपें, भोगुणी, पातेली, तपेली पराती वगैरे जुने पुष्कळसे सामान पश्चिम वऱ्हाडच्या भागांत ठिकठिकाणीं सांठवून ठेविलें आहे ते खाली लिहिलेल्या ठिकाणीं आणि त्यापुढें सांगितलेल्या तारखेस लिलाव होणार आहे.

| ठिकाण | तारीख |
|---|---|
| अमरापूर | २८ आगष्ट १९०१ |
| देऊळगावराजा | ३१ " |
| देऊळगांवपठाण | १ सप्टेंबर |
| चिखली | २ " |
| मोथळा | ५ " |
| मलकापूर | ७ " |
| बुलढाणा | ८ " |
| वासीम | १० " |
| अकोला | १२ " |

(सही) जे० एम० रे.

ता. २४-८-०१ { एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर पश्चिम वऱ्हाड भाग आकोला.

### नोटीस.

पांडु वल्लद बाळाजी साकरे राहणार मौजे भडगांव प्रगणे धाड तालुके चिखली यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे गंधर्व लग्नाचे भतार असून अजमास ८।९ वर्षे होऊन गेली. तुमचा व माझा आपले हिंदुधर्माप्रमाणें पाट लागला त्या दिवसांपासून मी तुमचे घरीं नांदून आपण उभयतांनीं आनंदानें संसार केला. व दोन मुलेंही झालीं. असें असतां गेल्या दुष्काळांत माझा कांहीं एक अपराध नसतां विनाकारण तुह्मी व तुमचे मावानें, मजला मारहाण करून मी जात नसतांही जबरदस्तीनें माझे वाटेल तसे हाल करून काढून दिलें. या गोष्टीसही आज दोन वर्षे होऊन गेलीं. मध्यंतरी मी व माझे आईबापानीं मजला घेऊन जाण्याबद्दल तुह्मास बरेच वेळा निरोप व पत्रें पाठविलीं. तरी तुह्मी येऊन मला न नेतां उलट. तिनें आतां वाटेल तें करावे, असें निरोप पाठविले आणि आज चार महिने झाले असतील तुह्मी दुसरी गंधर्वाची बायकोही केली. ह्मणून मी तुह्मास मला घेऊन जाण्याबद्दल पोष्ट मार्फत नोटीस केली असतां ती तुह्मी न घेतां वापस केली. करितां तुह्मास मुद्दाम ही नोटीस करून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी मला काढून दिल्या पासून आज पावेतों मी कर्ज काढून उदर निर्वाह करीत आहे. करितां जर तुह्मास मला घेऊन जाऊन योग्य रीतीनें नांदविणें असेल तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे आई बापाचे घरीं मौजे तांदूळवाडी, प्रगणें देऊळघाट येथें येऊन या नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व देण्याची अदाई करून मला घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. किंवा या नोटिसीचा जाब, वरील मुदतींत द्यावा, यांत लिहिल्या प्रमाणें जर तुह्मी न येतां जबाबही न दिला तर ही नोटीसच फारकती समजून दुसरा घरठाव करीन. पुढें मजवर तुमचा नवरेपणाचा किंवा कोणतेही प्रकारचा कांहींएक हक्क राहणार नाहीं. शिवाय या नोटिसीचे खर्चासुद्धां तुमचेवर कोर्टात दावा मिळवून तुमचेकडून सर्व पैसे वसूल करण्यांत येतील. हें खूप समजावें. कळावे तारीख २१ माहे आगष्ट सन १९०१ इसवी.

सही
धुरपती मर्द पांडू साकरे निशाणी
हातची बांगडी.

---

### स्वातंत्र्य प्रियता

हा अमोलिक गुण सर्वांस आवडतो पण कचितांच्याच अंगांत वास करितो. हा फार मत्सरी व जुलमी आहे. दुसऱ्यास स्वातंत्र्य मिळालें तर याच्या अंगाची आग होते हें विशेष होय. आपल्या कह्यांत, आपल्यास वाकून व आपल्याच अंकित सर्वांनीं असावे अशी ह्याची महत्वाकांक्षा अनुदार तऱ्हेची आहे. ह्याच्या पायीं किती संहार झाले, होत आहेत, व होतील हें सांगतां येत नाहीं. बोअर लोकांची स्वातंत्र्या करितां वाताहात होऊन शेवटीं तें प्राप्त तर झालें नाहींच व पुढें मागें होईल अशा आशेसहि जागा उरलेली दिसत नाहीं. सुंभ जळून खाक झाला तरी त्याचा पीळ मोडत नाहीं तद्वत बोअर लोकांचा स्वातंत्र्य व देशाभिमान यांच्या प्रीतीचा व पारतंत्र्याच्या तिटकाऱ्याचा शौर्यादि गुणरज्जूंनीं हाडामासांत रसरसून गेलेला पीळ मात्र तिळभरहि ढिला पडला नाहीं. सर्वस्वी पारतंत्र्यानें घेरलें तरी मन हें स्वैरच फिरत राहील. तें कधीं कोणाच्यानेंहि बंदिवासांत कोंडून ठेवितां येणार नाहीं. हीच गांठ ह्यांनीं मनांत पक्की बांधून ठेविली आहे. लढाईचें जें मुख्य अंग ह्मणजे शरीरसामर्थ्याच्या बलाबलाची झुंज ती अजी बंद आहे. लहानसान दंगाधोपा, छापाछापी वगैरे गोष्टी चालू आहेत. वीरश्रीनें फणफणलेले पण निराशेनें वैतागलेले बोअर लोक साहित्यसामुग्री संपल्यामुळें हताश होऊन दैवदुर्गतीस सादर होत आहेत, मृतप्राय झालेल्या राष्ट्रास संजीवनीचे कितीहि वळसे चाटविले तरी गुण येत नाहीं. लहान तोंडीं मोठा घास घेतल्यामुळें ह्यास यश आलें नाहीं हें खरें, पण ह्यांनीं जगांतील अती बलाढ्य शत्रूस जरजर केलें व शेवट पर्यंत हार खाल्ली नाहीं ह्मणून त्यांची सद्गुणकीर्ति जगभर निरंतरची राहील ह्यांत शंका नाहीं.

चीनच्या बक्सर लोकांची स्वातंत्र्या साठीं चळवळ जारीनें सुरू आहे. चिनांत शांतता व स्वस्थता अद्याप झाली नाहीं.

रशियानें फिनलंड संस्थानास पादाक्रान्त केलें आहे पण तेथील लोकांचीं मनें रशियास नाराज आहेत. त्या लोकांनीं आपल्या देशाचें स्वातंत्र्य हरपलें ह्मणून यच्चावत बायका, मुलें, माणसें या सर्वांनीं सुतक धरलें आहे. रशियन गव्हरनरास ते लोक तोंडहि दाखवीत नाहींत. शत्रुपक्षाभिमानी लोकांचा ते सर्वस्वी अनिवार द्वेष व तिटकारा करितात.

राज्यतृष्णा, स्वातंत्र्यप्रियता, स्वदेशाभिमान हे गुण फार विलक्षण होत. व असंख्य सुखदुःखमिश्रित आहेत.

कुरापत-युरोपियन टर्कीचे सुलतानास कांहीं कारणामुळें इंग्रजांचा राग आला आहे. व यामुळें अग्निनारायण पेट खातो कीं काय अशी फार भीति आहे. युरोपांत कोणची केव्हां कुरापत निघेल व त्याचा पल्ला कोठवर पोचेल याचा नेम नाहीं. प्रत्येक राष्ट्रांत अंतस्थ द्वेषाग्नि धुमसत आहे.

पुण्या मुंबईकडे लांगमनच्या मोडी क्रियानें जुलूम चालविला आहे ह्मणतात. एकेक कित्ता ८–९ पैसे घेतो. व तो प्रत्येक मुलानें घ्यालाच पाहिजे नाहीं तर शाळेंतून निघून जावें लागेल अशी लोकांस दहशत बसली आहे. शिवाय हे कित्ते ह्मणजे कांहीं कित्ता गिरविण्या सारखे वळणदार आहेत अशीहि गोष्ट नाहीं ह्मणतात. कोण जुलूम हा !

एक कबूतर स्पेन देशामधील बर्गोस शहरा पासून ब्रुसेल्स शहरा पर्यंत सातशें मैल १४ तासांत उडून गेलें असें समजतें.

जगांतील सर्व देशांत मिळून, निरनिराळ्या १३,४०० जातींचीं टपालचीं टिकीटें प्रचारांत आहेत, असा एकानें अंदाज काढिला आहे.

जपानमध्यें हल्लीं गुलाबाची एक जात आहे. यांचीं फुलें दिवसा सूर्यप्रकाशामध्यें लाल व रात्रीं छायेमध्यें सफेत दिसतात.

" हिंदुस्थानांत तयार होणारा चहा हिंदुस्थानांत कसा खपवावा " याविषयीं जो उत्तम निबंध लिहील त्यास मेसर्स. आंद्रूयूल आणि कंपनीनें १०० रुपयांचें बक्षीस देण्यास काढलें आहे. युरोपियन लोकांस हें बक्षीस मिळणार नाहीं ही एक विलक्षण अट यांत आहे असें समजतें.

प्रसिद्ध माझीनी, व गारिबाल्डी यांच्या सारखाच क्रिस्पी हा इटलियन देशभक्त होता. हा नुकताच मरण पावला. ग्लाडस्टन व बिस्मार्क यांच्या तोडीचा हा मोठा मुत्सद्दी, कार्यकर्ता धूर्त व उद्योगी पुरुष होता. ह्याचें जीवितकर्तव्य ह्मणजे लहान लहान संस्थानांची एकी करून इटलीस स्वतंत्र करणें हें होय.

५–६ रुपयांचें एक यंत्र एका युरोपियनानें काढलें आहे. या यंत्रानें केळीच्या सोपटांची छानदार मजबूत दोरखंडें तयार करतां येतात.

चमत्कारिक शोध—पाण्याच्या तळीं ९६ तास मनुष्यास सहज राहतां येतें. एक बुडणारा दिवा घेऊन खोल पाण्याच्या तळाशीं गेल्यास उत्तम स्वच्छ दीपप्रकाश पडून चांगलें दिसतें. ज्याचा अंत लागत नाहीं अशा जलोदधीच्या तळीं पृथ्वी वरील प्रमाणें सर्व व्यापार सुयंत्र चालतात ही गोष्ट पुष्कळ संभवनीय दिसते. हालेव्याम नांवाच्या मनुष्यानें ३२ फूट खोल पाण्यांत जाऊन तेथें दीप--प्रकाशांत एका वर्तमानपत्रांतील लेख वाचला. व हें त्याचें वाचन पाण्याच्या पृष्ट भागावर आणून सोडलेल्या नळीच्या योगानें सुरेख ऐकूं येत होतें. कांहीं दिवसांनीं मनुष्य प्राणी पाण्यांत राहण्याची युक्ती काढील. मग मात्र जलचरांची काय वाट होईल कोण जाणे !

चमत्कारिक शास्त्रीय शोध-- आक्सिजन वायू पासून केसांची फार जलद वाढ होते. टक्कल पडलेल्या मनुष्यास ह्या वायूनें भरलेली टोपी घातली कीं चांगले सुरेख केस येतात. तसेंच क्षयरोग्यास हा वायू फारच गुणकारी होय. रात्रंदिवस हाच वायू घेतल्यास क्षयासारखा दुष्ट रोग अगदी बरा होतो.

किड्यांचा दीप--प्रकाश— कांहीं जंतू प्रकाशदायी आहेत. ते पुष्कळसे एकत्र करून बाटलींत घालून ठेवावेत. त्यांच्या पासून फारच सुरेख प्रकाश मिळतो. ईश्वरी चमत्कार अगम्य होत.

कुबेराची संपत्ती—अमेरिकेंतून १०१६ जण अती श्रीमान लोक विलायतेस जाणार आहेत. यांच्यापाशीं इतकी अतोनात संपत्ती भरलेली आहे कीं ते सर्व मिळून कट करतील तर सर्व जग खरेदी करणें त्यांस कांहीं अशक्य नाहीं. ह्या धनाचा काय विनीयोग करावा हीच पंचाईत त्यास पडली आहे. आमच्या हिंदुस्थानास ह्यांतील एखादा कुबेर प्रसन्न झाल्यास मजा होईल नाहीं ? पण आमची अक्काबाई कशी त्याला येऊं देईल ?

ईश्वरानें अनंत पदार्थ उत्पन्न केले आहेत. व त्यांपैकीं एकून एक पदार्थ खातां येतो. पण खाण्यास योग्यायोग्य याचा विचार करून निवड करणें ज्याचें त्यावर सोपविलें आहे. आपल्या बुद्धिचातुर्यानें ही आवड निवड सर्वजण करितात. मनुष्याचा जन्मतःच स्वभाव खादाड आहे. सर्व शरिरांच्या व्यावृत्तींत तोंडाचा व्यापार फार दांडगा आहे. प्राणी निसर्गतःच जी जी गोष्ट व जी जी वस्तु हस्तगत होईल ती ती सर्व सरसकट तोंडांत व घशांत घालतोच. ह्याचे सत्यतेच्या प्रत्यंतरादाखल लहान अर्भकाकडे दृष्टि फेंकाली ह्मणजे उघडा पडेल. पुष्कळ पदार्थ चापण्याचा व्यवसाय नेहमीं चालू आहेच. पण कांहीं पदार्थ आपण अलंकारिक रीत्या व खरोखरीच खातो त्यांची विशेष शोभा व मौज आहे. घाण, मार्त, शेण, जोडे, खाऊ, मार, पैसे, मन, दांत ओंठ, कचर, जीव, हाडे वगैरे खाण्याची गोष्ट गमतीचीं आहे. कांहीं खावें वेड्यांचीं, हलकटांची, शूरांची, त्रास देणारांचीं वगैरे निरानिराळ्या जातिवंतांचीं होत. तर शहाण्यानें योग्य तेंच खावें. अभक्ष्य भक्षूं नये.

साऊथ अमेरिकेकडील एका मिशनरीच्या स्त्रीस पहिल्या खेपेस एकदम तीन मुलें झालीं व दुसरे खेपेस एका वर्षांतच एकदम सहा मुलें निपजलीं. हीं सर्व जिवंत आहेत. एका दोन वर्षाच्या आंतच एकंदर ९ आपत्यांस ह्या स्त्रीनें जन्म दिला. आतां तिसऱ्या पाळीला गणित श्रेढीनें का भूमिती श्रेढीनें संतती होणार कोण जाणे ! अशी ही संततसंपतीची खाण आमच्या हिंदुस्थानास ह्या काळांत लाधली नाहीं हें केवढें सुभाग्य कांहीं जनावरांचा उदाहरणार्थ कुत्र्या मांजरांचा दरखेपेस खंडीभर पोराबाळांचा खिल्लारखाना तयार असावयाचाच. त्यापैकींच ही अश्रुतपूर्व व अपूर्वाईची गोष्ट होय. इतक्या मुलाबाळांचे कोड कौतुक वाटून त्या नवरा बायकोस धन्य वाटत असेल कां, हें शुक्लकाष्ट पाठीस लावून घेण्याइतकें कोणचें पाप उभें राहिलें आहे असें वाटून दुःख होत असेल बरें ! संततीच्या खाणींतून शूर व कीर्तिमान पुरुषच सांपडू लागलें तर ही खाण संपत्तीच्या नव रत्नांच्या खाणीपेक्षां चांगली यांत शंका नाहीं, पण संततीच्या खाणींतून एखादेंच निर्मळ रत्न बाहेर पडतें ह्मणून संपत्तीचीच खाणी उत्तम होय.

### भयंकर दुष्काळ

चीन देशामध्यें भयंकर दुष्काळ पडला आहे. लढाईमुळें आधींच सर्वतोपरी नासाडी होऊन चुकली आहे. गवत व झाडाचा पाला सुद्धां पोटाच्या आगींत जळून खाक झाला आहे. कातड्याच्या थैल्या व पेट्याही शिजवून खाणें संपलें. मनुष्यास ते अक्षरशः खात आहेत. चोहोंकडे ओसाड झालें असून प्रेतांचप्रेतें दृष्टीस पडतात. काळाचा तडाखा कठीण आहे. सर्वांजवळ ते भिक्षा व प्राणदान मोठ्या काकुळतीनें मागत आहेत. दुष्काळामुळें काय काय आपत्ती व पाप उभें राहतें व त्यामुळें हृदय फाटून जाऊन काळजाचें कसें पाणी होतें ह्याचा पूर्ण अनुभव आपणांस आला आहे. तर ह्या गत दुःखद गोष्टी मनांत आठवल्या ह्मणजे प्रत्येकाचें अंतःकरण विव्हल होईल. सर्व मानव जाती संबंधानें जें आपलें कर्तव्य तें लक्ष्यांत घेऊन आपले दुःख निवारण्यासाठीं दुसऱ्यांनीं दयाभूत होऊन जशी मदत केली तद्वत गांजलेल्या लोकांना शक्त्यनुसार सर्वांनीं मदत द्यावी.

( पुरवणी पाहा )